सं.नं. ८९३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें सन १८९३

२०० ८९३ सन १९००

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु. नांव — बंधाविमोचन नाटक

ले. — गो. गो. सोमण

विषय — नाटक — २०५

२०५
सं.क्र. ८९३

संगीत बंधविमोचन

नाटक

देशाची उन्नती होण्यास आणि राजकीय हक्क मिळवून देण्यास सत्यव्रतासारखीं माणसें निर्माण झालीं पाहिजेत आणि अनुत्कर्षासारखीं माणसें नाहींशी होऊन दुर्मति दुर्विलास व दुर्वीय यांसारख्या लोकांस बुद्धिवाद सांगून मिळवून घेतले पाहिजे.

सदर्हू नाटकाचा प्रयोग झाल्यापासूनच अडचणी बऱ्याच आल्या तरी त्या सर्व दूर होऊन पुस्तक छापण्यास सुरवात केली त्यावेळीं पुस्तकें फेब्रूवारी १९ तारखेच्या आंत होतील असें वाटल्यावरून फेब्रूवारी अखेर पुस्तकें मिळतील अशी जाहिरात दिली. परंतु मुंबईस प्लेग वाढत्या प्रमाणावर पुढें सुरु झाला आणि छापखान्याचे मालकास बऱ्याच अडचणी आल्या परंतु त्या सर्वांनां न जुमानतां त्यांनीं सदर पुस्तक मार्च अखेर मोठ्या कसोशीनें प्रसिद्ध केलें.

सरते शेवटीं या नाटकासंबंधानें नाटककर्त्यावर गैर समजानें राजकीय अप्रीतिची धुळ उडाली होती ती, तो गैरसमज दूर झाल्यावर, पार नाहींशी झाली. हें सांगून व ज्या गृहस्थांनीं ग्रंथकर्त्यास मदत केली त्यांचे आभार मानून सदर ग्रंथकाराचे हातून यथामति मायभाषेची सेवा घडविण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करून हा प्रस्तावनालेख संपवितो.

गोपाळ गोविंद सोमण.

श्री गजानन प्रसन्न.

# संगीत बंधविमोचन.

## अंक पहिला.

### नान्दी.

पद. ( चाल—सांज सुरा भरणा )

शशिशेखर नमितों । आधीं । मुदित मनें ध्यातों ॥
विघ्न हराया तत्सुत गणपति चरणसरोजीं रत मीं होतों।धृ.।
सकल जगा व्यापुनी । उरला । भक्तां सुखवोनि।
भवपाशां तोडी । स्मरतां । मोक्ष पदा देई ।
अनंत कोटी ब्रह्मांडाचा चालक पालक जो मज गमतो।। १॥
प्रेमें उद्धारितो । भक्तां । सुवरें रंजवितो ।
रक्षक जो बनतो । त्यांचा । कल्पद्रुम होतो ।
दीन दयाघन चिर सुख सकलां देइ अशी त्या विनती
करितों ॥ २ ॥

पद ( चाल—अवन करो तुमचें )

वंदु रमाधव आतां ।होतो। तोषद जो निजभक्तां।धृ०।
असुर सुरांना तापद होती।अवनी सारी त्रस्ताचि करिती।
त्यांतें संहाराया । रूपें धरितो जो सुखदाता ॥ १ ॥
सृष्टि स्थिति लय ज्याच्या हातीं।भक्तांसाठीं तो जगजेठी।
कल्पद्रुमसम झाला । देई इच्छित वस्तू भजतां ॥ २ ॥

साकी ( ताल धुमाळी )

व्याघ्रांबर कटिं मस्तकिं गंगा भाळिं चंद्रमा विलसे ।

वामांगीं स्थित गिरिजा ज्याच्या स्मित वदने जो बैसे।
रुद्रबुद्धी देवो । संकट निरसन तो करवो ॥

[ सूत्रधार पुढें येऊन व हात जोडून ]

सूत्रधार—आपल्या आज्ञेप्रमाणें प्रयोगास सुरवात करितों परंतु सर्वकामीं योग्य कालीं सल्लामसलत देणारी माझी प्रिया तिला हें कळवून तिचें अनुमोदन घेतलें पाहिजे. करितां आपण कौतुकाचा भंग होऊं न देतां क्षणभर स्वस्थ बसा. ही पहा माझी भार्या इकडेच येत आहे.

[ नटि प्रवेश करिते व आपल्याशीं गुणगुणत येते ]

पद ( चाल—हा गमत न मज सुविचार )

तल्लिन जन मन अनिवार । मुदित मनें हा उत्सव
करिती ॥ पाहुनी होई विस्मय फार ॥ ध्रु० ॥
शिझारिती स्वमना करुनी नाना रंग दंग जन या समयीं ।
प्रदीप उजळति दिपावलीसम नकळे कां हे या समयीं।
खलु हि वेळा इष्ट नसोनी । कैसा याचा करूं प्रतिकार।
रमवीती । बहुरीती। सुहृद सुजन ॥ १ ॥ जन० ॥

सुत्रधार—(तिच्या जवळ जाऊन) यांत आश्चर्य मुळींच नाहीं; लोकांचा ज्याच्यावर पूर्ण विश्वास, ज्यानें आपल्या जिवाकडे न पहातां आपलें तनुमनधन देशाच्या सेवेसाठीं अर्पण केलें अशा मनुष्यावर आलेल्या प्रसंगांतून त्याची मुक्तता झाल्यावर मग सर्व नगरवासी लोकांस कां बरें अत्यानंद होणार नाहीं. असल्या प्रसंगाच्या पासंगालाही दिवाळी लागायची नाहीं. आणि त्याच उत्सवा प्रीत्यर्थः—

साकी ( ताल धुमाळी )

विद्याभूषण सद्गुण पंडित रसिक असे जमलेले ।
नाट्य परीक्षणीं निपुण असोनी उल्हासित जे जहाले।
त्यांनां रमवाया । पाचारीं तुज या ठायां ॥

नटी—खरंचका! मग मला फारच आनंद वाटतो; पण अमल्या आनंदाच्या समयीं खेळही चांगलाच हवा, म्हणजे दुधांत साखर पडल्यासारखं होईल.

सूत्र०—त्याची तुला काळजी करण्याचें कारण नाहीं. नाटकासाठीं असाच एक सुरेख भाग योजिला आहे.

नटी—तो कोणता ? मला नाहीं का सांगायचा प्रिया

पद [ चाल—सुंदर उपवन ]

धन्य सुगुणखानि कवण नराचे आज चरित नाथा॥ध्रु०॥
गोंवियलें हो नाटकिं सांगा नाम तयाचें सत्वर आतां॥
काय बोध तच्चिरता पासुनि मिळेल सांगा तात्पर्यार्था॥ १॥

सूत्र०—या आनंदाच्या समयाला शोभण्या सारखाच तो भाग आहे. माझ्या मित्रानें रचलेल्या बंधविमोचन नाटकाचा प्रयोग करावा म्हणजे झालें. त्यांतः

पद ( चाल—रमला सांब जसा )

जगतीं सार्थ अशा सत्यव्रत नामानें।
गाजे आर्य मही मुगुट जया जनमानें ।
म्हणती आज सखे चरित तयाचें दाऊं।
लोकीं धन्य असें म्हणवुनियां गे घेऊं॥ १॥

नटी—ठीक आहे, चलावं. [जातात]

# प्रवेश पहिला.

स्थळ–विजय नगरांतील एका बंगल्यांतील दिवाणखाना.

पात्रें–दुर्मति, दुर्विलास आणि दुर्वीर्य.

[ आन्हिक पत्रकार एका वाटोळ्या टेबला सभोंवतीं खुर्चीवर बसून हातांत पेटलेला एकेक चिरूट आहे असा पडदा उघडतो. ]

दुर्मति–असल्या प्रकारचें स्वातंत्र्य या लोकांनां देतां उपयोगीं नाहीं. ह्मणून पहिल्या पासून आमची कानीं कपाळीं ओरड चालली होती. पण ऐकतो कोण तें. एकदां डोक्यावर चढविल्यावर जड जाणारच.

दुर्विलास–आपण ह्मणतां तें अगदीं बरोबर आहे. पायांतली वहाण पायांतच पाहिजे. अहो यांनां स्वातंत्र्य देऊन उपयोगी नाहीं कारण मग जित आणि जेते यांत भेद तो काय राहिला?

दुर्वीर्य–तरवारीच्या जोरावर मिळविलेलं राज्य तरवारीच्या धारेवरच राखलें पाहिजे;तशांतून स्वतंत्रता या शब्दाचा अर्थ तरी या लोकांना कळतो आहे कां? आज कितीक शतकें स्वतंत्रता कशाशीं खातात हें माहीत नाहीं कोणाच्या ना कोणाच्या तरी अमला खालीं रहाण्याची संवय ह्यामुळें एकदम स्वातंत्र्य दिल्यास माकडाच्या हातीं कोलीत दिल्या प्रमाणेंच यांची गत व्हायची,तशांतून मागच्या अमलाखालीं सोसावे लागणारे हाल आणि अपेष्टा, राखेचे तोबरे, हत्तीच्या

पायापाशीं बांधण्याची शिक्षा, चौकशी वांचून सूळ इत्यादि गोष्टी आम्हीं केवळ नामशेष करून टाकल्या आहेत एव-ढ्यानं यांचें समाधान होण्यास हरकत नव्हती. ह्या नसत्या स्वतंत्र विचाराचें बाळकडूं ह्यानां घालण्याची काय बरें जरूर होती! पण छे! आमची ओरड ऐकतो कोण?

दुर्वि०—तें एक असो. आणखी या लोकांवर आमचे थोड का उपकार आहेत. आमच्या बुद्धिमत्तेचा, आमच्या अगाध ज्ञानाचा, आम्ही यांनां केवढा बरें फायदा करून दिला आहे! पण हे गाढव याचा विचार करताहेत कोठें. आम्ही यावयाच्या पूर्वीं प्रवासाचीं साधनें काय तर म्हणे बैलगाड्या व फार क्वचित घोड्याच्या. पण या प्रवासाची कोण अपेष्टा आणि किति त्रास !! आतां तें कांहीं आहे का? एका घट-केंत बारा कोस अगदीं सुखानें बिन श्रमानें आणि अल्प मोलांत राजासारखें जातां येतें. ह्यांची एका गांवा-हून दुसऱ्या गांवाला पत्रें जायचीं किती यातायात आणि किती कालातिक्रम ! आतां दोन दिवसांच्या आंत एक पैसा खर्चिल्यानें काशीपासून रामेश्वरापर्यंत खुशाली कळते पण हें या मूर्खांना काय होय? अशीं एक कीं दोन सुखें आणि सोयी सांगाव्या. पण हे हरामखोर तें सगळें विसरून पुनः खाल्या घरचे वांसे मोजायला तयार! कृतघ्न लोक खरे! ह्यांनां इतकें कळत नाहीं कीं येवढालीं सुखें केवळ आमच्या अम-लाखालीं ह्मणून मिळत आहेत.

दुर्मती—अहो चांभाराच्या देवाला खेटराचीच पुजा पाहिजे

# प्रवेश पहिला.

स्थळ–विजय नगरांतील एका बंगल्यांतील दिवाणखाना.

पात्रें–दुर्मति, दुर्विलास आणि दुर्वीर्य.

[ आन्हिक पत्रकार एका वाटोळ्या टेबला समोंवतीं खुर्चीवर बसून हातांत पेटलेला एकेक चिरूट आहे असा पडदा उघडतो. ]

दुर्मति–असल्या प्रकारचें स्वातंत्र्य या लोकांनां देतां उपयोगीं नाहीं. ह्मणून पहिल्या पासून आमची कानीं कपाळीं ओरड चालली होती. पण ऐकतो कोण तें. एकदां डोक्यावर चढविल्यावर जड जाणारच.

दुर्विलास–आपण ह्मणतां तें अगदीं बरोबर आहे. पायांतली वहाण पायांतच पाहिजे. अहो यांनां स्वातंत्र्य देऊन उपयोगी नाहीं कारण मग जित आणि जेते यांत भेद तो काय राहिला?

दुर्वीर्य–तरवारीच्या जोरावर मिळविलेलं राज्य तरवारीच्या धारेवरच राखलें पाहिजे;तशांतून स्वतंत्रता या शब्दाचा अर्थ तरी या लोकांना कळतो आहे कां? आज कितीक शतकें स्वतंत्रता कशाशीं खातात हें माहीत नाहीं कोणाच्या ना कोणाच्या तरी अमला खालीं रहाण्याची संवय ह्यामुळें एकदम स्वातंत्र्य दिल्यास माकडाच्या हातीं कोलीत दिल्या प्रमाणेंच यांची गत व्हायची,तशांतून मागच्या अमलाखालीं सोसावे लागणारे हाल आणि अपेष्टा, राखेचे तोबरे, हत्तीच्या

पायापाशीं बांधण्याची शिक्षा, चौकशी वांचून सूळ इत्यादि गोष्टी आम्हीं केवळ नामशेष करून टाकल्या आहेत एव-ढयानं यांचें समाधान होण्यास हरकत नव्हती. ह्या नसत्या स्वतंत्र विचाराचें बाळकडूं ह्यानां घालण्याची काय बरें जरूर होती! पण छे! आमची ओरड ऐकतो कोण?

दुर्वि०—तें एक असो. आणखी या लोकांवर आमचे थोडे का उपकार आहेत. आमच्या बुद्धिमत्तेचा, आमच्या अगाध ज्ञानाचा, आम्ही यांनां केवढा बरें फायदा करून दिला आहे! पण हे गाढव याचा विचार करताहेत कोठें. आम्ही यावयाच्या पूर्वी प्रवासाचीं साधनें काय तर म्हणे बैलगाड्या व फार क्वचित घोड्याच्या. पण या प्रवासाची कोण अपेष्टा आणि किति त्रास !! आतां तें कांहीं आहे का? एका घट-केंत बारा कोस अगदीं सुखानें बिन श्रमानें आणि अल्प मोलांत राजासारखें जातां येतें. ह्यांची एका गांवा-हून दुसऱ्या गांवाला पत्रें जायचीं किती यातायात आणि किती कालातिक्रम ! आतां दोन दिवसांच्या आंत एक पैसा खर्चिल्यानें काशीपासून रामेश्वरापर्यंत खुशाली कळते पण हें या मूर्खांना काय होय? अशीं एक कीं दोन सुखें आणि सोयी सांगाव्या. पण हे हरामखोर तें सगळें विसरून पुनः खाल्या घरचे वांसे मोजायला तयार! कृतघ्न लोक खरे! ह्यांनां इतकें कळत नाहीं कीं येवढालीं सुखें केवळ आमच्या अम-लाखालीं ह्मणून मिळत आहेत.

दुर्मती—अहो चांभाराच्या देवाला खेटराचीच पुजा पाहिजे

त्याला फुलें काय उपयोग ! सुग्रास अन्न खायला तलम कपडे पांघरायला आणि उत्तम प्रकारचें शिक्षण या सर्व गोष्टी आह्मीं यांस दिल्या असून उलट हे लोक आमच्यावरच दांत खातात तेव्हां यांनां म्हणावं तरी काय!

दुर्वीर्य—अहो असें कसें होईल;शिक्षणाचे परिणाम चांगले व्हायचे कां वाईट? हें नाहीं बोवा तुमचें ह्मणणें मला पसंत?

दुर्विलास—अहो शिक्षणाचे परिणाम वाईट होऊं नयेत हें खरें आहे. पण ते कोणावर? ह्यांच्या सारख्या दुष्ट लोकांवर नाहीं. सापाला दूध पाजलें काय उपयोग व्हायाचा! वीषच ना त्याचें बनायचें ! बीं घेऊन खडकावर पेरलें त्याचा कवडी इतका तरी उपयोग होईल का! तद्वतच या लोकांची स्थिति. ह्या देणगीस ते पात्र नाहींत पात्रापात्रतेचा विचार चुकला ह्मणून हें ऐकून घ्यावें लागत आहे.

दुर्वीर्य— आतां तुमच्या सारखेंच मलाही वाटूं लागलें आहे पण आतां काय त्याचा उपयोग? ज्ञान भांडाराच्या किल्लया या चोरांच्या केव्हांच स्वाधीन झाल्या. आतां थोडेच हे लोक ऐकणार. त्यांच्या पासून त्या परत मिळण्याची आशाच नको.

दुर्मती—अहो ह्मणूनच या त्यांच्या गमजा आणि शब्द प्रहार ऐकून घ्यावे लागत आहेत. तो फाजील सत्यव्रत तर अगदीं बहकला आहे. त्याला स्वर्ग अगदीं दोन बोटें उरला आहे. आपली स्वैर लेखणी आपल्या हितकर्त्यांवर चालविणें हा अगदीं नीचपणा आहे. या अधमपणास सरकारांतून वेळींच

चांगलें बक्षीस पाहिजे. [ सगळे उठून पुढें येऊन ]

दुर्वीर्य—परवांच्या अंकांत तर त्यानें अराजनिष्ठतेची शिकस्त केली आहे; काय उद्दामपणा हा.माझें डोकें अगदीं भडकून गेलें आहे. असलें नीच कर्म पाहून माझी तळव्याची आग मस्तकांत जाऊन पोहोंचते. वर्तमान पत्र ही टूम कोणाची, ज्ञान कोणाचें ? घेतलें कोणापासून ? आणि अक्कल शिकवायची कोणाला ! आजाला नातू शिकवतो पहा तर खरा ! माझ्या हातांत सत्ता पाहिजे होती म्हणजे दाखविला असता सपाटा.

दुर्विलास—अहो लेखनसत्ता तर आहेना तुमच्यापाशीं तुमच्या आन्हिक पत्रांत सरकारचे कान उघडा. तोफांचा भडिमार केल्यावर त्याला खालीं उतरण्याला अवकाश तो कसला ! मीं पण आपल्या पत्रांत धडाका चालवितों. चोहींकडून भडिमार झाल्याशिवाय शत्रू हातांत यायचा नाहीं.खरें कां खोटें मीं ह्मणतों तें.

दुर्मती—मला ही गोष्ट पटली. मीं आपलाही तोफखाना सुरू करतों. बंबार्डमेन्ट करायला पाहिजे. सापाचें पिलूं मोठें होऊं देतां उपयोगाचें नाहीं. ठरलें तर असें करायचें कसें दुर्वीर्य ?

दुर्वीर्य—ठीक आहे. ही एक युक्ती आहे लागू पडेल तेव्हां खरी.पण प्रयत्न जरूर केला पाहिजे.ठरल तर. अगदीं उद्यां पासून. कसूर ह्मणून उपयोगीं नाहीं. ह्याचा हा चढेलपणा उतरलाच पाहिजे. बरें आतां पुनः केव्हां भेट?

दुर्विलास—आज आठा दिवशीं.

दुर्मती—होय तेव्हांच. काय परिणाम होतो या अस्त्राचा पाहूं तर खरें. चला फार उशीर झाला. पण हें झालें पाहिजे हो.

(जातात.)

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—आनंद भुवननगरांतील जनसेवा पत्राचें ऑफीस

पात्रें—सत्यव्रत आणि आज्ञाधारक.

(आराम खुर्चीवर सत्यव्रत बसला आहे त्याच्या उजव्या हाताला एका उतरत्या टेबलापाशीं कारकून बसला आहे आणि सर्वत्र वर्तमान पत्राच्या फायली आहेत असा पडदा उघडतो.)

सत्यव्रत—काय? सर्व तयारी आहेना?

आज्ञाधारक—सगळी तयारी आहे. आठवड्याचीं पत्रें एके ठिकाणीं जुळून ठेविलीं आहेत. लिहिण्याकरितां कागदाच्या स्लिपा आणण्याकरितां बंडोबापाशीं निरोप दिला आहे.

सत्य०—मग स्लिपा येईपर्यंत सुरवात करायची नाहीं म्हणानां!

आज्ञा०—तसें कांहीं नाहीं. चाल चलाऊ पुरते कागद आहेत.

सत्य०—[ आडकित्त्यानें सुपारी फोडून तोंडांत टाकून ] ठीक आहे घ्या लिहायला.

( बंडोबा प्रवेश करितो )

बंडोबा-[रामराम करून आणि स्लिपा देऊन ] मजकूर पाहिजे. पत्र व्यवहार जूळून झाले लोक आतां रिकामे बसतील.

सत्य०—बस बाहेर जरा, देतो. (बंडोबा जातो) हं , घ्या लिहायला. या आठवड्यांतल्या महत्वाच्या विषयाचें मघांशीं टांचण केलें आहेना.

आज्ञा०—होय केले आहे.

सत्य०—वाचा पाहूं.

आज्ञा०—

[१] उत्तरेकडील रामोशांचें बंड.

[२] धर्म गुरूंचें आगमन.

[३] प्रभु रामदत्त यांचें लक्ष्मीरमण नाटकगृहांतलें व्याख्यान.

[४] सरहद्दीवरील तंटे आणि चकमकी.

[५] रूस राजाचें कारस्थान.

[६] एका प्रवासी स्त्रीवर बलात्कार.

[७] ग्रामण्याचा समेट.

सत्य०—एवढेच एकंदर विषय नाहीं? बरें कोणीं मेले गेले.

आज्ञा०—सरदार सुग्रीवाचार्य यांचा आणि पाठशाळेवरील प्रिन्सिपाल यांचा मृत्यु.

सत्यव्रत—घ्या तर आर्टिकल लिहायला. [इतक्यांत दोन मावळे येतात त्यांनां पाहून] तुह्मीं कां आला.?

**रामा**—आम्हीं व्हय ! अक्षी नाविलाज झाला. आमच्या जमिनीचा लिलांव व्हनार नव्हका अन जमिनी गेल्यास्नो आम्हां गरीबास्नी खाया काय उपाशी मरावं व्हय?

**सत्य०**—काय तुमच्या जमिनींचा लिलांव? आणि तो कां?

**सोमा**—त्ये काई पुसाया नग. आंवदाचा सारा राहिला आहे आन त्ये पाई लिलाव व्हनार. दीस अगुदर कसं चालल्याती. धड पाऊस बी पडना, शेतबी पिकनां. गुरास नी चारा ना पानी, पटापट मरत्याती.

**रामा**—ह्यो पघा धनी साब! पोर माझा योक बैल मेला आन म्हणूनशान म्यां दुसरा घेतला. आन पघा त्यो बी मेला. तवा आतां पैसाबी न्हाइ आन बैल बी न्हाइ.

**सोमा**—तव्हां सारा थकनारच नव्हका?

**सत्य०**—मग तुमचें म्हणणें काय ?

**सोमा**—अन् म्हननं इकतंच जाउंद्या समद्या जमिनी न काय? आतां येबी नग आनि त्येबी नग धन्याचा कोन धनी हाय?

**सत्य०**—तुमच्या गांवांत तुमचाच सारा थकला आहे कां आणखी पुष्कळांचा थकला आहे?

**रामा**—लई जणांचा थकला आहे पघा रावसाब.

**सत्य०**—अरे मग असा त्रागा करून कसें चालेल. आपलें दुःख दयाळू आणि न्यायी सरकारला कळविलें पाहिजे. अर्ज करून आपलें गाऱ्हाणें त्यांच्या कानांवर घातलेंच पाहिजे. कारण ते आपले मायबाप आहेत.

**रामा**—आन आमासनी कोन पुसतोया!

**सोमा**—आमा गरीबास्नी कोन मदत करतुया. तवा तुमीच तो अरज करून द्याना.

**सत्य०**—बरें सध्यां मी कामांत आहें तुम्हीं उद्यां संध्याकाळीं या आणि मग आपण अर्जाचें पाहूं.

**रामा**—येवढं आमचं काम क्येलच पाहिजे बरं का.

**सत्य०**—करीन बरें. काळजी करूं नका जा तुह्मीं आतां [जातात.] हं घ्या आर्टिकल लिहायला. [इतक्यांत सुविचार येतो त्यास पाहून] अरे तूं आज मध्येंच इकडे कसा?

**सुविचार**—कांहीं विशेष हकीकत कळवायची आहे.

**सत्य०**—(आज्ञाधारकास) ही चिठ्ठी घ्या आणि छापखान्यांत नेऊन द्या. आणि वेताळपेठेंतून काकासाहेब नवरत्ने यांच्याकडून १६ वीचा कागद आणा इतक्यांत मीं रिकामा होतोच. [ आज्ञाधारक जातो ] [ सुविचाराचा हात धरून ] काय म्हणतोस बुवा ऐकूं दे मला.

**सुविचार**—तूं आपल्या पत्राचा टोन बदललास तर बरें पडेल. मला तुझी धडगत दिसत नाहीं. रोज तुझी कडक आर्टिकलें तुझ्या प्रतिस्पर्धी पत्रकारांच्या काळजाला घरें पाडताहेत. एकादे दिवशीं तरी पायावर धोंडा हाणून घेशील म्हणजे झालें कारण जळांत राहून उगीच माशाशीं वैर कशाला? कारण:—

पद [ चाल—वधू ही वल्ली ]

**समय विनाशी । असे । तूं मनिं न कां घेशीं ॥ धृ० ॥**

**दीपा सन्निध पतंग जातां ॥**

केसरी पाशीं गज तो येतां ॥
निर्बल सबलीं स्पर्धा होतां ॥
बलवानाची । होतसे सदां ती सरशी ॥ १ ॥

सत्य०–वा: आज मोठेंच पांडित्य चालवलें आहेस. बरें तें असो, पण मीं आपलें मन मोकळें करून तुला सांगतों कीं,

पद [चाल–'गंगा नदि ती सागर']

परम चतुर अती नीति कुशल हा राजा जगीं विलसे ।
प्रजापालनीं दक्ष असोनी समता राखितसे ॥ प० ॥
न्याय पद्धती अतर्क्य ज्याची कीर्ति गाजतसे ।
जनहित तत्पर सुजन मतातें संतत मानितसे ॥ प० ॥
पूर्व कालिच्या मोगल राज्यीं जेव्हां न्याय नसे ।
सत्य कथन तयिं करणें कवणा उक्त न तें भासे ॥प०॥
अन्यायाचा काळ न उरला सांप्रत हा ऐसा ।
सत्याचा जय होईल म्हणुनी तुजला सांगतसें ॥ प० ॥

पण हीं दुष्ट वर्तमान पत्रें आमची ओरड ऐकून तिचा भलताच अर्थ भासवितात यामुळें नाइलाज होतो. ठोठावल्याशिवाय कोणी द्वार उघडीत नाहीं; त्या प्रमाणें मागितल्याशिवाय मिळणें कठीण. मागणें हें आमचें काम आहे देणें हें दयाळू सरकारचें काम आहे ज्यानें त्यानें आपलें काम बजावें.

पद [ चाल--जा सांग जाउनी ]

कधिं हो न सफलरे आशा ॥

आत्म मनोगत हृदयीं ठेवितां ।
कोण कुणाची जाणे कुदशा ॥ क्रू० ॥
दुःख मनाचें कळवुनि सकलां॥
त्यास हराया सदुपायांला ॥
सुचवावें हा मार्ग आपुला ॥
तो आचरणें पात्र न दोषा ॥ क्रू० ॥

आतां भाषा कडक असते असें कदाचित तुला वाटत असेल. कारण प्रत्येकाचे विचार सारखे नसतात. पण एवढें मात्र मीं खात्रीनें सांगतों कीं मीं जें लिहितों तें सद्हेतु व्यतिरिक्त कधींच नसतें. खरें खरें लिहितांना जरा लेखणी तापत असेल पण ती स्वैर कधींही नसते. त्यांत बेकायदेशीर कधींही असण्याचा संभव नाहीं. शिवाय मला वाटतें,—

साकी. ( ताल धुमाळी. )

प्रजाजनाचें दुःख नृपाला कळवावें कोणीही।
स्पष्ट रीतीनें सत्य वदावें भीति अल्पही नाहीं।
भंग न शांतीचा । होई तयानें कधिं साचा॥

अरे आईजवळ मूल कधीं लडिवाळपणानें, कधीं रडून आरडून तर कधीं हट्ट करून व कधीं कधीं तर त्रागा करून ही एखादी गोष्ट मागतें ह्मणून मुलावर मातृद्रोहाचा अपराध शाबीद होईल का? अगर मूर्खपणानें माता बालकाचा नाश करण्यास प्रवृत होईल का? तीच स्थिति आमचे दयाळू सरकार आणि आपण यामध्यें लागूं करावयाची कारण—

केसरी पाशीं गज तो येतां ॥
निर्बल सबलीं स्पर्धा होतां ॥
बलवानाची । होतसे सदां ती सरशी ॥ १ ॥

सत्य०—वाः आज मोठेंच पांडित्य चालवलें आहेस. बरें तें असो, पण मीं आपलें मन मोकळें करून तुला सांगतों कीं,

पद [चाल—'गंगा नदि ती सागर']

परम चतुर अती नीति कुशल हा राजा जगिं विलसे ।
प्रजापालनीं दक्ष असोनी समता राखितसे ॥ प० ॥
न्याय पद्धती अतर्क्य ज्याची कीर्ति गाजतसे ।
जनहित तत्पर सुजन मतातें संतत मानितसे ॥ प० ॥
पूर्व कालिच्या मोगल राज्यीं जेव्हां न्याय नसे ।
सत्य कथन तयिं करणें कवणा उक्त न तें भासे ॥ प० ॥
अन्यायाचा काळ न उरला सांप्रत हा ऐसा ।
सत्याचा जय होईल म्हणुनी तुजला सांगतसें ॥ प० ॥

पण हीं दुष्ट वर्तमान पत्रें आमची ओरड ऐकून तिचा भलताच अर्थ भासवितात यामुळें नाइलाज होतो. ठोठावल्याशिवाय कोणी दार उघडीत नाहीं; त्या प्रमाणें मागितल्याशिवाय मिळणें कठीण. मागणें हें आमचें काम आहे देणें हें दयाळू सरकारचें काम आहे ज्यानें त्यानें आपलें काम बजावें.

पद [ चाल—जा सांग जाउनी ]

कधिं हो न सफलरे आशा ॥

आत्म मनोगत हृदयीं ठेवितां ।
कोण कुणाची जाणे कुदशा ॥ क० ॥
दुःख मनाचें कळवुनि सकलां॥
त्यास हराया सदुपायांला ॥
सुचवावें हा मार्ग आपुला ॥
तो आचरणें पात्र न दोषा ॥ क० ॥

आतां भाषा कडक असते असें कदाचित तुला वाटत असेल. कारण प्रत्येकाचे विचार सारखे नसतात. पण एवढें मात्र मीं खात्रीनें सांगतों कीं मीं जें लिहितों तें सद्हेतु व्यतिरिक्त कधींच नसतें. खरें खरें लिहितांना जरा लेखणी तापत असेल पण ती स्वैर कधींही नसते. त्यांत बेकायदेशीर कधींही असण्याचा संभव नाहीं. शिवाय मला वाटतें,—

साकी. ( ताल धुमाळी. )

प्रजाजनाचें दुःख नृपाला कळवावें कोणीही।
स्पष्ट रीतिनें सत्य वदावें भीति अल्पही नाहीं।
भंग न शांतीचा । होई तयानें कधिं साचा॥

अरे आईजवळ मूल कधीं लडिवाळपणानें, कधीं रडून आरडून तर कधीं हट्ट करून व कधीं कधीं तर त्रागा करून ही एखादी गोष्ट मागतें ह्मणून मुलावर मातृद्रोहाचा अपराध शाबीद होईल का? अगर मूर्खपणानें माता बालकाचा नाश करण्यास प्रवृत्त होईल का? तीच स्थिति आमचे दयाळू सरकार आणि आपण यामध्यें लागूं करावयाची कारण—

पद. ( चाल—झाल झाली कोपानें )

तोचि असे 'नृप' प्रजाजनाला ठेवितसे जो सुखसदनीं॥
सन्मानुनियां त्यास सदोदित पित्यापरी हा जन मानीं।तो०।
ज्ञानकलानां वाढवूनि त्यां नीतिशास्त्रापटु तो करुनी।
राष्ट्रहिताचे उपाय शोधी नविन कल्पना काढोनी।
राजनीति ही उक्त असे ती वागवूनियां सतत मनीं।
राजशकट तो हातिं धरितसे सुखासनीं हा मग बसुनी।तो०।

सुविचार—तें सगळें खरें. सरकार खरोखरच दयाळू आहे. पण हीं दुष्ट वर्तमानपत्रें तुझ्या नांवानें ओरडतात. कारण तुझा उत्कर्ष त्यांनां बिलकुल सहन होत नाहीं.

पद. ( चाल—जनकें संपादन केलें )

वदुं मी तुज किती या समयीं।
विनाश कालीं कोणि न येई उपयोगा पाहीं ॥ ध्रु० ॥
म्हणुनी सावध तू राही।
सत्य असुनि जरी विचार तव हे रुचति न कवणाही ॥१॥
जोंवरी संशय नच येई।
अधिकारी मन शांत असता कलुषित नच होई ॥२॥
नृप मनीं संशय जरा जाइ।
व्यर्थ संकटा पडशिल म्हणुनी उपदेशा घेई ॥ ३ ॥

करता आपण विचारानें रहावें आणि विचारानें वागावें. हें चांगलें.

सत्यव्रतः—राहूं दे रे तुझें पांडित्य. कारण.—

पद ( चाल—निर्धनतेतें लज्जा. )

प्रजाजनांचें नायकत्व जो घेई स्वशिरावरी ॥
मिळेना सौख्य तया लवभरी ॥
नृपनिर्देशा सुबोध करुनी सांगुनियां झडकरी॥
जनाला तुष्ट सदोदित करी ॥
दुःख तयाचें कळवायाला जाउनी नृप मंदिरी॥
तयाचें चित्त वळवुनि हरी ॥

याउपर तुझी मर्जी असेल तर उद्यांचा अंक निघाल्यावर पत्रच बंद करितों. तें एक वेळ पुरवेल.

सुविचार—इनकें निकरावर येण्याचें कांहीं कारण नाहीं मला सुचना करावीशी वाटली ती केली. तुझे जोंपर्यंत सद्‌हेतु आहेत तोंपर्यंत फारसें भय नाहीं ह्मणा पण—

पद [ चाल— थाट माट सदर्भि० ]

सत्य तसें स्पष्ट वचन नावडे सदां ॥
त्या योगें कठिण समयिं येति आपदा ॥ ध्रु० ॥
परोत्कर्ष सहन ज्यांस किमपि होइना ।
लौकिक तव बघुनि जयां होति यातना।
मत्सर मधुपान मत्त वितथ कल्पना ।
लढवुनि ते क्षुब्ध करिती भूप मन कदा॥ १ ॥
चिंतातुर मनुजाला विषय नासुचे ।
रोगानें पीडीत त्या अगर नारुचे ।
कामांधा व्यर्थ होति शब्द नीतिचे ।
नीति रीति तप्त मना ना रुचे कदा ॥ २ ॥

सत्यव्रत—मा ! हेवा करणारे करोत बिचारे! आमच्या

सरकारच्या न्यायीपणावर जोंपर्यंत माझा पक्का भरंवसा आहे तोंपर्यंत मीं यानां मुळींच भीक घालीत नाहीं.

सुविचार—तें तर अगदीं वाजवी. पण दिवसेंदिवस जास्त शत्रू करून घेणें कांहीं चांगलें नाहीं. तुझ्या लेखा-मुळें तुझीं प्रतिस्पर्धी वर्तमानपत्रें तुझ्यावर घोरपड आण-तील करितां मला जितकें सुचवितां आलें तितकें माझें कर्तव्य जाणून सुचविलें आहे. तेव्हां तूं सावध रहावें हें बरें.

सत्यव्रत—मीं सावध आहे चल—

साकी ( ताल घुमाळी. )

सर्व तयारी असे बघ गृहीं जेउनियां चल घेऊं।
शांति धरीं तूं सोडूनी चिंता स्वस्थ मनानें राहूं।
ठेवि न भीतीचा। मानसिं लवलेशहि साचा ॥

[ जातात. ]

## प्रवेश तिसरा.

स्थळ—आनंदभुवन नगरांतील बंगल्यांतील दिवाणखाना.

पात्रें—सुमामा आणि इंदुमती.

इंदुमती—किती दिवस तरी तूं येशील म्हणून तुझी वाट पहात होतें पण अलिकडे तूं अगदीं किलई उमराचं फूल झाली आहेस बाई.

सुभामा—पुरे मेलं तुझं हें बोलणं. नुक्ती नागपंचमीला येऊन गेलें. आठ दिवस देखील झाले नसतील. उगीच

आपले एखाद्याला टोमणे द्यायचे असं कांहीं तुला कोणीं बाळकडूंच घातलं आहे.

इंदु०—अहाहा! केवढी पण मोठी पडली किनई अगदीं माझे टोमणे ऐकून घ्यायला.

सुभामा—इंदु मी आपली मोठीमावडी आहे. तुझ्या सारखी पक्की नाहीं.

इंदु०—बरं तसं का होईना. पण गडे आतांशें भाउजी अगदीं तुला फुरसतच मिळूं देत नाहींत वाटतं.

सुभामा—इश्श! हें ग काय हें. मला हवी तेवढी फुरसत असते. तुमच्या सारखं नाहीं मिय्या नि बिबी हातांत हात घालून बसायचं. तुला ठीकच आहे:—

पद. ( चाल—सुखोपभोगा योग्य० )

पाटाला तो पाट लावुनी पति सन्निध बसुनी ।
मिष्टान्नातें जेउनि सिरविशि निशिदिनीं तूं सदनीं ।
केशरामिश्रित चंदन उटितें शरिरीं चर्चोनी ।
जाइ जुई मोगरी फुलांची वेणी घालोनी ।
उपधानासह कुसुमित शय्या पर्यंकीं करुनी ।
मिळति कराया विलास नूतन सौख्यीं राहूनी ।
अपार द्रव्या मिळवी तव पती कष्ट बहु करुनी ।
तुला तयाचें काय होय तूं दंग असासि पानीं ।

आणि मला ह्मणशील तर.

दासदासि तसि अलोट लक्ष्मी मजजवळी नसुनी ।
परोपरीचे विलास सुचति न पतिसह क्रीडोनि।

संसारांतील असंख्य कार्यें नित्य पहा करुनी ।
काळ लोटितें सौख्य तयांतचि मानुनि मीं सदनीं।

इंदुमती–थकलीस अगदीं काम करून माझी बाई किती वाळली तरीही. अगदीं हाड कसं तें दिसतच नाहीं. सारं आपलं मांसच.मला कांहीं काम नसतं असं कां तूं समजतेस.

सुभामा–सांग काय काम असतं तें.

इंदुमती–नोकर चाकरांवर देखरेख करायची असते हें अगदीं पहिलं काम समजलीस शिवाय तिकडचे कपडे वेळच्या वेळीं काढून ठेवायचे असतात, आणि म्हटलं लोंकरीचं पोतीचं विणकाम करायचं असतं.थोडीं कां झालीं हीं कामं ?

सुभामा–वाहवा ग रंभे.आणि तुझे कपडे काढायाचे लुगडं नेसायचं चोळी घालायची हीं बरी नाहीं कामं सांगितलींस नवऱ्याला पगार मिळतो मोठा, हापिसांत कामाचे गाडे ओढावे लागतात त्याला. आन तूं रावसाहेबीण फुकटच्या फाकटच.

इंदुमती–आणि तुझं अगदीं कमीच असेल भावोजीच्या शहाणपणाची सर्व जग तारीफ करतं आहे. इकडच्या रावसाहेबाची गोष्ट वेगळी. हापीसांत रावसाहेब पण भावोजीची केवढी प्रख्याती.–

पद. ( चाल–लक्ष्मी गर्वें. )

दैवशालि तूं असासि सुभामे मजला वाटतसे ।।
मिळे तुला पति ज्याची कीर्ति त्रिभुवनि गाजतसे।।
वंद्य जनाला होउनियां गे देवासम दिलसे ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

धन्य धन्य तव पूर्व पुण्यगे वाटे फळलेसे ॥
पूर्व जन्मि तूं दैवत कवणें सुमनें पुजिलेसें ॥
अमोल अनुपम अशा हिऱ्याचें छत्र तुला गवसें ॥
अल्प मिळे जरि द्रव्य परि ती कीर्ती वाढतसे ॥
कीर्ति उरते मार्गे परिगे द्रव्य न राहतसे ॥

सुभामा—बरं राहूं दे तें. मीं तुझ्याकडे आलें कशाकरितां आणि तुझं हें चऱ्हाट कुणीकडे.

इंदु०—आज एकूण कांहीं काम योजून आली आहे वाटतं स्वारी. असं काम तरी काय आहे.सांगशील तर खरं.

सुभामा०—परवां आमच्या काशीची मंगळगौर. दुपारीं चार पानं व्हायचीं तेव्हां वाढायला बोलावण्याकारितां आलें. बनेल कां पण.? भाउजी सोडतील कीं नाहीं.?

इंदु०—इश्श! तुझ्याकडे यायला कां आडकाठी. असं कधींच व्हायचं नाहीं हो.

सुभामा—अगदीं आठ वाजतां ये बरं कां माझ्या हाताशीं दुसंर कोणी नाहीं. अंग धुवायलाच तिकडे ये.

इंदु०—मला बलाऊ पाठवशीलना.बलावण्याबरोबर येईन. मग तर झालं कीं नाहीं.

सुभा०—हो बोलवण्या नी पायघड्या नकोत का!विहिण किनई तूं माझी.तुझ्याप्रमाणं माझ्या हाताखालीं अगदीं गडी माणसं झुलतच असतील.तें कांहीं नाहीं अगदीं बोलावण्याची वाट न पाहतां आलं पाहिजे.येते आतां.उशीर फार जहाला.

इंदु०—बरं बाई बोलावण्याची वाट न पहातां येईन झालं

आतां. पण जाशील. कुंकु लाव नी जा. यमू कोणग तिकडे? यमू तो कुंकुवाचा करंडा आण इकडे (यमुना करंडा आणिते आणि कुंकू लावते.) आपण ते साध्वीचं गाणं एकदां म्हणूं ग,–

सुभामा–बरं ह्मण तर.

सुभामा आणि इंदुमतीः–

पद (चाल–जाऊं कामाला)

न्यून नसे कांहीं! साध्वी। जेथ सतत राही ॥ धृ० ॥
सद्गुण सौंदर्यानें भुषवि नित्याचि जी तनुला ॥
संसारी जी दक्ष असोनी आळवि सकलांला ॥
मृदु मृधु भाषण बोलून अंतरिं ठेवी प्रेमाला ॥
सकलां आदर्शाचि होई॥ १ ॥
दैवबळें जरि द्रव्य मिळे तरि धरि नच गर्वाला ॥
येइ विपत्ती परि समयीं त्या राखी धैर्याला ॥
भवितव्यें जी मिळे स्थिती तींत मानि सौख्याला॥
सकलां आदर्शचि होई ॥ २ ॥
पतिची सेवा धर्म सतीचा वागवि नित्य मनीं॥
सुख दुःखाचा समान वांटा समयीं घेवोनीं ॥
मंत्रीसम जी सल्ला देते पतिला सुखवोनीं ॥
सकलां आदर्शाचि होई ॥ ३ ॥

[ पडदा पडतो ]

---

अंक १ ला. समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ इराण्याचें दुकान. दुकानांत इराणी साफसूफ करण्यांत गुंतला आहे इतक्यांत पडदा उघडतो. ]

पात्रें—असुरदत्त, विघातक, अनुत्कर्ष, वाचाल [प्रवेश करितात.]

असुरदत्त—आज एक्सलेन्ट टिफिन झाली पाहिजे. ए इराण लाव. चाय लाव चार कप. मावा केक दो. चीज केक वन. करन्ट केक एक. समजा.

इराणी—आय इल गिव्ह बेस्ट जनरल.

[ चहाचे कप भरावयास लागतो. ]

विघातक—दो बैदा लाव जलदी. और दो पुडिंगका प्लेट लाव.

इराणी—व्हेरी गुड बेस्ट जनरल आय इल गिव्ह यू.

अनुत्कर्ष—अरे हें लचांड कशाला आपण नाहीं झाला शिवणार बोवा.

वाचाल—गडबड मत करो. राजश्री घशांत कोंबीन समजलां.

असुरदत्त—देअर यू आर. नुस्ती फुकाची ऐट. एकटे आलांत, म्हणजे सगळें चालतें नाहीं? आणि मंडळींत असलां कीं लाज वाटते. इज दॅट इट. डॅम दॅट शेम.

विघातक—डॅम इट ऑफ कोर्स. मॉरल करेज नाहीं इतक्या ल्हान मोष्टींत.

आतां. पण जाशील. कुंकु लाव नी जा. यमू कोणग तिकडे! यमू तो कुंकुवाचा करंडा आण इकडे (यमुना करंडा आणिते आणि कुंकू लावते.) आपण ते साध्वीचं गाणं एकदां म्हणूं ग,-

सुभामा--बरं म्हण तर.

सुभामा आणि इंदुमती:-

पद ( चाल--जाऊं कामाला )

न्यून नसे कांहीं ! साध्वी । जेथ सतत राही ।। धृ० ।।
सद्गुण सौंदर्यानें भुषवि नित्याचि जी तनुला ।।
संसारीं जी दक्ष असोनी आळवि सकलांला ।।
मृदु मधु भाषण बोलून अंतरिं ठेवी प्रेमाला ।।
सकलां आदर्शाचि होई ।। १ ।।
दैवबळें जरि द्रव्य मिळे तरि धरि नच गर्वाला ।।
येइ विपत्ती परि समयीं त्या राखी धैर्याला ।।
भवितव्यें जी मिळे स्थिती तींत मानि सौख्याला ।।
सकलां आदर्शचि होई ।। २ ।।
पतिची सेवा धर्म सतीचा वागवि नित्य मनीं ।।
सुख दुःखाचा समान वांटा समयीं घेवोनीं ।।
मंत्रीसम जी सल्ला देते पतिला सुखवोनीं ।।
सकलां आदर्शाचि होई ।। ३ ।।

[ पडदा पडतो ]

---

अंक १ ला. समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ इराण्याचें दुकान. दुकानांत इराणी साफसूफ करण्यांत गुंतला आहे इतक्यांत पडदा उघडतो. ]

पात्रें—असुरदत्त, विघातक, अनुत्कर्ष, वाचाल [प्रवेश करितात.]

असुरदत्त—आज एक्सलेन्ट टिफिन झाली पाहिजे. ए इराण लाव. चाय लाव चार कप. मावा केक दो. चीज केक वन. करन्ट केक एक. समजा.

इराणी—आय इल गिव्ह बेस्ट जनरल.

[ चहाचे कप भरावयास लागतो. ]

विघातक—दो बैदा लाव जलदी. और दो पुडिंगका प्लेट लाव.

इराणी—व्हेरी गुड बेस्ट जनरल आय इल गिव्ह यू.

अनुत्कर्ष—अरे हें लचांड कशाला आपण नाहीं झाला शिवणार बोवा.

वाचाल—गडबड मत करो. राजश्री घशांत कोंबीन समजलां.

असुरदत्त—देअर यू आर. नुस्ती फुकाची ऐट. एकटे आलांत, म्हणजे सगळें चालतें नाहीं? आणि मंडळींत असलां कीं लाज वाटते. इज दॅट इट. डॅम दॅट शेम.

विघातक—डॅम इट ऑफ कोर्स. मॉरल करेज नाहीं इतक्या ल्हान मोष्टींत.

अमुत्कर्ष—अरे लोक काय ह्मणतील? कांहीं विचार करा आणि हा इराणी तरी मनांत काय ह्मणत असेल.

वाचाल—हंबक स्टुपीड पीपल दे आर अरे लोक ह्मणजे कोण समाजतोस तूं—

पद [ चाल-बूजम फ्रेंड तुम्हीं हे माझे० ]

मॉरल करेज तुमचें सारें विलया कां गेलें ॥ धृ० ॥
आजवरी जे लेक्चर केले व्हेन कसे झाले ॥तुमचें॥
रीझन ज्यानां नसे तयां जरी ॲक्सन ना रुचलें।तुमचें॥
व्हिगर जाऊनी माइंड तुमचें टिमिड कसें बनलें॥आ.जि.॥
बार्बर धोबी ब्रुट फोर्स जे त्यांनीं दूषियलें ॥तुह्मांला।
परसिव्हिरन्सही तुमच्या मनीं कां पूर्ण नसे भरलें।सांगे।

मग ह्या रासकल्सची परवा करण्याइतका जर तूं स्टुपिड फूल असलास तर गेट अवे, लीव्ह अस ॲट वन्स.

विघातक—एक्सॅक्टली. असल्या मंडईतल्या माळणींना भिऊन जर आम्हीं सत्य पक्षाचा त्याग करूं लागलों तर व्हेअर इज दी यूस ऑफ अवर एज्युकेशन.

पद ( चाल—साग साग, साग. )

नान्सेन्स नान्सेन्स नान्सेन्स स्टुपिडिटि।
सत्याचरण करावे अशि ड्युटि ।
यत्नें करुनीं ती शुअर्टी ।
इच्छित जावी कीर्तीची ।
मीनिंगलेस हें बोलुं नका।वद वदवीता काय फुका।
बोल्डनेस अंगीं नित्य धरा।भीतीला वीं मुळि न वरा।१।

[ सर्वजण चहा पितात. केकवर ताव मारतात व चिरूट पेटवून झुरके मारीत बसतात. ]

अनुत्कर्ष–मि.विघातक यू आर राईट. अरे हा सत्यव्रत पहाना. दिशा चुकली दुसरें काय ? आपल्या बरोबर होता कॉलेजमध्यें कोणीकडच्या कोणीकडे लिहायला लागला. नाहीं त्याला आगा नाहीं पिछा कडक लिहिण्याचें ठाऊक नुस्ते कडक लेख विदाऊट थॉट अॅन्ड नॉलेज काय उपयोग दे डोन्ट चार्म धी माइन्डस ऑफ दी एज्युकेटेड पीपल. दे आर फॉर तेली तांबोळीज. निव्वळ डोळ्यांत धूळ टाकायची आपल्याला नाहीं हें खपत आय हेट धिस.

विघातक–देअर यू आर. सत्यव्रताचें हें करणें अगदीं वाईट आहे. इतकेंच नव्हे तर धिस मस्ट बी रेमिडीड सम हाऊ ऑर अदर,अलीकडे पहातो तर त्याला लोक अगदीं देव मानूं लागले आहेत.

अनुत्कर्ष–हेंच तर मला खपत नाहीं.सत्यव्रताची चांगली खोड मोडली पाहिजे अहंमन्यता किती आणि तोरा किती! त्याला वाटतें माझ्या सारखा पॉप्युलर दुनयेंत मिळायचा नाहीं. अलीकडे तर तो फारच हेडस्टॉग बनत चालला आहे.

विघातक–यू आर राईट. मोठ मोठ्यांचा तो पाणउतारा करण्यास मागेंपुढें पहात नाहीं फाजीलपणा म्हणजे किती! ज्ञानानें अनुभवानें आजाच्या पदवीला जाऊन पोंचलेल्यांचा सुद्धां हा घटकोघटकीं उपमर्द करतो,[इराण्यास] ए इराण पुडिंगका प्लेट लाव.

इराणी–आछा साब.

वाचाल–ह्याला घमेंड फार झाली आहे. कसेंतरी करून खालीं ओढलाच पाहिजे. असला फाजील शिरजोरपणा अगदीं चालूं देतां उपयोगीं नाहीं. अगदीं टॉलरेशनच्या बाहेर गेलें. आतां छाटलेंच पाहिजे. पोर आडवें आलें तरी कापावें लागतें तेव्हां याची बिशाद काय! छाटून टाकला पाहिजे. आतां गमज्या चालूं देण्याची सोय राहिली नाहीं मस्ट लेव्हल टु धी ग्राउंड.

अनुत्कर्ष– आय डिझायर इट धी मोस्ट.नॉट फॉर माय सेक ऑफ कोर्स. बट फॉर कंट्रीज गुड.

वाचाल व विघात– यस् यस् यू आर व्हेरी राइट.

अनुत्कर्ष–(पुढें येऊन ) वाचाल आणि विघातक नुस्ते नंदी बैल आहेत. इकडून चापट मारली इकडे मान फिरवितात.तिकडून मारली तिकडे फिरवितात मीं आपल्या आंगच्या तरतरीनें आणि चकमकपणाच्या पाणीदारपणानें कित्येकांस ठार मुरळ घातली. माझ्या बोलण्याच्या सफाईला भुलला नाहीं असा एक तरी सांपडेल कां? ह्यामुळें माझें तेज हां हां ह्मणतां पडूं लागलें.मग काय जिकडे तिकडे माझी चर्चा झाली. मी प्रोफेसर हातखण्डे ह्यांच्या गळ्यांतला ताईत बनलो व नामदार श्रीखंडे यांचा तर मला पूर्ण पाठिंबा आहे. माझी सारखी धडपड चालली आहे नांवा "लौकिकाला" यायची. आणि धडपडीप्रमाणें मला यशाही येत चाललें आहे तेवढें झालें कीं

आमच्या अकलेची ध्वजा लागलीच. सत्यव्रताचे देव्हारे माजविण्याइतकें त्यानें केलें आहे तरी काय? पण हे लोक अगदीं मूर्ख आहेत. निव्वळ मठ्ठ मेंढरा सारखे—एकानें उडी घातली कीं दुसरा ही त्याच्या पाठीमागें. पण आपल्या हितासाठीं हा ओघ बदललाच पाहिजे.

( इतक्यांत अनुदार येतो. )

**अनुदार**—कसें काय? आपल्याशींच काय गुणगुणतां ? समथिंग सीरिअस.

**अनुत्कर्ष**—छे नान्सन्स. चल मंडळी काय चैन करताहेत तिकडे. पहाशील तर खरी.

**अनुदार**—हो, ओ लो, यू जन्टलमेन.

**सर्व**—ओ हू इज दॅट, ओ लो यू फुकट ग्रॅजुएट कम ऑन, कम ऑन. इराण लाव डयुक लिंबू लाव आईस और शरबत.

**अनुदार**—आय वॉन्ट सोडा.

**इराणी**—आछा साब सब सोडा.

**अनुदार**—नान्सन्स. एक सोडा और बाकीचा लिंबू समजला क्या.

**इराणी**—हं तेच्यामंदीं कांहीं फिकर नाहीं साब.

**वाचाल**—काय खबर आहे ताजी! गरमागरम.

**अनुदार**—तुला समजलें नाहींच वाटतें ? पिटी फॉर युवर बॅकवर्डनेस.

**अनुत्कर्ष**—फुकट ग्रॅज्युएट काय ह्मणतात.

विघातक—ही हॅज गॉट सम इंपॉर्टन्ट न्यूज. काय बोवा सांग पाहूं. डोन्ट मेक मच ऑफ इट फर्स्ट ओनली.

अनुदार-[कानांत सांगतो] अद्याप चांगलासा आधार नाहीं पण बातमी आली आहे.

अनुत्कर्ष—खरें कीं काय! कडक लेख लिहायला पाहिजेत नाहीं? घे म्हणावें सरकार कांहीं निजलें नाहीं मनांत आणीत नव्हतें तोंपर्यंत.मनांत आणल्यावर हो काय अवकाश! एका निमिषांत जमीनदोस्त करून टाकील. वाढवणार तेच आणि खची करणार तेच. त्यांच्यापुढें आमच्या गमजा कोठपर्यंत. पण हें सत्यव्रताच्या डोक्यांत येत नव्हतें ना. घे ह्मणावें आतां आपल्या चढेलपणाचें प्रायश्चित्त.

पद [ चाल—वाटे सर्वथा मुक्त झालों ]

वाटे सफल मम हेतु होती ।। ध्रु० ।।
आजवरि केतुसम पीडिलें बहु मला।।
येउनी ग्रहणीं मम उत्कर्ष रविला ।।
सुटुनि तें झडकरी होइ शांती।।वा० ।।
कंटकां काढुनी मार्ग शोधुनीयां ।।
होतसे सुलभ तो आक्रमाया ।।
तेंवि हा जाऊनी इष्ट साधी।। वा० ।।

विघातक—पण हें खरें कशावरून.

अनुदार—सो दे से. जास्त कांहीं सांगत नाहींत.

विघातक—आन्हिक पत्रांनीं त्याच्यावर झोड उडविली आहे त्याचा तर हा परिणाम नसेलना?

अनुदार–बहुधा त्याज्ञाच. आणखी शिवाय"करारी"या सहीनें अलीकडे जो पत्रव्यवहार येतो त्यानें ही आगींत तेल ओतण्यास मदत झाली असावी.

अनुत्कर्ष–[एकीकडे] बी दॅट ॲज इट मे. बातमी खरी असल्यास सत्यव्रताचा चांगलाच समाचार घेतां येईल. असें हें व्हायलाच पाहिजे होतें. ठीक आहे, ईश्वर अजून माझा पाठीराखा आहे तर मग मीं कोणालाच भीत नाहीं मीं आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्यानें अनेक प्रसंग अनुकूळ असे घडवून आणले. सत्यव्रताचा. ज्या मंडळीशीं स्नेह व ज्या मंडळीला त्याच्यावांचून एकक्षण करमायचें नाहीं. त्यांना अगोदर कलागती लावून फोडले. एकाक्षाला नाचवणारा मींच. तो क्षुद्रबुद्धि काय करणार होता पण दोऱ्या माझ्या हातांत असल्यामुळें त्या एकाक्षाकडून सपशेल नुकसानींत आणला. पैशापरी पैशाचें नुकसान आणि अब्रूपरी अब्रूचें नुकसान व्हायला पाहिजे होतें पण तसें साधलें नाहीं. तरी पैशाचें नुकसान इतकें झालें कीं स्वाभिमानाच्या बळीं पडल्यामुळें सात हजारांच्या खाड्यांत त्यास यावें लागलें. आतांच्या प्रसंगांत त्याची अब्रू हानी झाली पाहिजे. वेळ आली आणि जागच्या जागीं निजला अगर दे शोधडीला लागला तरी हरकत नाहीं. [उघड] वेल आर नॉट युअर हंगर्स साटिसफाइड.

बाचाल–अरे वारे साधू.आपण कमीच केलें असेल!पण हा फुकट ग्रॅजुएट मागाऊन आला आहे त्याला आग्रह करा कांहीं.

अनुदार—मला साफिशंट झालें पण वर जरा झणझणीत पाहिजे. कसें वाचालराव ?

वाचाल—एक्झाक्टली यूआर राईट.

विघातक—अरे पण येवढ्या रात्रीं मिळेल कुठें?मिळालें तर आपली हरकत नाहीं.

अनुदार—त्याची तजवीज मी करितों. आयसे मि. खुदाबक्स कम ऑन.

इराणी—साब.

अनुदार—( त्याच्या कानांत सांगतो ) चल, जल्दी मंगाव, मेक हेस्ट.

अनुत्कर्ष—पण हें कसें बोवा चालावें. ठीक नाहीं येवढें पोट भरल्यावर.

अनुदार—ठीक नाहीं.अन्न जास्त झाल्यावरच जास्त मजा आहे. अर्वाचीन कवी काय म्हणतो. ऐकलेंस कां? (गातो)

पद.

जो नर दारु नाहिं प्याला।तयाचा जन्म व्यर्थ गेला।।ध्रु०।।
जन्मा येऊनि सेवन न करी जो नर हा मधुप्याला ।।
जळो तयाचें वैभव धन तो जिवंत असुनिही मेला।।१।।
रोग जाळुनी पुष्ट करोनी देइ तोष शरिराला ।।
ज्ञाते ऐसें म्हणती म्हणुनी सेवा हो तुम्हि इजला।।२।।
हे मधु सेवुनि ब्रम्हानंदीं दंग न जो नर झाला ।।
केलें कायचि जन्मुनि त्यानें सांगा हो तुम्हि मजला।३।
उठा उठा हो दारु प्या हो ऐसें कां तुह्मि बसलां ।।

स्वर्गसुखातें सेवा ऐसें सांगतसे तुम्हांला ॥ ४ ॥

( इराणी ग्लासेस व बाटली आणून देतो. )

(बाटली हातांत घेऊन) ओ, लो, क्या मजाहै.

पद

शराब हो बहु गोड॥अमृत जणुं॥ धृ० ॥
श्रांत मनाला शांत करितसे ॥
अन्य नसे या जोड ॥ १ ॥ खरोखर॥
सुखकर रुचकर मधु हे घेउनी ॥
लय लागे बिनतोड ॥ २ ॥ खरोखर॥

(सर्व–हा हा हा हा हंसतात.)

[सर्वांस पेले भरून देऊन.] हं गो ऑन, टेक इट आय से, ओ यू फुकट ग्रॅज्वेट हें असलें येथें बिलकुल खपणार नाहीं घेतोस का ओतूं घशांत.

[ पितात. व पुन्हां पेला भरून दारूच्या धुंदींत. ]

पद ( चाल–पियो पियोजी )

सुधा सुधा करि ही दंग सदा मन ॥
दंग सदां मन होऊनि तल्लिन ॥
सुरा सुरांनां दुर्लभ जी खलु ॥
सेवुनि गाऊं तिचे सतत गुण ॥सु०॥
सौख्यागारीं बसवि सदोदित ॥
जो करि नित्याचि तिचें भजन ॥सु० ॥

[सर्व दारु पिऊन तर्र होऊन पडतात. ] [पडदा पडतो.]

## प्रवेश दुसरा.

स्थळ—रस्ता [ दोन गृहस्थ प्रवेश करितात. ]

१ला—कसें काय अलिकडे भेटत नाहींस अगदीं?

२रा—हा काळच बोवा चमत्कारिक आला आहे. तेव्हां ज्यानें त्यानें आपल्याशीं चुरमुरे खात बसावें हें चांगलें जरा कुंठें दोन माणसें कुजबुजतांनां ऐकिलीं कीं संशय येतो.

१ला—होय बाबा ह्या भयंकर कृत्याचा जर पत्ता लागणार नाहीं, तर आमचें नष्टचर्य पुरें ओढवलें ह्मणायचें. मग हा डाग आमच्या कपाळीं कायमचाच रहाणार.

२ रा—दिवस अगोदर कशा तऱ्हेचे चालले आहेत ! एक वर्षाआड बहुतेक अनावृष्टी नाहींतर अतिवृष्टी होऊन दुष्काळ दाराशीं कायमचें धरणें देऊन बसला आहे. निर-निराळे छपन्न हजार रोग आहेत ते पुरेन होऊन परमेश्वरानें आणखी हें एक नवेंच शुक्क काष्ट पाठवून दिलें, अशा एक का दोन अपेष्टा व त्रास सांगावे! इतकें ही सोसून रयत नशिबावर हवाला टाकून बसली होती, तोंच आणखी संकट येऊन राजकोप कां होऊं नये? म्हणतात ना संकटें येऊं लागलीं कीं तीं एकापाठीमागून एक यायचींच.

१ ला—खरेंच बाबा! अगोदरच आपल्या शहरांतल्या लोकांच्या वर्तनावर सरकारची करडी नजर आहे. प्रत्येक गोष्टीकडे व हालचालीकडे त्यांचें अगदीं बारकाईनें लक्ष असतें. येथले लोक फसाटे करणारे कावेबाज आणि खुनशी

असा कारभाऱ्यांचा फारा दिवसांचा ग्रह झालेला आहे तोंच कोणा चांडाळाला ही अवदसा आठवली कोण जाणे? त्यानें तर अधिकारी वर्गांत फारच अस्वस्थता उत्पन्न केली आहे!

२ रा—कां अस्वस्थता उत्पन्न होणार नाहीं बरें? आंगाला आग लागल्यावांचून कशी राहील? प्रजेच्या कल्याणासाठीं सदोदित झटून जर त्याचें हें असें बक्षीस मिळतें तर कां नाहीं काळजाचे तुकडे होणार! सोन्यासारखे दोन मोहरे नाहींसे झालेना! कांहीं थट्टा नाहीं राव? हा विचार कां बरें वरचेवर मनांत येऊं नये? मी म्हणतों हें सरकार विकारवश व्हायला उशीर लागतो हें आमचें नशीब थोर म्हणायचें. हीच मोंगलाई पाहिजे होती, म्हणजे ज्यांच्या ज्याच्यावर संशयाचा छटा उडाला असता त्यांस पहिल्यानें तोफेच्या तोंडीं दिलें असतें नाहींतर आंगाला चिंध्या बांधून त्यावर तेल ओतून जिवंत पेटविलें असतें मग पुढला विचार समजलें. पण तसें धूम तडाक्यानें कोणतेंही कृत्य अविचारानें ह्या अमदानींत होत नाहीं, ही आमची बलवत्तर पुण्याई समजली पाहिजे, नाहींतर आज शहरांत रहायला नको होतें.

१ ला—माझें तर ह्मणणें असें आहे कीं हें कृत्य अगोदर कोणी करायला नको होतें. पण आतां जर तें होऊन चुकलें तर त्यानें आपण होऊन पुढें यावें आणि असलें नीच हरामखोरीपणाचें काम मीं केलें ह्मणून कबूली द्यावी ह्मणजे सगळ्या शहराला आलेला काळिमा तरी नाहींसा होईल.

२ रा—होय! तुह्मीं म्हणतां तें बरोबर; कारण संशयपिशाच्च-

का काय अनर्थ करील कोण जाणें! पण काय हो हें कोणीं केलें असावें? कांहीं चालतो का तुमचा तर्क? आणि असलें नीच पण धडसाचें कृत्य करण्यांत त्याचा काय हेतू असावा बरें?

१ला—कांहींच सुचत नाहीं! जोंजों जास्त विचार करावा तों तों माझें डोकें अगदीं गोंधळून जातें तरी एक वेळ असें वाटतें कीं हें कृत्य करणारा मोठा धाडशी व खुनशी असून अशिक्षित माथेफिरू असावा.

२रा—त्याला काय वाटलें असेल त्यांचा तोच जाणे? तूर्तच्या जुलमांतून सर्वांची सुटका करण्याचा तर त्याचा विचार नसेल ना?

१ला—तुह्मीं त्यास पाहिजेल तर जुलूम असें ह्मणा; पण मीं नाहीं तसें ह्मणायला तयार! कोणतीही नवी पद्धत अगदीं प्रथम अमलांत आणणें ह्मणजे ती जुलमाची आहे असें वाटायचें हा आपला नियम आहे! पण खरोखर ती जुलमी नसतेच. आणि ती तशी जुलमी वाटते ह्याचें कारण ती आंगवळणी पडलेली नसते हेंच होय! अहो हा रोग इतका चमत्कारिक आहे कीं त्यावर इतकीं विद्वानांचीं डोकीं खर्ची पडत असूनही त्यापासून निष्पन्न कांहींच होत नाहीं. त्याचें धड निदान होत नाहीं मग उपचार तर फारच लांब राहिले. दयाळू सरकारानें केवळ प्रजेच्या हिताकरितां निरनिराळ्या राष्ट्रांतून धन्वंतरी बोलावले. त्यांचा लक्षावधि रुपये खर्च सोसला तो कशाकरतां प्रजेच्या हिताकरतां नव्हे असें कोण बरें ह्मणेल? आतां त्याचे तें सर्व प्रयत्न निष्फळ झाले ही गोष्ट वेगळी! ह्मणून सरकार प्रजेची कळक-

ळ वहात नाहीं असें ह्मटलें तर कसें चालेल. सरकार तरी मनुष्याच्या शक्तीपलीकडलें कांहीं दैविक शक्तिचें नाहींना. त्याच्याकडून खटपट व्हायची ती होत आहेना. यश येणें आमचें नशीब. हाच रोग हजार का पंधराशें वर्षां पूर्वी आ-ला होता, तेव्हां त्यानें गांवचे गांव उध्वस्त आणि बेचिराख करून टाकले होते पण आमच्या दयाळू सरकारच्या प्रयत्नानें तितका पल्ला रोगाला धरतां आला नाहीं. ही का कमी समाधानाची गोष्ट आहे. आतां आपल्या प्रजेच्या हितासाठीं आपल्या प्रजेवर आपल्या अधिकाराची अम्मल बजावणी करितांना जरा कडक रीतीचा अवलंब करावा लागत असेल नाहीं असें नाहीं साम दाम उपचार प्रजेनें सुचवावयाचे होते त्यानां कोण नको ह्मणत होतें.

२ रा—तें तर खरेंच. पण कायहो सरकारचा आतां आपल्या शहरांतल्या लोकांचा बेभरंवसा झाला असेल नाहीं?

१ ला—अलबत! कां नाहीं होणार! त्यानां असें वाटत असलें पाहिजे कीं हें कृत्य करण्याच्या वेळीं कांहीं कट होता! कीं कसें? एका व्यक्तीनें हें काम केलें कीं मुळाशीं पुष्कळ लोक आहेत. ते सुशिक्षित आहेत कीं अशिक्षित आहेत. त्यांचे आणखी कांहीं दुष्ट हेतु आहेत कीं काय? असा चव्हाटयावर राजद्रोह वावरण्याचें मूळ कोठें आहे इत्यादि विचारांनीं त्याचें मन गढून गेलें असलें पाहिजे. आणि अशा भयंकर गोष्टीनंतर असल्या हजारों कल्पनांनीं

डोकें पिकून जाणें अगदीं सहाजिक आहे.

२ रा—मग एकूण सरकारचा आमच्यावर अनावर कोप झाला असेल असाच तुमच्या बोलण्याचा भावार्थ ना?

१ ला—अहो भावार्थ कशाला अगदीं हेच शब्द मी बोलतों. आणि या रागाच्या भरांत आमच्या शहारावर कोणकोणचीं अरिष्टें येतील कोण जाणे जितकीं येतील. तितकीं थोडींच सारांश दिवस वाईट येत चालले इतकें खरें.

२ रा—होय बुवा परमेश्वर करो आणि त्या दुष्ट चांडाळांचा पत्ता लागो म्हणजे आमच्यावरील सरकारचा क्रोध तरी नाहींसा होईल. आम्हांस या सुखकर राजछत्राखालीं आनंदाचा लाभ मिळो. चला उशीर झाला वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे. एवढी मात्र तूर्त गोष्ट खरी.

[ जातात. ]

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—सत्यव्रताचा दिवाणखाना.

पात्रें—सत्यव्रत आणि सुभामा.

[ दोघें कोचावर बसलीं असतां पडदा उघडतो. ]

सुभामा—जाणें होत आहे पण लवकर परत यायचं होईलना? येईपर्यंत माझे अगदीं वाटेकडे डोळे लागतील.

सत्य०—घरांत मुलें आहेत बाळें आहेत त्यांच्याबरोबर बोलून हंसून वेळ काढावा.

सुभा०—देवाच्या दयेनें मुलं बाळं सगळीं आहेत. मीं

नाहीं का ह्मणते पण आपण जर घरांत नसायचें तर मला अगदीं कसंसच होतें. घर अगदीं खायला येतं. धड काम हाताला लागत नाहीं. अन मी अगदीं भांबाऊन जाते. तेंच नजरेसमोर कुणीं असलं कीं मला कशाची सुद्धां परवा वाटत नाहीं.

पद [ चाल—अरसिक किती हा शेला ]

असति स्त्रिया या अबला।परतंत्रें जगीं राहुनि विमला॥
चढती थोर पदाला । पति सहवासे होउनि प्रबला ॥
मानिति तुच्छ जगाला।रवि तेजें द्युति ये जरि शशिला॥
होतो सुखद जनाला । तैसें वैभव येतें स्त्रीला ॥
मिळतां कीर्ति पतिला।सुखशिखरीं पति नेई तिजला।अ०।

सत्य०—तें खरें पण—

पद ( चाल—नाहीं सुभद्रा या वार्तेतें. )

पत्नीचें सुख दुःख पतीवर अवलंबुनि राहे ॥
सर्वतोपरी पराधीन ती सत्य गमे मज हें ॥ध्रु० ॥
कुमारिका तोंवरी पित्याच्या आधिन ही राहे ॥
पाणिग्रहणानंतर पतिच्या आधिन गे राहे ॥
पुत्रवती निज अर्भकलीला पाहुनि लवलाहे ॥
क्षणभर रमवी निज मन संतत भेद असे पाहे ॥प०॥

ह्मणून मूल झालें ह्मणजे पुरूष बायकांच्या ऋणांतून मोकळे झाले असें शास्त्रकारांचें ह्मणणें आहे. मग स्त्रियांच्या प्रेमाची स्थानें त्यांचीं आर्भकें असायचीं.

सुभा०—पुरे झालें तें शास्त्रकारांचें चऱ्हाट कांहीं तरी

मेले भरकटतात झालें. माझा नाहीं त्यांच्या या म्हणण्यावर विश्वास.

सत्य०—त: एकुण आपण शास्त्राकारांच्या वर नंबर मिळवणार तर.

सुभा०—तें कांहीं कां असेना! माझी अशी थट्टा नको करायला. पण लवकर परत यायचें खचित होइलना मला परवांच्या गोष्टी ऐकून भारी बाई भय वाटलें मला एकटीला खरोखरच भीति वाटते. मींच आपली बरोबर येत्यें म्हणजे झालें. ताई मुलांना संभाळिल कसं?

सत्य०—छे. तें कांहीं जमणार नाहीं. पण मीं लवकर येईन. अगदीं चार दिवसांत परत येतो मग झालें कीं नाहीं

सुभामा—पहा हो अगदीं लवकर आलं पाहिजे बरं पण परवां भावोजी अगदीं बजावून नी खरावून काय सांगत होते ते नाहीं कां मला सांगायचं.

सत्य०—त्यांत कांहीं हांशील नाहीं तो नसत्या आरिष्टाच्या कल्पना काढून भितो दुसरें काय?

सुभामा—पण इकडे पहा आधीं कांहीं संकट नाहींना आपल्यावर यायचं? खरंच नको मेली ही दगदग. एखादी चाकरी असली म्हणजे जिवाला ही कसलीच मेली हुरहुर नको होती.

सत्य०—तूं अगदीं वेडी आहेस. मला चाकरी जर करायची असती तर हवी तेव्हां हव्या त्या मोठ्या हुद्याची मिळाली असती आणि अजूनहि मिळेल पण हवी आहे

कुणाला ती उठाठेव. परवशतेपेक्षां ज्यानें त्यानें स्वतंत्रतेनें आपल्या कर्तबगारीच्या जोरावर आपला शेर मिळवावा. अगदीं यःकश्चित लहान दर्जाच्या नौकरापासून तों तहत मोठ्यांच्या मोठ्ठी पगार मिळवणाऱ्या रावसाहेबांपर्यंत सर्वांची रड एकच. जरी नौकरींत पुष्कळ पैसा मिळाला तरी वारंवार होणारी मानखंडना आणि अपमान या पेक्षां मरण सुद्धां बरें वाटतें. वरिष्ट अंमलदार खालच्याला हा आपला टाकून बोलायचाच चूक झाली तरी बोलायचा आणि न झाली तर त्याची लहर लागली ह्मणून बोलायचा. तो आपल्या अधि. काराच्या जोरावर. पाहिजेल ते चोंचले करील ते कसे तरी सोसले पाहिजेत. पण खालच्या नौकरानीं ते केले तर त्याच्या पायांची आग मस्तकाला जाऊन पोहोंचते. अमलदार नेहमीं असें समजत असतो कीं, माझ्या हातून चूक कधींही होणार नाहीं. तशांत बडा अम्मलदार जर का लहान जागेवरून नशीबाच्या जोरावर एखादा मोठा साहेब बनला असला तर मग त्याला जें उसनें अवसान येतें आणि नस्ती विद्वता प्राप्त होते ती कांहीं अनर्थच. तेव्हां असल्या यातायातीपेक्षां मीं आपल्या स्वतःच्या मतालाच जास्त मान देतो. [उठून पुढें येऊन] बरें तांगा आणायला सांगितला होता तो आला का पहा ( इतक्यांत गदाधर येतो. )

गदाधर—तांगा आला आहे.

सत्यव्रत—तर मग माझी वळकटी आणि पगडीचा डबा बांधून ठेव. [सुषमेस] मीं जातों तूं काळजी करूं नकोस.

मेले भरकटतात झालें. माझा नाहीं त्यांच्या या म्हणण्यावर विश्वास.

सत्य०—त: एकुण आपण शास्त्राकारांच्या वर नंबर मिळवणार तर.

सुभा०—तें कांहीं कां असेना! माझी अशी थट्टा नको करायला. पण लवकर परत यायचें खचित होइलना मला परवांच्या गोष्टी ऐकून भारी बाई भय वाटलें मला एकटीला खरोखरच भीति वाटते. मींच आपली बरोबर येत्यें म्हणजे झालें. ताई मुलांना संभाळिल कसं?

सत्य०—छे. तें कांहीं जमणार नाहीं. पण मीं लवकर येईन. अगदीं चार दिवसांत परत येतो मग झालें कीं नाहीं

सुभामा—पहा हो अगदीं लवकर आलं पाहिजे बरं पण परवां भावोजी अगदीं बजावून नीं खरावून काय सांगत होते ते नाहीं कां मला सांगायचं.

सत्य०—त्यांत कांहीं हांशील नाहीं तो नसत्या आरिष्टाच्या कल्पना काढून भितो दुसरें काय?

सुभामा—पण इकडे पहा आधीं कांहीं संकट नाहींना आपल्यावर यायचं? खरंच नको मेली ही दगदग. एखादी चाकरी असली म्हणजे जिवाला ही कसलीच मेली हुरहुर नको होती.

सत्य०—तूं अगदीं वेडी आहेस. मला चाकरी जर करायची असती तर हवी तेव्हां हव्या त्या मोठ्या हुद्याची मिळाली असती आणि अजूनहि मिळेल पण हवी आहे

कुणाला ती उठाठेव. परवशतेपेक्षां ज्यानें त्यानें स्वतंत्रतेनें आपल्या कर्तबगारीच्या जोरावर आपला शेर मिळवावा. अगदीं यःकश्चित लहान दर्जाच्या नौकरापासून तों तहत ओझींच्या ओझीं पगार मिळवणाऱ्या रावसाहेबांपर्यंत सर्वांची रड एकच. जरी नौकरींत पुष्कळ पैसा मिळाला तरी वारंवार होणारी मानखंडना आणि अपमान या पेक्षां मरण सुद्धां बरें वाटतें. वरिष्ठ अंमलदार खालच्याला हा आपला टाकून बोलायचाच चूक झाली तरी बोलायचा आणि न झाली तर त्याची लहर लागली ह्मणून बोलायचा. तो आपल्या अधि-काराच्या जोरावर. पाहिजेल ते चोंचले करील ते कसे तरी सोसले पाहिजेत. पण खालच्या नौकरानीं ते केले तर त्याच्या पायांची आग मस्तकाला जाऊन पोहोंचते. अमलदार नेहमीं असें समजत असतो कीं, माझ्या हातून चूक कधींही होणा-रच नाहीं. तशांत बडा अम्मलदार जर का लहान जागेवरून नशीबाच्या जोरावर एखादा मोठा साहेब बनला असला तर मग त्याला जें उसनें अवसान येतें आणि नस्ती विद्वता प्राप्त होते ती कांहीं अनर्थच. तेव्हां असल्या यातायातीपेक्षां मीं आपल्या स्वतःच्या मतालाच जास्त मान देतो. [उठून पुढें येऊन] बरें तांगा आणायला सांगितला होता तो आला का पहा ( इतक्यांत गदाधर येतो. )

गदाधर—तांगा आला आहे.

सत्यव्रत—तर मग माझी वळकटी आणि पगडीचा डबा बांधांत ठेव. [सुभामेस] मीं जातों तूं काळजी करूं नकोस.

साकी. [ ताल धुमाळी ]
कार्य करोनी परत पहा मीं झडकरी येईन सदनीं ।
शिणवुं नको तूं काया आपुली काळजिते वाहोनी ।
राही स्वस्थ मनीं ॥ विलंब होतो बघ गमनीं ॥
( जातात. )

---

## प्रवेश चवथा.

स्थळ–रामरावाचा दिवाणखाना.

पात्रें–रामराव, विनायकराव, भास्कराचार्य, चित्तोपंत, फाकाजीराव व ताराजी.

[ सत्यनारायणाची पुजा होऊन मंडळी बसून नायकीणीचें गाणें चाललें असतां ]

नायकीण–

ठुंबरी.

परदेशी सयां दिनवा बहुत गये बीत ॥ धृ० ॥
उमदा जोबन मानत नहीं सयां कोन गामकी रीत॥प०।

रामराव–वः ताराजी खूप बहार केलीत हं चालूं द्या.

नायकीण–(मुजरा करून)

ठुंबरी.

आलि प्रिया बिन मोरा कैसा जिया तरसत ॥ बदना, छाये पवन पुखाये दामिनी दमकत मेघवा बरसत । सगरी सहेरी फेर आलबेली अपने मंदीर बिच हम है अकेली । हकिम पियासो कहि ओ

जाइये तुह्मां बिन रेन पीत मोहे देत रसत ॥ १ ॥

विनायकराव—वाःखाशी! क्या लज्जत है. ताराजी तुमचा कंठ मधुर आहे हा का मुळचाच का कांहीं उद्योगानें इतका मोहक बनावला आहे.

चितोपंत—अहो बनवला कसला! पोतींच्या पोतीं पत्र्याची खडीसाखर रिचवली असेल ना या लहानशा दिसणाऱ्या नरड्यांत!

फाफाजी—अरे तुमचा सगळ्यांचाच तर्क चुकला इतका आवाज कां गोड तें मीं सगळें समजलों.

विनायक—काय तें सांगाल तर खरें?

फाफाजी—सांगतो. हं ह्मणा.

रामराव—हूं रे काय ह्मणा सांगितल्याशिवाय.

फाफाजी—सांगतो ह्मटल्यावर खात्रीनें सांगणार!इतकेंच नाहीं तर अगदीं इत्थंभूत सांगणार! अगदीं बेमालूम सांगणार तुमच्या सर्वांच्या अक्कला गुंग होतील असें सांगणार नक्की सांगणार! ऐका तर.

विनायक—प्रस्तावना पुरे झाली नाहींना अजून?

फाफाजी—सांगतों खास तुम्ही ऐकायला मात्र तयार व्हा.

चित्तोपंत—अहो आम्ही कांहीं निजलों नाहीं इतका वेळ.

फाफाजी—तुम्ही निजलेत तरी हरकत नाहीं पण मीं सांगेन तें ऐकायला मात्र तयार व्हा.

रामराव—नान्सन्स. ताराजी होऊं द्या आणखी एखादी अशीच झोंकदार.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

फाफाजी– पण अगोदर यांच्या कंठमाधुर्यत्वा बद्दलचें कार्याकारणत्वं तुम्ही माझ्यापासून विश्रुत करण्याचा अवलंब करणार ना आतां फार अनुलंब करणार नाहीं. अगदीं अनुकुंराचित सूक्ष्मपणानें वदन करतों मी. ताराजी कांहीं एक प्रसंगीं एका नाटयकला संगीत मंडळीचा मृच्छशकट कीं कायसा खेळ आहे तो विलोकन करण्यास आगमन करत्या झाल्या होत्या त्या नाटकांत शकार ह्मणून जें पात्र आहे त्याचा विकंपनीय मित्र चारुदत्त त्याची बायको वीट आणि त्याचा गाडीवान वसंतसेना यांचा संवाद आहे. त्यांत कोकिलकलवरप्राप्तत्वासाठीं त्याच पक्षाचें मांस अभक्षण करीत होत्साते कंठ चांगला होतो. [ताराजीस] वेल जन्टलमन ताराजी माझें सकारण निवेदन बिगर चूक अस्थित्वांत आहे कीं नाहीं.

रामराव–हो अगदीं बरोबर [ भास्कराचार्यास ] काय भास्कराचार्य आतां काय ह्मणूं दे ताराजीला.

भास्करा०–अशीच होऊं द्या एखादी चीज ठसकेदार एव्हांशींच प्राकृतावर नको यायला.

विनाय०–ताराजी हं चालूं द्या.

ताराजी–(मुजरा करून.)

['देखो सखी कन्हया रोके' ही ठुंबरी ह्मणते]

विनायक–अगदीं ठीक केलेंत बोवा.

फाफाजी–मग प्रसरण करण्यास गमन केलें पाहिजे.

विना०–(ताराजीस)ताराजी आतां मंडळीच्या इच्छेप्रमाणें कांहीं प्राकृत होऊं द्या.

चिंतो०—विनायकराव आपल्या ताराजी 'पंचकल्याणी' ही चीज फारच मारू ह्मणतात.

रामराव—अहो ती चीजच तशी मारू आहे. बरी बोवा आठवण केलीत. ताराजी होऊं द्याच तर ती आतां.

ताराजी—[मुजरा करून 'पंचकल्याणी' ही चीज ह्मणते]

सर्व—बहोत खाशी. आज आनंदसमुद्रांत पोहायला लावलें ताराजनीं.

[ ताराजी मुजरा करून जाते व सत्यव्रत आणि सुविचार प्रवेश करितात. ]

सुविचार—आपल्याला रामरावाच्या येथें सत्यनायराणाच्या पानसुपारीला जायचें आहे.

सत्य०—मग उशीर नाहीं कां झाला?

सुविचार—खरें पण गेलें पाहिजे.

सत्य०—चला तर.

रामराव—[ सुविचारास पाहून व नमस्कार करून ] काय अण्णासाहेब फार लवकर आलांत बोवा.

सुविचार—तसें नव्हे रामराव मी येणार होतों अगोदरच पण आमचे मित्र आले त्यांना तुमची व तुम्हांला त्यांची ओळख करून देण्याकरतां इकडे घेऊन आलों. रामराव समजलेंत कां हे कोण ते. विनायकराव जनसेवा पत्र गाजत आहे त्याचे हे एडिटर.

रामराव—ठीक आमच्यावर उपकारच झाले म्हणायचे

( ते सगळे जागेवर बसतात आणि शिपाई प्रवेश करतो. )

शिपाई–हातीं घेतलेलें काम बजावणें हें आपलें कर्तव्य [ पुढें होऊन सुविचारास खुणावतो व सर्व मंडळी आश्चर्य चकित होते ] सत्यव्रतावर वारंट आहे तेव्हां त्यानां आमच्या स्वाधीन झालें पाहिजे. त्यानां एकीकडे घेऊन हा मजकुर कळवा.

सुविचार–इतक्या आकस्मिक रितीनें ही कुऱ्हाड सत्यव्रताच्या माथीं पडावीना! ( सत्यव्रतास खूण करून ) हें ऐकून तुला काय वाटेल त्याची मला कल्पना होत नाहीं. हें वारंट तुला पकडण्यासाठीं असून त्याप्रमाणें तुला त्यांच्या स्वाधीन झालें पाहिजे.

सत्यव्रत–मग त्यांत तूं इतका घाबरलास कां. दुःख करूं नको आणि घाबरूंही नको. होणार ते मोठमोठ्यांस ही टळत नाहीं तेथें माझा काय पाड. पण हें पहा आपलें सरकार न्यायी आहे. आणि आपण न्यायी आहों असें बोलण्यास आणि त्याप्रमाणें वागण्यास त्यांस भूषण वाटतें. ही गोष्ट कांहीं सामन्य नव्हे. आणि शिवाय त्यांच्या न्यायीपणावर माझा पूर्ण विश्वास आहे तेव्हां हें जें माझ्यावर भ्रांतीच्या ढगाचें काहूर आलेंसें दिसतें तें न्याय सुर्याच्या किरणांनीं नाहींसें होऊन आमच्या सरकारचें न्यायत्व आणि दयालुत्व हीं शेवटीं खचित खचित प्रगट होतील. याविषयीं मला काडीमात्र संशय नाहीं मात्र धीर धरला पाहिजे प्रसंगोपात विकारवशतेमुळें आई मुलावर रागावली आणि तिनें त्याला कांहीं वेळ कोंडून ठेवलें तर

तेवढ्यावरून मुलाला अपराधी आणि आईला निर्दय ह्मणतां येत नाहीं परमेश्वर समर्थ आहे न्याय दुर्निवार आहे त्याचें स्वरूप शेवटीं प्रगट होईल कर्त्तव्यामागें क्लेश आहेतच. आणि ते सोसणे हेंही एक कर्त्तव्यच आहे. तेव्हां भिण्याचें कांहीं कारण नाहीं. मात्र ही गोष्ट घरीं पत्रानें कळवा. मंडळीचा मात्र विरस माझ्यामुळें झाला तेव्हां मित्रहो—

साकी—(ताल धुमाळी]

निरोप द्यावा आतां मजला स्वस्थ मनानें रहावें ॥
रंगीं येई व्यत्यय तुमच्या क्षमा करूनि सुखवावें ॥
करितों ही विनती ॥ आदर देउनी सजावा ती ॥

[ पडदा पडतो. ]

अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थल—सत्यव्रताचा दिवाणखाना.

पात्रें—सुभामा.

सुभामा— [आपल्याशीं ] देवा कशीरे तूं आमची ताटातूट केलीस इकडून जाणं झालं त्या वेळीं मी बरोबर येतें ह्मणून ह्मटलं पण नेणं झालं नाहीं. माझं नशीब दुसरं काय. तिकडे हाल कोण असतील. वेळेवर अन्नपाणी तरी मिळत असेल का. असा प्रसंग आमच्यावर यावा असं आह्मीं

कोणतं पातक केलं होतं. नुक्ता कुठं संसार थाटत चालला होता तोंच आह्मां गरिबांवर अशी आकाशची कुऱ्हाड कोसळावी ना! मला पैशा अडक्याची किंवा दागदागिन्याची मुळीं सुद्धां आशा नव्हती मग देवा एक दागिना तेवढा तुझ्यानं नाहींना सुरक्षित ठेववला.तुझ्यावर तरी कां दोष द्यावा! मीच पापी कर्म चांडाळीण आहे ह्मणूनच तिकडे असे हाल सोसावे लागत आहेत. लवकर येइन ह्मणून सांगून जायचं झालं ह्मणून मी बरोबर जायचा जास्त हट्ट धरिला नाहीं पण आतां आमची भेट कधींरे होईल. मी! तिकडच्या बरोबर तुरुंगांत असलें तरी पुरवेल. पण मला हें असलं सुख अगदीं नको.तिकडे हाल कोण होत असतील आणि आह्मांला इकडे अन्न कसं रे गोड लागेल.

जगन्नाथ—[ प्रवेश करून ] आई तूं कांग रडतेस?

पद—(चाल—वंदुनी पायां)

झडकरी जननी । दुःख निवेदुनी । शांतवी मला ॥
शोकीं पाडुनी।हृदया भेदुनि।जें न क्षणोक्षणीं आंवरे तुला॥
अश्रू नयनिं येउनि तुजला दुःख होई अनिवार ॥
पाहुनि माझें हृदय चरारे तापद हो मज फार ॥
विनवी ह्मणुनी ॥ झ० ॥

सुभामा—बाळा तुला सांगून तूं काय करणार?

जगन्नाथ—आई तुझी माझ्यावर माया आहेना! तर मग तूं मला कां सांगत नाहींस.—

पद—(चाल—राम स्मरावा राम)

भेदी जें हृदयास । जननीगे ॥ ध्रु० ॥

सुख दुःखाचा वांटा घेई।दुःख कथावें त्यासासदोदीत।।
घ्यानीं हें तूं घेउनी माते।कळवी दे जें त्रास ।तुलागे ।।
ऐकोनी मी सुचवी उपायां।जाइल तें विलयास ।कदाचित।

सुभामा—देवा!याला मी काय सांगूं! जगू कसं रे आपळं होईल आतां. आपल्याला टाकून जायचं झालं आतां आपली आणि तिकडची भेट होईल का?

जगन्नाथ—दादांचीना? हो होईल.गांवाला ना गेले आहेत दादा मग काय काम झालें ह्मणजे येतील.

सुभामा—बाळा त्यांना सरकारनं पकडलं.

जगन्नाथ—दादाना पकडलें! तुला कांहींच समजत नाहीं,

( पद—चाल-पडे कां हा तरुण तुरंगांत)

कशालागे धरिती जनकास।व्यर्थाचि शिणशी खास ।
अपराधाविण नघडे कोणा कधींही बंदीवास ।।ध्रु०।।
जरि भ्रांतिनें । नृपदूतानें । नेतां अन्यायानें ।।
मज धरिलें हें वदतां तातें। नृप सोडिल मग त्यास ।।१।।

सुभामा—बस उगच कांहींनी कांहींच वटवट लावली आहेस.

जगन्नाथ-[ एकीकडे होऊन ] बरें दादा आल्यावर मी सांगेन तूं माझ्यावर उगीच्याउगीच रागावतेस म्हणून.मग पाहूं दादा कोणाला रागावतात ते(कांहीं वेळानें जवळ येऊन)

पद ( जबसे कलंदर बन बन )

माझ्या मतिला वाटे तें मीं गेलों जननी बोलोनी ।।
घडे कसा अपराधाचि तो न कळे हें मजला अजुनी ।।

कोप असा मजवरि कां करिशी ॥
उक्त हो तुज ही कृति कैशी ॥
तात न जवळी या समयासी ॥
मी नाहीं येत जा तुझ्याजवळ आतां.

[ जातो व मनोरमा प्रवेश करिते. ]

मनोरमा—उठायचं नाहीं का बाई आंग धुवायला उशीर किती झाला बरं हा.

सुभामा०—होऊं दे झाला तर! काय करायचं आंग धुवून पोटचना जाळायचं!

मनोरमा—बाई असं अभद्र कां बोलावं तें.हें पुसा डोळे आणि उठा आंग धुवायला घांसभर खाल्लंच पाहिजे. अन्ना. शिवाय प्राण रहातील कसे!

सुभा०—काय करायचं प्राण ठेऊन अगदीं ध्वजच लावायचे असतील जगून. तिकडे काय व्यवस्था असेल आणि आम्हीं दोन्ही सांज गिळायचं. ज्या जिवावर उड्या मारायच्या तो जीव जर संकटांत आहे तर आमच्या जगण्याचं काय काम आहे.

मनोरमा—सगळं खरं. पण खाल्ल्यावांचून कसं चालेल. भावोजींचं दुःख तुम्ही खाल्लं नाहीं तर कमी का होईल. संकट आलं आहे त्याला धीरानंच पाठ दिली पाहिजे. आणि शिवाय.—

पद. [ चाल—शाहेवाला तूं प्यारा ]

जगदीशाची ही लीला। कधिं नच कळते कवणाला॥

सुख दुःखें तीं चिर येती । मनुजाला । समयाला ।
चकित करिती । अंतीं सौख्य देती ॥ ज० ॥ धृ० ॥
चिंती मनुज हि एक परी ॥
योजी ईश्वर अन्य परी ॥
जग राहाटी ही ध्यानीं धरीं॥
ह्मणुनी गे । जरि येती । दुःखें तीं ।
मनिं शांति । धरि समयीं।ईशस्मरतां॥
तो प्रियकर सुखकर सुरवर ईश्वर
श्रीधर देई सुख सकलां ॥ १ ॥

सुभामा०—एकून देवाला आमची ताटातूट करणं आवडलं तर.

मनोरमा—अग तुमचीच कां त्यानं ताटातूट केली किती तरी महान महान राजे आणि साध्वी यांचीही त्यानं अशीच स्थिती केली आहे. ऐक—

पद. [ चाल—विराट वदना पासुनी ]

विरह दुःख जरी तापद परिगे किती तरी साध्वीनीं ॥
त्याहुनि दारुण दुःख भोगिलें वदवेना वदनीं ॥धृ०॥
हरिश्चंद्र नृप सुत दारेसह घेई पहा विकुनी ॥
पतिपुत्राच्या वियोगदुःखिं तारामती बसुनी ॥
कालक्रमणा केलि तियेनें ईशचरण स्मरुनी ॥
सावित्रीची कथा तशी बघ घे ग तूं ध्यानीं ॥ १ ॥

सुभामा—बाई तुम्ही सांगतां तें कांहीं खोटं नाहीं. मला सगळं समजतं पण दुःख झाल्याशिवाय रहात नाहीं हो.

तिकडची मूर्ती माझ्या डोळ्यासमोर रहाते. मला दुःख होवो मेलं पण तिकडे त्रास न व्हावा असं माझं म्हणणं आहे. तिकडच्या वाटचं दुःख मी भोगायला तयार आहे.

मनोरमा—सगळं खरं. पण तें बाई कसं होईल. असं एकाचं दुःख जर दुसऱ्याला घेतां आलं असतं तर मग काय. मग देवाच्या करणींत आणि मनुष्यांत अंतर मुळींच राहलं नसतं. बाकी घेतां आलं असतं तर भावोजी-च्या वाटचं दुःख तूं घेतीस यांत तर नवल नाहींच. पण शहरांत असे कित्येक म्हणत आहेत कीं त्यांच्यावाटचं आम्हांला कां पकडलं नाहीं ह्मणून. पण बाई हें त्यांचं म्हणणं तसं होणं कठिण ह्मणूनच कीं काय नकळे. अग पण वेडी आहेस तूं हातांत नाहींना कांहीं मग त्रागा करण्यांत काय अर्थ आहे. विवेक नको कां कांहीं करायला अजून मुद्दां भावोजी लवकर सुटून येतील. नाहीं कुणी ह्मणावं.

सुभामा—बरं बाई. बाकी माझी तर नाहींच पण राहो कुणाची तरी पुण्याई उभी.

म०—राहील बरं पण डोळे पूस अगोदर नी चल आंग धुवून कांहीं खा अगोदर.

[ जातात. ]

—

## प्रवेश दुसरा.

स्थळ–रस्ता.

पात्रें–दुर्मती, दुर्विलास, दुर्वीर्य.

दुर्मती–असें करायलाच पाहिजे होतें. एऱ्हीं सक्सेस कसा येणार? कसा जोर धरिला उगीच नाहीं काम झालें.

दुर्विलास–आणि आह्मीं कसूर केली वाटतें? मारे धडाका उडवलाना. आपलें ठरल्यापासून प्रत्येक अंकांत जितकी करवेल तितकी शिकस्त करून सोडली.

दुर्वीर्य–काय उगीच फुशारक्या मारता. मी जर थंडा राहिलों असतों तर तुमच्या लिहिण्याला कोण भीक घालीत होता. अस्मादिकाचें वजनच तसें आहे मी आपल्याकडून तर शिकस्त केलीच पण दुसरा मार्ग काढला तो कुठें तुम्हांला ठाऊक आहे. आपल्याजवळ शेंकडो युक्त्या भरल्या आहेत. बगलबच्च्याला हाताशीं धरल्याशिवाय या प्रकरणाला जोर येणार नाहीं असें जेव्हां वाटलें तेव्हां त्याला अगदीं नाकाचा बाल करून सोडला. आणि तिकडूनही सपाटा सुरू करविला.

दुर्मती–हा दुजोरा झाला. खरा. पण हा बगलबच्च्या वठला कसा बुवा तुम्हांला?

दुर्विलास–अरे न वठायला काय झालें? दिली असेल एखादी लोणकडी थाप ठेऊन. लालूच दाखवायला थोडेंच कांहीं आपल्या पदरचें जातें आहे आणि ते या स्वारीला शिकवायला नकोच.

तिकडची मूर्ती माझ्या डोळ्यासमोर रहाते.मला दुःख होवो मेलं पण तिकडे त्रास न व्हावा असं माझं म्हणणं आहे. तिकडच्या वाटचं दुःख मी भोगायला तयार आहे.

मनोरमा—सगळं खरं. पण तें बाई कसं होईल. असं एकाचं दुःख जर दुसऱ्याला घेतां आलं असतं तर मग काय. मग देवाच्या करणींत आणि मनुष्यांत अंतर मुळींच राहलं नसतं. बाकी घेतां आलं असतं तर भावोजी-च्या वाटचं दुःख तूं घेतीस यांत तर नवल नाहींच. पण शहरांत असे कित्येक म्हणत आहेत कीं त्यांच्यावाटचं आम्हांला कां पकडलं नाहीं ह्मणून.पण बाई हें त्यांचं म्हणणं तसं होणं कठिण ह्मणूनच कीं काय नकळे. अग पण वेडी आहेस तूं हातांत नाहींना कांहीं मग त्रागा करण्यांत काय अर्थ आहे. विवेक नको कां कांहीं करायला अजून मुद्धां भावोजी लवकर सुटून येतील. नाहीं कुणी ह्मणावं.

सुभामा—बरं बाई. बाकी माझी तर नाहींच पण राहो कुणाची तरी पुण्याई उभी.

म०—राहील बरं पण डोळे पूस अगोदर नी चल आंग धुवून कांहीं खा अगोदर.

[ जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ–रस्ता.

पात्रें–दुर्मती, दुर्विलास, दुर्वीर्य.

दुर्मती–असें करायलाच पाहिजे होतें. एरव्हीं सक्सेस कसा येणार? कसा जोर धरिला उगीच नाहीं काम झालें.

दुर्विलास–आणि आह्मीं कसूर केली वाटतें? मारे धडाका उडवलाना. आपलें ठरल्यापासून प्रत्येक अंकांत जितकी करवेल तितकी शिकस्त करून सोडली.

दुर्वीर्य–काय उगीच फुशारक्या मारता. मी जर थंडा राहिलों असतों तर तुमच्या लिहिण्याला कोण भीक घालीत होता. अस्मादिकाचें वजनच तसें आहे मी आपल्याकडून तर शिकस्त केलीच पण दुसरा मार्ग काढला तो कुठें तुम्हांला ठाऊक आहे. आपल्याजवळ शेंकडो युक्त्या भरल्या आहेत. बगलबच्चयाला हाताशीं धरल्याशिवाय या प्रकरणाला जोर येणार नाहीं असें जेव्हां वाटलें तेव्हां त्याला अगदीं नाकाचा बाल करून सोडला. आणि तिकडूनही सपाटा सुरू करविला.

दुर्मती–हा दुजोरा झाला. खरा. पण हा बगलबच्चया वठला कसा बुवा तुम्हांला?

दुर्विलास–अरे न वठायला काय झालें? दिली असेल एखादी लोणकडी थाप ठेऊन. लालूच दाखवायला थोडेंच कांहीं आपल्या पदरचें जातें आहे आणि ते या स्वारीला शिकवायला नकोच.

दुर्वीर्य—अरे आम्हीं कसले वस्ताद कसें जाळें पसरलें तें आमचें आह्मांलाच ठाऊक. त्याच्या लेखांची अशी तारीफ केली कीं त्याला वाटलें आपण जसे कांहीं बृहस्पतीच.आणि तो बेअकली हुरळला न काय! अरे नुस्तीं कुत्रीं हीं छू ह्मण- ण्याचा अवकाश.नुसती प्रतिष्टा पाहिजे नाहीं.घे म्हणावें लेका. कामापुरतें गोड बोलावें तोफेच्या तोंडीं द्यायची वेळ आली कीं आपला पुढें त्याला.

दुर्विलास—बीस्ट उईदाउट् ए टेल खरा. या गध्याला इतकें समजत नाहीं कीं आपल्याच घराला ही आग लावायची आहे.

दुर्मती—अरे समजत नाहीं हेंच चांगलें एरव्हीं पाहुण्या- च्या हातून साप कसा मारतां येईल.

दुर्विलास—कायरे पण त्यानें आकाश दुमदुमून सोडलें.

दुर्वीर्य—पण कोणाच्या जोरावर. पाठीमागें मीं असें पर्यंत- च्या या गोष्टी नाहींतर आंधार.हा पहा ब्रूट इकडेच येत आहे फार शेफारू देतां उपयोगीं नाहीं. तरी आतां आपल्यांत घ्यावाच [बगलबच्चा प्रवेश करितो त्यास पाहून] ओल्लो यू. मिस्तर बगलबच्चा हाऊ आर यू?

बगलब०—अरे कशी झणझणवली मारे धूम धडाका गाजिवली किनई तुम्ही काय समजलां मला?

दुर्विलास—आह्मी तुला पुरा ओळखला तूं कमी कसा असशील पण जोर कुणाचा आहे.

बगलब०—हा हा मोठा आला आहे जोर. आमच्यांत अवसान नाहीं वाटतें?

दुर्मती—अरे नाहीं कोण म्हणतो अरे तुझ्यामुळेंच तर सगळी मात झाली ( पाठ थोपटून ) भले बहाद्दर ! !

बगलब०—अजून कोठें पाहिलें आहे ह्मणावें. नुक्ता इंगा फिरतो आहे आतां माझ्या तावडींत पुरा सांपडला आहे अगदीं जमीनदोस्त करून टाकतों.

दुर्विलास—ह्मणजे अद्याप कांहींच नाहीं वाटतें?

दुर्मती—खरा आरंभ व्हायचाच आहे एकून?

बगलब०—आरंभ केव्हां झाला आहे तुह्मांला नाहींच ठाऊक होय? वेसण अडकविली आहे वेसण [टाळी मारतो ] आतां जिकडे फिरवूं तिकडे त्यानें फिरलें पाहिजे.

दुर्वीर्य—इथपर्यंत मजल आली तर !

बगलब०—हो तुह्मांला नाहीं का हें ठाऊक?

दुर्वीर्य—[ आपल्याशीं ] मूर्ख बेटा समजतो आहे कीं, हा त्यालाच खबर आहे ह्मणूच. पण सगळीं तारायंत्रें माझ्या कानाशीं. नाचतो बेटा नाचूं दे झालें ( उघड ) चला अजून कामगिरी संपली नाहीं. छातीठोक काम करायची वेळ आली कीं जाऊं देतां उपयोगीं नाहीं.

[ जातात ]

## प्रवेश तिसरा.

स्थळ—विजय नगरांतील एक दिवाणखाना.

पात्रें—सत्यव्रत आणि आज्ञाधारक.

आज्ञाधारक—( आंगाला हात लावून) ताप आतां कांहीं कमी आहे.

सत्यव्रत—हो. परवां एकशें तीन होता आज एकशें एक आहे. होईल कमी एक दोन दिवसांनीं. दुखणें आलें आहे तें थोडें एकदम कमी होणार आहे. शक्ती क्षीण झाल्यासारखी वाटते.

आज्ञाधारक—दुखणें जाईल ह्मणा. पण हें संकट कसें टळणार. देव आमच्या सगळ्यांवरच कसा कोपला. एकाची सुद्धां पुण्याई कशी उभी रहात नाहीं.

सत्यव्रत—अरे असे वेड्यासारखे हताश काय होतां आणि अश्रू काय ढाळता. वाईट वाटत असेल नाहीं ह्मणत नाहीं मी. तुमचा माझा निकट संबंध आहे ह्मणून वाईट वाटेल. पण धीर धरला पाहिजे. असें भिऊन कसें चालेल.

आज्ञा०—परिणामाकडे लक्ष गेलें म्हणजे भीती वाटते व राहून राहून आपल्याबद्दल वाईट वाटतें.

सत्यव्रत—वाईट काय वाटायचें त्यांत—

पद. ( राग मालकेस—ताल त्रिवट )

दैव बलाधिन सर्व असोनी ॥
व्यर्थ कशाला शिणतां स्वमनीं ॥ ध्रु० ॥
चिंता करुनी नटळे कधीं ही ॥
वृथा वल्गना दिसते पाही ॥
ईशपदीं मन ठेवा अनुदिनीं ॥ १ ॥
मेघगर्जना होई बहुपरी ॥
वृष्टि न होते तितकी सारी ॥
तद्वत वाटे संकट मन्मनीं ॥ २ ॥

विरुद्ध पक्षास या खटल्यांत यश यायचें नाहीं त्यांची बाजू लंगडी पडणार हें मी खात्रीनें सांगतो.

आज्ञा०—इतक्या खात्रीनें आपण बोलतां आणि तें सुद्धां असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं हें पाहून मला आश्चर्य वाटतें! विरुद्ध पक्षाची बाजू लंगडी पडणार असें आपल्याला वाटतें त्यापुढें मी काय बोलणार.

सत्य०—अहो माझ्यावर राजद्रोहाचा अपराध लागू केला तो शाबीत झाल्याशिवाय तर शिक्षा होत नाहींना!

आज्ञा०—नाहीं.

सत्य०—तो अपराध शाबीत व्हायला काय लागतें ठाऊक आहे. अशा प्रकारच्या अपराधांत लिहिणारांनीं तो लेख कोणत्या हेतूनें लिहिला आहे तसें लिहिण्यांत त्यांचा कोणत्याही प्रकारचा वाईट हेतू होता कीं काय? राजसत्तेला तो अपायकारक होता कीं कसें याचा विचार प्रथम दर्शनीं करायचा असतो. आणि या मुद्यावर सर्व खटल्याचें स्वरूप रहाणार आणि माझ्या लेखांतून तसा वाईट हेतू निघणें शक्य नाहीं. कारण त्याच अंकात आमच्या सरकारपासून कोणकोणते फायदे झाले आहेत तें नमूद करून असें सरकार केवळ रयतेच्या नशिबानेंच तीस मिळालें हा आहे लेख आहे. शिवाय खटला चालविण्यापुर्वीं सरकार कायदे पंडितांचीं मतें घेईलच. आणि ते कायदे पंडित मी ह्मणतो असाच अभिप्राय देतील यांत तिळभरही संशय नाहीं. माझे लेख कायद्याला धरून असतात कीं नाहीं, याचा तुह्मांला

वेळोंवेळीं अनुभव आहेच. दोनवर्षांपूर्वी जे लेख आले होते ते तुमच्या ध्यानांतून गेलें नाहींतना ते थोडे का कडक होते. कायद्याच्या चरकांतून ते तावून सुलाखून आले असले ह्मणजे ते कितीही कडक असले तरी हरकत नाहीं. त्यांच्या पासून बिलकूल भीती नाहीं. कडक लेख असले ह्मणजे ते राजद्रोही असलेच पाहिजेत असा जर तुमचा समज असला तर तो काढून टाका. तो अगदीं चुकीचा आहे.

आज्ञा०–तें खरें पण विकारवशतेचा सरकारवर पगडा बसणार नाहीं ह्मणून कशावरून आणि तसें झालें ह्मणजे मला घडगत दिसत नाहीं.

सत्य०–अहो वेड लागलें आहे तुह्मांला—

पद ( चाल–भव हा पार तरायातें )

जयांच्या राजसूत्र हातीं।त्यांचीं न इतर जनीं गणती ।धृ०।
ईश्वरांश त्या असे ह्मणूनी वंद्य जगाला होती ॥
षड्रिपु त्यानां भिउनि सदोदित दूर दूर ते पळती॥१॥
प्रजाजनांच्या सुख दुःखाचें ओझें ज्यांच्या माथीं॥
विकारवश मनें होतां त्याचें दुःखार्णवीं जन बुडती॥२॥
अल्प मिषानें सकल लोक जरि क्षुब्ध होउनी जाती॥
परि भुपती जलधीसम मन शांत ठेउनी राहती ॥३॥

आणखी तुम्ही ह्मणतां तसें झालें तरी न्यायाच्या कोर्टांत ह्या सर्व गोष्टी शाबीत होण्यास जड जातील.

आज्ञा०–कोणास ठाऊक.

सत्य–बरें तसें झालें नाहीं. त्या पासून आमचे नव-

ळचे संबंधीं व तुमच्या सारखीं आस्थेचीं व कळकळीचीं माणसें यानां अतिशय वाइट वाटेल.कमी आस्थेचीं असतील त्यानां कमी वाईट वाटेल व सर्व साधारण लोक थोडयाच दिवसांत हें विसरून जातील. कारण—

पद ( चाल-तोच समय हो )

अतर्क्य महिमा काळाचा।ठाव न लागे कवणा त्याचा।धृ०।
सुख दुःखें जरी अनंत येती।कालगतीनें विसर तयाचा।
संसारीं या पडे ह्मणूनी।दिनकृत्यें करि मनुजहि साचा।।

यामुळें काळाचे केवढे उपकार आहेत आपल्यावर विस्मरणाचें पटल जर नसतें तर किति तरी दुःखांनीं आह्मांला नको नकोसें करून टाकलें असतें. गेल्या दोन वर्षांत पटापट पांच सहा जिवलग मित्र सोडून गेले. पण त्यांचें देखील काळ जबरदस्तीनें विस्मरण पाडणारच. मग असली क्षुल्लक गोष्ट लोक लवकर विसरतील यांत नवल तें कोणतें?

आज्ञा०—तें खरें पण गुन्हा शाबीत झाल्यावर शिक्षा फार जरब आहे ह्मणून वाईट वाटतें.

सत्यव्रत—शाबिदी झाल्यावर मग शिक्षेला हो कोण विचारतो. देतील ती शिक्षा भोगणें प्राप्त आहे.

आज्ञा०—आणि ह्मणूनच तो प्रसंग टाळतां आला तर—

सत्य०—छे. ती गोष्टच बोलूं नका तो टाळता यायला एक उपाय आहे. आणि तो हा कीं सरकारची माफी मागितली पाहिजे.पण सद् हेतूंच्या लेखांबद्दल जर माफी मागायची तर ती गुन्हा नसतां मागायची असें नाहीं का होत.माझ्या

मित्रांनीं हा मला सल्ला दिला होता व माफी मागितल्यास ती मंजूर करण्याबद्दल आपण खटपट करतो असेंही त्यांचें ह्मणणें होतें पण ही गोष्ट मी साफ नाकारली. एकतर अशी माफी मागणें ह्मणजे न केलेल्या गुन्ह्याबद्दल आपली दिलगिरी दाखविण्यासारखें होतें आणि दुसरें—

पद ( चाल—गत वैभव झालें. )

कोण धरी विश्वास । जगिं मग ॥ धृ० ॥
सद्हेतूचें दिगदर्शन जनिं ।करुनि संकटिं देह सोडुनी॥
स्वावलंबी जर मत नसुनी।रुचेल कैसा तत् उपदेशा॥ १॥

आज्ञा०—पण कांहीं वेळअवेळ पाहावी लागते.

सत्यव्रत--वेळ नाहीं आणि अवेळ नाहीं. काय झालें मला शिक्षा झाली ह्मणून.त्यांत एवढें कोठे बिनसलें समजत नाहीं. सत्यव्रत या भयंकर रोगाच्या सांथींत सांपडून मेला असता तर तुह्मीं काय केलें असतें सांगा पाहूं. होता का त्याला कांहीं उपाय. या खटल्यांत माझें कांहींही होवो. येइल ती आपदा भोगण्यास मी तयार आहे.राजपक्ष आणि प्रजापक्ष हे नेहमीं अस्तित्वांत असायचेच. त्यांचा बेबनाव हा व्हायचाच. प्रजापक्षांच्या पुढाऱ्यांस आपत्ती आणि दुःख भोगणें भाग पडायचें या गोष्टी मागचा इतिहास पाहिला कीं खऱ्या ठरायचाच कोणत्याही देशाचा का इतिहास घ्याना त्यांत हे पक्ष असायचेच. कित्येक मुत्सद्यांस कारागृहवास,कित्येकांस हालांत मरण,कित्येकांस देहांत प्रायाश्चित,हीं आपलीं ठेवलेलीं असायचींच यांत कांहीं नवीन नाहीं. ह्मणून ज्याला

जें वाटतें तें त्यानें सद्‌हेतूपूर्वक बोलावें मग तें कसेंही लागो. लोकांबद्दल झटण्याचा आंव आणायचा आणि प्रसंग आला कीं मागें पाउल घ्यायचें यांत नवल नाहीं. पाउल पुढें टाकायचे वेळींच कायतो विचार करावा. आपली चैन कशी चालेल. आपला पोषाख गाडीघोडा ऐषाराम हीं अबाधित कशीं राहतील हा विचार करणारांनीं नुसतें स्वार्थत्यागाचें सोंग आणण्यांत काय हांशील आहे एक पक्ष स्वीकारला म्हणजे दुसऱ्या पक्षाला वाईट वाटायचेंच कारण

पद [ चाल–दृष्टिस पडल्या ]

सतत असे हा नियम जगाचा ॥
तोष न बघेव परस्परांचा ॥ धृ० ॥
परोत्कर्ष ज्यां सहन न होई ॥
नाश हो जरि सदां सुखाचाचा॥ १॥
स्वार्था व्यत्यय आणि तयाचा ॥
हेवा करितो दुसरा साचा ॥ २ ॥

आज्ञा०–आपण ह्मणतां त्याच्यापुढें माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं. आपले विचार आणि अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत हें धैर्य पाहून मात्र मला आश्चर्य वाटतें.

सत्य०–अहो लोकांचा विश्वास संपादण्याला वेळ लागतो तसा तो नाहींसा व्हायला वेळ लागत नाहीं एका क्षणांत तो नाहींसा होतो. तेव्हां तो कायम राहण्यास—

साकी.

नीति धर्म हीं वागवुनी मनीं सदाचरण ठेवावें ॥

स्वदेश सेवा करुनि निरंतर स्वजनांतें सुखवावें ॥
मनिं हे दृढ वाही । काळजि सोडा लवलाही ॥ १ ॥

[ जातात. ]

---

## प्रवेश चवथा.

स्थळ—रस्ता. पात्रें—दोन गृहस्थ.

१ ला—लोकांचें कर्तव्य ह्मटलें म्हणजे आपापल्या शक्तीप्रमाणें सत्यव्रताला मदत केली पाहिजे.

२ रा-यांत काय संशय लोकांच्या करितांच एवढे दिवस झटला त्याला जर लोक वेळेवर मदत न करतील तर कसें चालेल. न्यायाच्या दरबारचा खर्च त्यानेंच सोसवा वाटतें.

१ ला—तसें नाहीं हो पण कांहीं लोकांचें म्हणणें आहे कीं त्याला ही उठाठेव सांगितली कोणीं.

२ रा—ह्मणोत बापडे बोलणाराचें कांहीं तोंड कां धरायचें पण त्यानें तरी येवढी गुन्हेगारी ती काय केली ? बरें आतां त्याला जी मदत करायची ती कांहीं त्याच्या मुलीच्या लग्नाला अगर मुलाच्या मुंजीला नाहींना. त्यानें आपलें सर्वस्व लोकहिताकारितां अर्पण केलें आणि त्याला असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं जर मदत केली नाहीं तर लोकांनीं आपलें चांगलेंच कर्तव्य बजावलें असें ह्मणायचें.

१ ला-होय बाबा त्याच्या या कृत्यांत निरपेक्षाता होती एवढें खरें आणि एवढें जरी लक्षांत घेतलें तरी देखील

लोकांनीं आपल्याकडून होइल तितकी मदत केली पाहिजे.

२ रा—अहो काय त्याची योग्यता सांगूं तुम्हांला. जिकडे घालावा तिकडे त्याचा हात धरणार नाहींच कोणी त्याचे एकक गुण ऐकावे तों ते थक्क करून सोडतात. असलीं माणसें अगोदर जगांत थोडीं त्यांतून आपल्या देशाच्या वांट्याला येणार कितीशीं बरें जीं कांहीं जाडीं विद्वान आहेत त्यांत निर्लोभतेचीं, स्वार्थत्यागी, अशीं देशाकरितां झटणारीं फारच विरळा. अशांना देशकार्याकरितां जर मदत द्यायची नाहीं तर द्यायची केव्हां! मी ह्मणतो प्रत्येकानें या बाजूंत आपली शिकस्त करावी हें चांगलें.

१ ला—पण कायहो तुम्ही या गृहस्थास सर्व विषय निपुण ह्मणतां आं! आपल्याला नव्हती बुवा ही माहिती.

२ रा--अहो काय सांगूं तुह्मांला अगोदर वर्तमानपत्र चालविणें म्हणजे म्हणजे कांहीं हलकें काम नाहीं. त्या कामाला सर्व विषय पारंगत विद्वान संपादकच लागतो कारण त्यांत कधीं ज्योतिषावर तर कधीं वैद्यकावर कधीं पदार्थविज्ञानावर तर कधीं अर्थशास्त्रावर कधीं वनस्पती शास्त्रावर तर कधीं रसायन शास्त्रावर कधीं सामाजिक कधीं राजकीय कधीं धार्मिक तर कधीं औद्योगिक असे सर्व बाजूंचे लेख लिहावे लागतात शिवाय एकेका विवक्षित विषयांत पारंगत झालेल्या विद्वानांनीं लिहिलेलें त्या त्या विषयावरचे ग्रंथ आल्यास त्यांचें परीक्षण करावें लागतें. इतिहासाची माहिती उत्कृष्ट लागते आणि कायद्याचें ज्ञान तर

भध्यद तयार असावें लागतें तेव्हां कुठें वर्तमान पत्रकर्ते बनतात. आहांत कुठें राव तुह्मीं !

१ ला—मग कायहो हल्लीं जी पैशानें पासरी वर्तमान पत्रें निघूं लागलीं आहेत त्यांचे चालक इतके विद्वान आहेत तर मग शाब्बास बुवा एकून त्यांची.

२ रा—अहो अलिकडे या वर्तमान पत्राच्या धंद्याचा अगदीं सुथडा झाला आहे. पाहिजे त्यानें उठावें आणि वर्तमान पत्र आणि मासिक पुस्तक काढावें ओल्याबरोबर कोरडें जळतें असें ह्मणतात तशांतली स्थिती. ह्मण आहेना की तुला मागतां येइना भीक तर वैद्यकी शीक. तीच तऱ्हा झाली आहे पत्रकारांची. पोट भरत नसल्यास एक लहानसा छापखाना आणि त्यांत एक वर्तमान पत्र हें साधन झालें आहे खळगी भरयाचें. जाहिरातीवर पोट जाळणारे फुकट शास्त्री आपल्या जाहिराती देऊन असल्या वर्तमान पत्रकारांस मदत करतात आणि नोटिसा व जाहिराती यांच्यावर खिळे जुळविणारांचा पगार भागून कसा तरी या ज्या उपटसूळ पत्रकारांचा निर्वाह चालतो. कोणी कांहींतरी कोणी कांहीं नांव देऊन आपलें वर्तमान पत्र सुरु करतो आणि तसें नांव नच मिळालें तर ज्या गांवांत वर्तमानपत्र काढायचें असते त्या गांवाच्या नांवापुढें वैभव जोडलें की झालें तयार वर्तमानपत्र.

१ ला—मग अशा पत्रांत काय मजकूर येणार हें दिसतेंच आहे. पण कायहो पंत असल्या पत्रास गिऱ्हाइकी बेतावाताचीच असेल नाहीं !

२ रा—अहो काय सांगूं तुह्मांला. कित्येक पत्राच्या प्रती १०० वरही निघत नाहींत आणि मजकूरासंबंधानें ह्मणाल तर दोन चार उतारे, वर्तमानसार आणि इहवृत्त ह्मणजे भागले आमचे एडिटर. अगोदर वैद्य लोकांच्या जाहीरातींनीं बाहेरील आंगें भरतात आंत नवऱ्यांनीं बायकांना दिलेल्या नोटिसा, बायकांनीं नवऱ्यांना दिलेल्या नोटिसा ऋणको धनको यांनीं परस्परांस दिलेल्या नोटिसा यांच्या पुढें इतर मजकूरास जागा राहील तर कोरे रकाने ठेऊन हे बाजारी पत्रकार 'जाहीरातीकरितां जागा देणें' ह्मणूनही कालमच्या कालम मोकळे ठेवतात कां कशी आहे टुम!

१ ला—खरेंच बुवा तुह्मी शहरांतले ह्मणून तुह्मांला या आंतल्या खुब्या माहिती आमच्या सारख्या गांवढळाला हा भपका तेव्हांच फसवील. पण कायहो सत्यव्रत एकूण फारच विद्वान आहे ह्मणतां आं!

२रा—हें काय विचारतां. अहो त्याच्या सारखा विद्वान फारच विरळा. संस्कृतांत तसाच, इतिहासांत तसाच आणि कायद्यांत तर त्याचा हात धरणारा कोणी नाहीं. भानगडीचे खटले चालविण्याच्या अगोदर लोक त्याच्याकडे येऊन त्याचा सल्ला घेतात.

१ला—मग असल्या सल्ल्याबद्दल त्यानें कांहीं फी ठेवली असेल.

२रा—काय वेड लागलें तुम्हांला. अहो एक दमडी घेत नाहीं. आणि निरभिमानी इतका कीं कांहीं पुसूं नका. दुस-

मध्यदं तयार असावें लागतें तेव्हां कुठें वर्तमान पत्रकर्ते बनतात. आहांत कुठें राव तुम्हीं !

१ ला–मग कायहो हल्लीं जी पैशानें पासरी वर्तमान पत्रें निघूं लागलीं आहेत त्यांचे चालक इतके विद्वान आहेत तर मग शाब्बास बुवा एकून त्यांची.

२ रा–अहो अलिकडे या वर्तमान पत्राच्या धंद्याचा अगदीं चुथडा झाला आहे. पाहिजे त्यानें उठावें आणि वर्तमान पत्र आणि मासिक पुस्तक काढावें ओल्याबरोबर कोरडें जळतें असें ह्मणतात तशांतली स्थिती. ह्मण आहेना की तुला मागतां येइना भीक तर वैद्यकी शीक. तीच तऱ्हा झाली आहे पत्रकारांची. पोट भरत नसल्यास एक लहानसा छापखाना आणि त्यांत एक वर्तमान पत्र हें साधन झालें आहे खळगी भरयाचें.जाहिरातीवर पोट जाळणारे फुकट शास्त्री आपल्या जाहिराती देऊन असल्या वर्तमान पत्रकारांस मदत करतात आणि नोटिसा व जाहिराती यांच्यावर खिळे जुळविणारांचा पगार भागून कसा तरी या ज्या उपटसूळ पत्रकारांचा निर्वाह चालतो. कोणी कांहींतरी कोणी कांहीं नांव देऊन आपलें वर्तमान पत्र सुरु करतो आणि तसें नांव नच मिळालें तर ज्या गांवांत वर्तमानपत्र काढायचें असते त्या गांवाच्या नांवापुढें वैभव जोडलें की झालें तयार वर्तमानपत्र.

१ ला–मग अशा पत्रांत काय मजकूर येणार हें दिसतेंच आहे. पण कायहो पंत असल्या पत्रास गिऱ्हाइकी बेताबाताचीच असेल नाहीं !

२ रा—अहो काय सांगूं तुह्मांला. कित्येक पत्राच्या प्रती १०० वरही निघत नाहींत आणि मजकूरासंबंधानें ह्मणाल तर दोन चार उतारे, वर्तमानसार आणि इहवृत्त ह्मणजे भागले आमचे एडिटर. अगोदर वैद्य लोकांच्या जाहीरातींनीं बाहेरील आंगें भरतात आंत नवऱ्यांनीं बायकांना दिलेल्या नोटिसा, बायकांनीं नवऱ्यांना दिलेल्या नोटिसा ऋणको धनको यांनीं परस्परांस दिलेल्या नोटिसा यांच्या पुढें इतर मजकूरास जागा राहील तर कोरे रकाने ठेऊन हे बाजारी पत्रकार 'जाहीरातीकरितां जागा देणें' ह्मणूनही कालमच्या कालम मोकळे ठेवतात कां कशी आहे टुम!

१ ला—खरेंच बुवा तुह्मी शहरांतले ह्मणून तुह्मांला या आंतल्या खुब्या माहिती आमच्या सारख्या गांवढळाला हा भपका तेव्हांच फसवील. पण कायहो सत्यव्रत एकूण फारच विद्वान आहे ह्मणतां आं!

२रा—हें काय विचारतां. अहो त्याच्या सारखा विद्वान फारच विरळा. संस्कृतांत तसाच, इतिहासांत तसाच आणि कायद्यांत तर त्याचा हात धरणारा कोणी नाहीं. भानगडीचे खटले चालविण्याच्या अगोदर लोक त्याच्याकडे येऊन त्याचा सल्ला घेतात.

१ला—मग असल्या सल्ल्याबद्दल त्यानें कांहीं फी ठेवली असेल.

२रा—काय वेड लागलें तुम्हांला. अहो एक दमडी घेत नाहीं. आणि निरभिमानी इतका कीं कांहीं पुसूं नका. दुस-

रा एखादा विद्वान असता तर भेट व्हायची किती मारामार आणि वशिले लावावे लागले असते. पण तें कांहीं नाहीं. अगदीं पाहिजे त्याला मुक्तद्वार आहे.

१ला—मग तर फार चमत्कार म्हणायचा. परमेश्वरानें सगळे गुण एकत्र ठेवले आहेत त्याच्यापाशीं वा! मी तर त्याला परमेश्वराचाच अंश म्हणतों कारण भगवद्गीतेंत म्हटलेलें तुम्हांला माहीतच आहेना कीं ज्या ज्या ठिकाणीं कांहीं विशेष गुण आहे त्या त्या ठिकाणीं परमात्मा म्हणतात कीं माझा अंश आहे.पण कायहो संतती संपत्तीच्या बाजूनें कसें काय.

२रा—संतती मुली मुलगे आहेत. संपत्ती बेताबाताचीच पुष्कळ फुकटे व फसवे लोक त्याच्या चांगुलपणाचा फायदा घेतात आणि ह्मणून त्याला कितीक वेळां तरी खड्ड्यांत यावें लागलें आहे. पैसा आपला जेमतेम.

१ला—हो तें तरी बरोबरच कारण सरस्वतीजवळ लक्ष्मी नांदायची महा मुष्कील. पण एवढा प्रचंड खर्च चालण्याला जड जात असेल नाहीं!

२रा—पैशाकडे त्याचें लक्ष बेताबाताचें किंबहुना नाहीं. म्हटलें तरी चालेल. आणि त्यानें पैशाची परवाही तितकीच ठेविली आहे.डामडौल मुळींच नाहीं अंगांत एक सदरा आणि अंगरखा डोक्याला दुगोली पगडी आंगावर आणि नेसायला शुभ्र धोतर आणि पायांत जोडा. आटपला कारभार.

१ला—तुम्हीं जों जों त्या सत्पुरुषाचें वर्णन करितां तों

तों माझी मती जास्तच गुंगून जातें. एकदां तरी असला हिरा नजरेस पडावा अशी इच्छा आहे.

२ रा—अहो त्यांत काय आहे आतां लवकरच खटला चालायचा आहे तेव्हां आपण जाऊं म्हणजे झालें.

१ ला—पण मला विसरल्याशिवाय न्याल ना बरोबर? पहा बुवा आपल्याला असल्या सत्पुरुषाचें दर्शन तरी घडेल.

२ रा—हो हो तुम्हांला अवश्य नेईन बरें. चला आतां.

[ जातात. ]

---

## प्रवेश पांचवा.

स्थळ—सुविचाराचा दिवाणखाना.

पात्रें—सुविचार आणि मनोरमा.

**मनोरमा**—भावोजींची तबियत सुधारली आणि चवकशी सुरु व्हायच्या अगोदर ते बाईना.आणि मुलानां भेटून याय-साठीं गेले तसे ते एकदां सुटले म्हणजे मिळविली.

**सुविचार**—हो माझ्याही मनांत तेंच आहे.पण आपल्या हातांत थोडेंच आहे. आपण फक्त काय ती खटपट करणार होणें जाणें नशीब त्याचें.

**मनोरमा**—आपल्याला रंग कसा काय दिसतो जसें कांहीं इकडे ठाऊकच नसेल.

**सुविचार**—वेडीच आहेस तूं मला काय ठाऊक असायचें. अजून चवकशी व्हायची आहे पुढें मग निकाल काय होणार त्याची अटकळ. कारण तानमानावरून सांगण्यासारखी

ही केसच नाहीं.कोणीकडे गाडें झुकेल कोणास ठाऊक.तशां-
तून सरकार वादी तोहमत मोठी आणि सर्व वातावरण बिघ-
डलेलें तेव्हां काय होईल तें सांगतां येत नाहीं.

मनोरमा—भावोजीच्या खटल्याचा प्रतिकुल निकाल झाल
तर—छे नकोग बाई ती कल्पना सुद्धां नको. सुभामा तिकडे
काय करील कीं काय नाहीं. आतांच ती त्यानां येऊं देईल
कीं नाहीं कुणास कळे. तिला क्षणभर विसांवा पाडावा म्हणून
मी गेले होतें.पण छे.छे तिची ती केंविलवाणी मुद्रा पाहून—

पद [ चाल—चंद्रकांत राजाची ]

मला पाहुनी तिजला आलें दुःखाचें भरतें ।
अश्रूंनीं मज तिनें न्हाणिलें वदवेना मज तें।। धृ ।।
धेनूसम हंबरडा फोडी करुनी वदनातें ।
केंविलवाणें म्हणे भेटवा झडकरि भर्त्यातें ।। १ ।।
प्रसंग ऐसा कधीं नच यावा देवा वैऱ्यातें ।
दीनदयाळा भक्तवत्सला परिसे विनतीतें ।। २ ।।

सुविचार—सारें खरें पण हें कोणाच्या हातांत कां आहे
सत्यव्रताला सुभामा वहिनी सोडणार नाहीं पण न सोडून
चालेल कसें. प्रसंगाकडे पाहिलें पाहिजे.लोकांच्या माना गुंत-
ल्या आहेत त्याच्याकरितां तेव्हां तो कांहीं वेडा नाहीं
इतका!

मनोरमा—पण निघतानां ती थयमान करून सोडील. नको.
नकोग बाई अंगावर शहारेच येतात. मुलं अगदीं रडून गोंध-
ळ करतील. आणि सगळाच घोटाळ होईल!

सुविचार—वास्तविकच आहे. कां नाहीं तसें होणार? कारण एकदां गेल्यावर पुन्हां भेट होते कीं नाहीं ही तरी खात्री द्यावी कोणीं!

मनोरमा—म्हणूनच तो प्रसंग पहावयाला मी तेथें राहिलें नाहीं. मला कांहीं तें पाहवलं नसतं. पण भावोजी उद्यां यायचेना.

सुविचार—होय बहुतकरून उद्यां संध्याकाळीं किंवा परवां सकाळीं म्हणजे शिकस्त.

मनोरमा—भावोजींना मनापासून मदत होत आहे त्याचं चीज होवो म्हणजे झालं.

सुविचार—ह्याला मीच कां एकटा मदत करतों. माझ्या सारखीं कितीक तरी मनुष्यें झटून पडताहेत. त्याच्या कामासाठीं हजारों रुपये फंड जमा होत आहे. चांगले हुशार कायदेपंडीत खटला चालविण्यासाठीं येणार आहेत. परवांची मजा तुला सांगायची राहिली. जेव्हां जामिनीवर सोडण्याच हुकुम मिळाला तेव्हां आम्हांला वाटलें कीं एक लाख आणि पन्नास हजारांचा जामीन एकटा कसचा मिळतो दोनचार इसमांस पुढें व्हावें लागेल. पण कसलें काय आणि कसलें काय एकट्या रामरावानें पैसे मोजले! धन्य बुवा या लौकिकाचा! तेथें लोक बोलत होते कीं जामिनीवर सोडतों एवढें म्हणूं दे मात्र मग जामिन कितिकाचा असेना. आणि खरोखरच न बोलावतां न सावरतां दहा इसम पैसे घेऊन हजर होते. त्याला ग मदतीला काय तोटा आहे. ?

मनोरमा—शाबास बाई लोकांची. आन मी ऐकलं कीं या प्रसंगांतून ते पार पडावे म्हणून गांवोगांवीं होम हवनं आणि मंत्रजागर चालले आहेत. अनुष्टानं सुरु आहेत. लखु सांगत होता मला हें.

सुविचार—होय तर—

साकी

गांवोगांवीं सद्भक्तांचे संकटीं गणपती बसती ।
लघुरुद्रादि महारुद्रहि मंत्रजागरां करीती ॥
कोणी नवसातें । करीवी सुटका व्हायातें ॥ १ ॥

मनोरमा—एकूण लोकांची निष्टा खरी त्यांच्यावर—

अंजनीगीत.

देवासम ज्या मनें वाहिलीं ।
नृपसत्ता परि तिज न मिळालीं ।
कीर्तीची ती सीमा झाली ।
धन्य धन्य त्याचें ॥ १ ॥

सुविचार—परवांचा फारच चमत्कार वाटतो—

पद [ चाल—नृपसिंहासनीं बसेल.]

सोडा ऐशा न्यायमूर्तिच्या वचनांतें परिसुनी ।
प्रेक्षक धन्य त्यास मानुनी ॥धृ० ॥
सत्यव्रताला भेटायातें उत्कंठित होउनि ।
देती इष्ट द्रव्य त्या क्षणीं ।
॥चाल बदलून॥ कितीक जाती दर्शन तें घेउनि ।
पायां वरतीं लोलणही घालुनी ।

स्नान घालिती कितिजण प्रेमाश्रुनी। चाल पहिली
सन्मानुनीयां परोपरींनें प्रेमातें दाउनी।
निष्ठा व्यक्त करिति त्या दिनीं ॥ १ ॥

मनोरमा—माझ्या देखिल डोळ्यांना ऐकून पाणी आलं. भावोजी सुटल्यावर मी देखिल जगदंबेला भरजरी शालू नेसवीन आणि खणा नारळानं ओटी भरीन असा नवस केला आहे. द्यायचा होईलना तो मला.

सुविचार—देईन बरं.—

साकी

सत्यव्रत तो येवो झडकरि संकटातुनि सुटुनी।
एक सोडुनी दहा नवसही पुरविन अवघे ते दिनीं।
न करि चिंतेला ॥ ईश्वर पावो समयाला ॥ १॥

[ पडदा पडतो. ]

अंक तिसरा समाप्त.

---

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—रस्ता. पात्रें—सत्यव्रत.

सत्य०—(स्वगत)

पद. [ चाल—उरला भेद. ]

संकट येतां लवलाही। मनुजा तापद तें होई ॥ धृ० ॥
होई दुःसह जरि समयीं। तेव्हां धैर्य धरूनि राही ॥

सत्व पहाया विधि योजी त्या मनिं हें दृढ वाही ॥
शेवटीं सौख्य खचित होई ॥ १ ॥

चवकशीची वेळ जवळ जवळ येत चालली तथापि माझ्या मनाला यत्किंचितही भीति वाटत नाहीं. काय असेल तें असो. एक सेक्ष नाहींतर एक मोक्ष या दोन तडी माझ्यापुढें असून त्याबद्दल विचार करतांना हळहळ वाटावी पण छे! मन अगदीं सारखें शांत आहे. खटल्याचा निकाल चांगला लागला तर ठीकच आहे पण वाईट लागला तर कदाचित जन्मभूमीचें दर्शन तरी होईल कीं नाहीं याची खात्री कोणी द्यायची. शिक्षा मिळायचीच ठरली तर मग ती अमूक मुदतीची मिळेल असें कसें सांगतां येईल. ती गोष्ट न्यायाधिशाच्या हातांतच रहाणार. तो ह्या गुन्ह्यास अखेरची म्हणजे जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा देणार नाहीं कशावरून ? देईलही कदाचित. पण इतक्या अखेरच्या प्रसंगीं सुद्धां माझें मन कचर खात नाहीं. [ थांबून ] माफी मागितल्यास सुटका होईल खास पण होणाऱ्या भयंकर शिक्षेपेक्षां मला माफीचीच कदर जास्त वाटते. काय तो दिवस! घरून बाहेर पडायचे आणि ते देखील घर पुन्हां नजरेस पडेल कीं नाहीं या संशयांत! त्यावेळेस–

पद. ( चाल–धन्य जाहला तुम्हीं माझा राम पाहिला )

हाय! हाय! दुर्धर ती वेळ भासली । मला ।
प्रेमरज्जु बंधनिं ती पाहि गुंतली ॥ धृ० ॥
मद्भार्या भ्रमित झाली तिजसी पाहुनी ॥

भेदितसे स्मृति माझें हृदय निशिदिनीं ॥
मित्रचंद्र समयीं त्या जाई सोडुनी ॥
त्यायोगें मति माझी खचित गुंगली ॥ १ ॥

अगदीं प्राण जाण्यापूर्वी जेव्हां माझ्या गळ्यांत हात टाकले त्यावेळीं कोणी पाषाणहृदयीं असतां तर त्याचें सुद्धां मन द्रवलें असतें मग माझी गत ती काय ? असो होणार गोष्टी घडून आल्या वांचून रहात नाहींत ह्यांतच काय तें समाधान मानायचें. इतक्या गोष्टी आज कानापाठीमागें टाकून मला पुढें येणाऱ्या संकटास पाठ द्यायची आहे. बाकी परमेश्वर करतो तें सर्व मनुष्याच्या कल्याणाकरितांच करतो या वाक्यावर माझी पूर्ण निष्ठा आहे.

साकी–(धुमाळी.)

परमेशाची अगाध लीला नच कळते कवणाही ॥
निजसत्तेनें सूत्रें हलवी जगतीं जो लवलाही ॥
संकटीं येवोनी । नेई दुःखा निरसोनी ॥ १ ॥

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—रस्ता. पात्रें–दोन गृहस्थ.

१ ला–कसें काय चलायचें ना कोंडतांत ?

२ रा–हो चला. आजचा दिवस गेलें म्हणजें संपलें.

१ ला–खरेंच बुवा आज पांच दिवस चाललेल्या काथ्याकुटीचा आज निकाल ठरायचा आहे.

२ रा–काथ्याकुट तर खरीच काय हो भाषेचे हाल केले

त्यांनीं ओढाताण चालविली होती नुमती. पण ह्यापासून चांगला निकाल व्हावा म्हणजे मिळविली.

१ ला—चांगला कीं वाईट हें कांहींच सांगतां येणार नाहीं परमेश्वर बुद्धि देईल तसें होईल पण आपण आतां फार वेळ बाहेर उभें रहाण्यांत हांशील नाहीं. हे पहा लोकांचे थवेच्या थवे जाऊं लागले. आणि वकीललोकही घाईघाईनें तिकडेच चालले आहेत उशीर केल्यास जागा मिळावयाची नाहीं. ( जातात )

## ( कोर्टाचा देखावा. )

*His Lordship.*—Do you mean to put in your witnesses ?

*C. D.*—No my Lord.

*Judge.*—(to the prosecutor) Then begin with your closing speech.

**सरकारी वकील**—माय लॉर्ड अॅन्ड जन्टलमेन ऑफ धी ज्यूरी. ही केस फार महत्वाची आहे. झालेले वुइटनेसेस आपण ऐकलेच आहेत. अशा प्रकारच्या केसमध्यें जास्त साक्षीदार आणून कोर्टाचा टाइम घेण्यांत कांहीं हांशिल नाहीं. सर्व खटल्याचें स्वरूप पुढें येणाऱ्या लेखांवर अवलंबून असल्यामुळें साक्षीदाराचें महत्व फक्त एक दोन गोष्टींपुरतेंच आहे. आपल्यापुढें येणारा हाच सत्यव्रत असून त्याच्याच हातून जनसेवा पत्र छापून प्रसिद्ध केलें जातें हें वुइटनेस नंबर १नें सांगितलें. दुसऱ्या साक्षीदारानें जनसेवा पत्राचें किति सरक्युलेशन आहे हें सांगितलें. ह्यावरून असल्या एडिटरनें

वेडेवांकडे विचार प्रसिद्ध केल्यास केवढ्या मोठ्या कम्युनिटीचीं मनें दूषित होतील हें आपणांस समजेलच. एवढ्या लोकांच्या मनावर ट्रीझन सारखा परिणाम घडवून आणणारीं किंवा तसा प्रयत्न करणारीं आर्टिकल्स कशा तऱ्हेचीं खोडसाळपणाचीं असलीं पाहिजेत, व तीं किति डेंजरस आहेत त्याचा आपणच विचार करा. एकाला गोष्ट सांगितली असतां ती हेतू नसतांही दहा जणाच्या सहजच तोंडीं होते यावरून पहातां फॉईफ थौजन्ड्स लोकांच्या कानावर घातलेली खोडसाळपणाची भाकडकथा हं हं ह्मणतां लाखों लोकांत पसरण्यास बिलकुल वेळ लागणार नाहीं. तशांतून ज्याच्यावर लोकांचा थोडा बहुत फेथ आहे अशा माणसाच्या हातून असले भयंकर व दुष्टपणाचे विचार प्रदर्शित झाल्यास त्यावर लोकांचा विश्वासही बसण्यास वेळ लागणार नाहीं. करितां त्याचा वेळींच बंदोबस्त झाला पाहिजे. गुन्ह्याचें स्वरूप कमी किंवा जास्त भयंकर होणें हें वर्तमानपत्राच्या प्रतींच्या खपावरून बसावावयाचें असतें. गुन्हा एकच असतो पण त्याचा भोंवतालचा विचार करण्यासारख्या गोष्टींनीं सीरियसनेस वाढतो, किंवा कमी होतो. अॅक्यूझ्ड सारख्या वजनदार समजल्या गेलेल्या माणसानें असे उद्गार काढून त्याचा जितका परिणाम होईल तितका दुसऱ्या एखाद्या क्षुल्लक गोमाजी बिन तिमाजीच्या उद्गारांचा होणार नाहीं.तो वेडा आहे असें समजून लोक तिकडे लक्ष्य देणार नाहींत.

मॉय लॉर्ड अॅन्ड जन्टलमन ऑफ धी ज्यूरी.आतां फक्त नेचर

त्यांनीं ओढाताण चालविली होती नुमती. पण ह्यापासून चांगला निकाल व्हावा म्हणजे मिळविली.

१ ला–चांगला कीं वाईट हें कांहींच सांगतां येणार नाहीं परमेश्वर बुद्धि देईल तसें होईल पण आपण आतां फार वेळ बाहेर उभें रहाण्यांत हांशील नाहीं. हे पहा लोकांचे थवेच्या थवे जाऊं लागले. आणि वकीललोकही घाईघाईनें तिकडेच चालले आहेत उशीर केल्यास जागा मिळावयाची नाहीं. ( जातात )

## ( कोर्टाचा देखावा. )

*His Lordship.*—Do you mean to put in your witnesses?

*C. D.*—No my Lord.

*Judge.*—(to the prosecutor) Then begin with your closing speech.

सरकारी वकील–माय लॉर्ड ॲन्ड जन्टलमेन ऑफ धी ज्यूरी. ही केस फार महत्वाची आहे. झालेले वुइटनेसेस आपण ऐकलेच आहेत. अशा प्रकारच्या केसमध्यें जास्त साक्षीदार आणून कोर्टाचा टाइम घेण्यांत कांहीं हांशिल नाहीं. सर्व खटल्याचें स्वरूप पुढें येणाऱ्या लेखांवर अवलंबून असल्या-मुळें साक्षीदाराचें महत्व फक्त एक दोन गोष्टींपुरतेंच आहे. आपल्यापुढें येणारा हाच सत्यव्रत असून त्याच्याच हातून जनसेवा पत्र छापून प्रसिद्ध केलें जातें हें वुइटनेस नंबर १नें सांगितलें. दुसऱ्या साक्षीदारानें जनसेवा पत्राचें किति सरक्युलेशन आहे हें सांगितलें. ह्यावरून असल्या एडिटरनें

वेडेवांकडे विचार प्रसिद्ध केल्यास केवढया मोठ्या कम्युनि- टीचीं मनें दूषित होतील हें आपणांस समजेलच. एवढ्या लोकांच्या मनावर ट्रीझन सारखा परिणाम घडवून आणणारीं किंवा तसा प्रयत्न करणारीं आर्टिकल्स कशा तऱ्हेचीं खोड- साळपणाचीं असलीं पाहिजेत, व तीं किति डेंजरस आहेत त्याचा आपणच विचार करा. एकाद्या गोष्ट सांगितली अ- सतां ती हेतू नसतांही दहा जणाच्या सहजच तोंडीं होते यावरून पहातां फॉईफ थौजन्ड्स लोकांच्या कानावर घातलेली खोडसाळपणाची भाकडकथा हं हं ह्मणतां लाखों लोकांत पसरण्यास बिलकुल वेळ लागणार नाहीं. तशांतून ज्याच्या- वर लोकांचा थोडा बहुत फेथ आहे अशा माणसाच्या हातून असले भयंकर व दुष्टपणाचे विचार प्रदर्शित झाल्यास त्यावर लोकांचा विश्वासही बसण्यास वेळ लागणार नाहीं. करितां त्याचा वेळींच बंदोबस्त झाला पाहिजे. गुन्ह्याचें स्वरूप कमी किंवा जास्त भयंकर होणें हें वर्तमानपत्राच्या प्रतींच्या खपावरून बसावावयाचें असतें. गुन्हा एकच असतो पण त्याचा भोंवतालचा विचार करण्यासारख्या गोष्टींनीं सीरिय- सनेस वाढतो, किंवा कमी होतो. अॅक्यूझ्ड सारख्या वजनदार समजल्या गेलेल्या माणसानें असे उद्गार काढून त्याचा जित- का परिणाम होईल तितका दुसऱ्या एखाद्या क्षुल्लक गोमाजी बिन तिमाजीच्या उद्गारांचा होणार नाहीं.तो वेडा आहे असें समजून लोक तिकडे लक्ष्य देणार नाहींत.

मॉयलॉर्ड अॅन्ड जन्टलमन ऑफ धी ज्यूरी.आतां फक्त नेचर

ऑफ धी आर्टिकल्स पब्लिश्ड याबद्दल आपणास कळवा-वयाचें राहिलें. शब्दरचनें संबंधानें आपल्या मनांत शंका राहण्याचें कारण नाहीं. ते सिडिशस आहेत हें वृइटनेसच्या जबानीवरून अगदीं क्लीयर झालें आहे. गोळाबेरीज घ्या अगर निरनिराळीं वाक्यें घ्या ह्यावरून लेखकांच्या अंतःकरणाची प्रस्तुतची स्थिती प्रस्तुत सरकारबद्दल त्याचा प्रेमभाव व त्या सरकाराविरुद्ध प्रजेचीं मनें कलुषित करण्याची प्रबल इच्छा हीं व्यक्त झाल्यावांचून रहात नाहींत आपण मर्मज्ञ पंच आहां. वर्तमानपत्रांतून येणारीं नेहमीचीं आर्टिकल्स वाचतांना त्याचा टोन कशा प्रकारचा असतो हें आपणास समजतें ॲन्ड आर्टिकल्स इन क्श्चन कशीं कडक व राजद्रोहानें भरलेलीं आहेत. हें आपण विचार केल्यास आपल्या ताबडतोब नजरेस येईल व गुन्ह्याच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना होईल.हे लेख फारच भयंकर रीतीनें लोकांस सरकारच्या विरुद्ध उठविणारे आहेत हें मी आपणास सांगतो.ह्या संबंधाचा काय लॉ आहे हें मी आपणास केस ओपन करतेवेळीं सांगितलेंच आहे.आणि शिवाय हिज लॉर्डशिप आपल्या भाषणांत तो नीट समजाऊन देतीलच. तेव्हां आरोपी दोषी आहे यांत मला तर बिलकुल शंका नाहीं. तेव्हां आपला अभिप्राय कर्तव्यास स्मरून द्याल अशी मला आशा आहे.

आ० तर्फे वकील—जन्टलमेन ऑफ धी ज्यूरी. सरकारी वकीलानीं सांगितल्याप्रमाणें ही केस अत्यंत महत्वाची आहे परंतु त्याचीं कारणें मात्र मी निराळीं आहेत असें

समजतो. आरोपी हा अतिशय विद्वान असून समंजस आहे त्याला सर्वजण अतिशय मान देतात इतकेंच नाहीं तर त्याला ते आपला पुढारी समजतात. आणि राजद्रोहाचा आरोप शिक्षणाचा ज्याच्यावर चांगला परिणाम झाला आहे असल्या माणसावर येणें अप्रशस्त दिसतें आणि संभवनीय नसतें हें एक कारण, दुसरें कारण सरकार आणि प्रजा यांच्या नात्यास हा खटला डाग लावणारा आहे. सत्यव्रताचे लेख तशा तऱ्हेचे कडक व संशयात्मक वाटल्यावरून त्यास तशा प्रकारचे लेख न लिहिण्याबद्दल सुचना करण्यांत आल्या होत्या ही गोष्ट मी कबूल करतो तथापि ते लेख केवळ सद्हेतूनें लिहिले असल्या कारणानें ती सूचना मान्य करण्यांत आली नाहीं आणि हा खटला अत्यंत महत्वाचा वाटण्याचें तिसरें कारण आजपर्यंत त्या अपराधाबद्दल सरकारचा आणि प्रजेचा सामना मुळींच न झाल्याकारणानें कायद्याची दिशाच अजून कोणाच्या ध्यानांत आली नाहीं. ह्या तीन कारणांकरितां हा खटला अत्यंत महत्वाचा, ह्या देशाच्या इतिहासांत नमुद करण्यासारखा, प्रजेचे वाजवी हक्क वर्तमान पत्रद्वारें समजावून देत असतां येणाऱ्या संकटांचा आरसाच आहे असें ह्मटलें पाहिजे. या खटल्याच्या निकालावर वक्तयांची व लेखकांची कायम दिशा ठरणार त्यांच्या स्वातंत्र्याचा अगर पारतंत्र्याचा ज्याच्यावर निकाल अवलंबून आहे असा हा खटला आहे आणि अशा खटल्याचा निकाल देणें तो फार दूरवर विचार करून अनेक धोरणें लक्षांत ठेऊन

दिला पाहिजे. इतकें सुचविण्याची मी परवानगी मागतो.

या खटल्यांत अगोदर जे साक्षीदार आणले आहेत त्यांपैकीं एकानें प्रसिद्धीबद्दल व एकानें आरोपीच त्याचा मालक आहे अशाबद्दल साक्ष दिली आहे. परंतु आरोपीनें ज्याअर्थीं आपल्या तोंडानें ह्या गोष्टी कबूल केल्या आहेत त्याअर्थीं या साक्षीदारांचें महत्व कांहींच राहिलें नाहीं. राहतां पैकीं राहिला एक साक्षीदार हा साक्षीदार प्रसिध्द झालेल्या लेखाच्या अर्थनिर्णयाकरितां पुढें आणण्यांत आला आहे परंतु त्यानें उलट तपासणींत कशीं उत्तरें दिलीं आहेत हें आपण विसरलां नसालच. सरकारी वकिलाच्या प्रश्नास उत्तरें देतानां जो वाक्याचे अर्थ एका प्रकारचे सांगतो तोच फेरतपासणींत त्याचे निराळ्या प्रकारचें पर्यवसान दाखवितो. पुरेतपणीं अमुकच अर्थ असें न ठरलें तरी संशयाचा फायदा आरोपीस दिला पाहिजे. कायद्याच्या अनुरोधानें पाहतां अशा खटल्यांत प्रथम दर्शनीं हेतूही वाईट होता असें सिद्ध केलेलें नाहीं. याकरिता आणि माझ्या आशिलाची विद्वत्ता त्याची मानासिक उन्नति ह्या गोष्टींकडे पाहिलें म्हणजे इतर दंगा फसाद करणाऱ्या लोकांपैकीं तो नाहीं. सरकारच्या विरुद्ध लोकांच्या मनांत अप्रीति उत्पन्न करणारा मनुष्य नव्हे. त्याचें वर्तमान पत्र भारदस्त व सुशिक्षित लोकांच्या हातीं जातें त्यांची, ह्या लेखाचा माझ्या विद्वान मित्रांनीं दुरुपयोग करण्या इतकीं, मनें क्षुद्र नाहींत. इत्यादि गोष्टींचा पूर्ण विचार करून योग्य न्याय द्याल अशी आशा आहे.

*Judge.*—Gentlemen, you have heard both the sides of the case, you also have heard the examination and the cross-examination of the witnesses. You know that our learned prosecutor has explained the law to you very clearly but as a matter of duty I must give you its outline and the ingrediants so as to enable you to Judge the wide scope in its application and liability.

Firstly I tell you the nature of the crime with which the accused is charged. Sedition is a crime against Government. It is a comprehensive term and it embrases all those practices either by words, deed or writing which are calculated to disturb the tranquility of state and lead the ignorant persons to subvert or overthrow the Government and the laws of the Empire.

This is the first part of the law. So you are to judge from what you have heard in the Court during the last five days whether the article in question is of a nature calculated to disturb the tranquility and to lead the ignorant readers of that Journal to subvert the ruling power. The contemplated effect must not in all cases be made through words but that may be made by the writing also So you are to think upon the nature of the

article in question and say whether the nature is of the above mentioned character or no. Now I come to the objects of the crime.

The objects of the Sedition are to induce discontent and insurrection and stir up opposition to Government and bring the administration of justice into contempt and the very tendency of Sedition is to incite the people to rebellion.

So you are to see whether there was possibility of producing discontent in the minds of the readers of that article. Action is not necessary. No actual rebellion or insurrection was required to take place. But you ought to see very carefully whether the articles in question mean that the present administration is worthless one and if you find that the article was of such a nature and its objects were to create and spread disorder, public disorder, you say that the accused is guilty if not say otherwise.

Criticism on the measures of the Government was of course allowed and the Journals have that very important privilege. The criticism may be very severe but it must take the form of free and fair discussion. But when a writer exceeds this limit he is guilty of the offence and the limit is to be settled from the facts of the case. This limit must

vary in different cases differently. For the settling of this limit one must see the time during which and the place at what the articles were published. You know the state of the mind of the people at the time when the articles were given abroad with the intention of being read. You know the place where they were printed and published and this is the chief point for your consideration when you go to decide the question of the limit. So while enjoying the privilege of criticizing the conduct of the Government it is material to see whether the writer has gone beyond his limit to bring him in the clutches of the law. You must not also forget the times how critical they were when people were in anxiety and trouble.

The last thing I mean to tell you with regard to law is a very important one. You must remember also that the essence of the crime consists in the intention with which the language is used and this intention must be safely judged from the language. Intention for this purpose is really no more than meaning. The meaning of what the writer wrote must be taken to be his meaning and that meaning is what his language would be understood to mean by the people to whom it is addressed.

So from the nature, object, intention and language so well as the surroundings the time and place you are to decide whether the accused is guilty of the offence with which he is charged. I do not deny that the accused is a man of learning and position and that he is a leader of the society etc., that was said by the learned counsel for the defence but that does not vary the liability. Law is applicable equally to all. For all these reasons you should weigh the evidence and facts of the case properly and give your verdict. Do you mean to retire?

*Foreman,*—Yes. My Lord.( होय महाराज.)

[ ज्युरी आंत जाऊन दोन मिनिटांनीं परत येते. ]

*Judge.*—What is your verdict?

*Foreman.*—Guilty. [ अपराधी ]

*Judge.*—Are you unanimous?

*Foreman.*—No my Lord. But by Majority. [नाहीं महाराज. बहुमतानें.]

*Judge.*—You SATYAVRATA the jury by majority have found you guilty of the offence with which you were charged. Have you anything to say?

सत्यव्रत–मला दुसरें कांहींएक सांगावयाचें नाहीं. एकंच गोष्ट सांगावयाची आहे आणि ती हीच कीं मी निर्दोषी आहे अशी अद्याप ही माझ्या मनाची खात्री आहे.

*Judge.*--You are found guilty by the verdict of Jury and I concur with the verdict and in order to put a stop to the progress of the articles of a thoughtless nature I give you three years rigorous imprisonment.

[ पडदा पडतो. ]

[ सत्यव्रत पुढें येतो—रस्ता ]

सत्य०–( स्वगत )

पद. [ झंपा ]

अहा दुर्मती हेतु तो सफल झाला ॥
दोष नच घडुनि तो दैविं आला॥धृ०॥
पूर्विचें सौख्य ना वस्त्र ना अन्न ना ॥
यापुढें मिळतसे खचित मजला ॥
बंधनालयिं असे तोंवरी देह हा ॥
राजसत्ता करीं आज पडला ॥ १ ॥
न्यायशास्त्रोक्त जरि दोषि मज ठरविले॥
भ्रांतिनें घडतसे होंचि गमलें ॥
धीर मानिं ठेवुनी संकटें सोसुनी ॥
यातना सौख्यसम दिसाति मजला ॥२॥

(विचार करून) यांत नवल नाहीं हें असेंच व्हायचें—

पद [ चाल–सुखोपभोगा० ]

राजकारणीं हक्क मिळाया करूनी वादाते ॥
प्रश्नोत्तर ही करावयाच्या गाजवि सत्तेतें ॥ धृ० ॥
बंधनभीती घेऊनि अंतरिं कचरेना मन तें ॥

कारागृहींही वास घडे परी खंति न चित्तातें ॥
दूर होतसे राजकोप तो करितां यत्नातें ॥
राजद्रोहचि पदरीं ये वा होई दण्डातें ॥ १ ॥
बाकी--

पद [ चाल–ऐशा व्यवहारा० ]

हृदय विदारुनि अंतःकरणा दाखवितां जरि मज येतें॥
न्यायदेवते तुला सांगतो सद्हेतु मम तुज कळतें॥धृ०॥
सदा नृपाचें अभिष्ट चिंतुनी कळवी त्या जनदुःखातें॥
जनस्थितीची उन्नति व्हाया हृदय पहा हें चरचरतें॥१॥
सत्य सत्य तें स्पष्ट बोलुनी वळवी नृपमन नित्यचि तें॥
म्हणुनि असा ये प्रसंग परि मी धीर न सोडी समयातें ।२।

[ सर्वांस उद्देशून ] जनहो कारागृहांतून सुटून येईपर्यंत हा तुमचा सेवक तुमच्या नजरेआड होत आहे तरी त्याच्या या अखेरच्या विनंतीला मान द्या–

पद. ( झंपा )

तुह्मां प्रार्थितो ही तरी आस पुरवा ॥
सत्यव्रत त्यावरी प्रेम ठेवा ॥ धृ० ॥
राष्ट्रहित साधितां येति जरि आपदा॥
भीति ती धरूं नका अल्प चित्तीं ॥
सत्यपथ आचरुनि नीति मनिं ठेउनी॥
वैर टाकूनिया ऐक्य करवा ॥ १ ॥

[ जातो. ]

( सुविचार प्रवेश करितो. )

सुविचार–[स्वगत] एका क्षणांत कोण स्थित्यंतर हें!–

पद–[चाल–परम सुवासिक.]

पराधीन मम मित्र होउनि कारागृहवासी झाला॥
दुर्धर दुःसह कष्टां सोशिल नकळे कैसा तें मजला॥धृ॥
लेखनाविण दुजी नसेही संवय कधीं ज्या हाताला।
कष्टाचीं तीं कामें आतां खचित लागती करण्याला॥१॥
सुग्रासाचे अन्नहि न मिळे न मिळे साध्या वस्त्राला।
ईशा झडकरी भेटो मजला हीच विनंती करीं तुजला॥२॥

असो हा सर्व भवितव्यॆचा खेळ आहे दुसरें कांहीं नाहीं. जे लेख सरळ आणि निरुपद्रवी होते तेच कायद्यानें राजद्रोही ठरावे आं! [थांबून] या एकंदर स्थितीनें माझें मन गोंधळून जातें आणि ठाम असें कांहींच ठरत नाहीं हे दुर्दैवी वसुंधरे! देशकार्याकरितां झटणारे, स्वार्थत्यागी निस्सीम भक्त तुझ्या उदरीं फारच थोडे निपजतात. आणि त्यांतल्या एखाद्यावर असल्या प्रकारचें नाहक काहूर येऊन त्यास एका क्षणांत जमीनदोस्त करून टाकणें या सारखें दुसरें दुर्दैव तें कोणचें. अहाहा! त्या महात्म्याची ती स्थिती पाहून—

पद–[चाल–हा सकल देह]

हे लोक आज शोकसागरीं बुडूनियां॥ धृ०॥
बाष्पजला भरुनि नयनिं॥विव्हलसे मनिं होउनी।
कैवारी जाइ म्हणुनि। दुःख हो तयां॥ १॥
जातां तो जनक दुरी। अर्भकसे अवनिवरी।
दीन अहा सर्व परी। होति समयिं या॥ २॥

[जातो.]

## प्रवेश तिसरा.

स्थळ—सत्यव्रताचें घर. पात्रें—सुभामा, मनोरमा.

सुभामा—

पद [ चाल—प्राण नका० ]

दीन पहा ठरली । खरोखर ॥ धृ० ॥
प्राणेशाची भेट कशी हो।झडकरी नेउनि मज दावा हो।
विरहाग्नी मज बहुतचि जाळी ॥ १ ॥
जातां प्राणचि कुडी सोडुनि।व्यर्थ व्यर्थ ती होते सदनीं।
पतिविण माझी गत ती झाली ॥ २ ॥

हाय! हाय! आतां मी सर्वस्वी दीन झालेंना?

मनोरमा—असं काय करतेस तूं हें—

पद( चाल—सुने दिल० )

जरी अनिवार । दुःख तुज फार । परी धरि धीर।
करुनि सुविचार ।त्यजुनि अविचार।मनीं धरि धीर।
सदुपदेशा करुनि बाळा । सुपथिं त्यांला ।
सतत लावी मना रिझवी । सदां धरि धीर ॥ १ ॥

तूंच जर धीर सोडूं लागलीस तर त्या लहान मुलांनीं कोणाच्या तोंडाकडे बघावं आणि कोणाची आशा करावी तर त्यांच्या करितां तरी आपला शोक आंवरून धर.

सुभामा—त्यांचं नांव सुद्धां नको काढूंस माझ्या समोर. सुदैवाचीं असतीं तर त्यांची पुण्याई नसती पुढं उभी राहिली. पण त्यांची पुण्याई असेल कोठची? या कर्म चांडाळणीच्या

पोटीं आल्यामुळं तिच्या खडतर नशिबाचं प्रायश्चित त्यांना भोगणं भाग आहे. मला कशाची गोडी राहिली नाहीं. मी तिकडे जाणार. सोड मला! तिकडे मला गेलंच पाहिजे. काय मला सोडित नाहींस? मला दाही दिशा त्यांच्या वांचून शून्य दिसत आहेत. देवा त्यांच्यावांचून हे प्राण कसेरे राहतील! जाणार मी! सोड तूं मला! मी त्यांच्या बरोबर दुःखी असलेली पत्करलं.

मनोरमा–( स्वगत ) हिचं डोकं जास्तच भडकत चाललं. आणि हिच्या कृतीवरून इला भ्रम झाला असावा असं वाटतं [उघड] असं काय बरं हें––

पद( चाल–सुकुमार० )

हा हट्ट नको मन घट्ट करी जें भाळीं ॥
तें चुकेल न कदां जरी अंत ये जवळीं॥ धृ० ॥
चंद्रास राहुचा त्रास केतु सूर्यास छळी लवलाही ॥
सुरपती इंद्र तो भगेंद्र झाला पाही ॥ १ ॥
तो विधी जरी गुणानिधी तरी मस्तका छेदना देई॥
श्री वसिष्ठ गुरु त्या पुत्रशोक बहु होई ॥ २ ॥
पांडवा सर्व बांधवा घोर कांतारीं गमन ये पाही॥
विधिलेखन न चुके प्रयत्न करितां कांहीं॥ ३ ॥

सुभामा–तुझी देखील ग कशी बुद्धी फिरली? माझी व तिकडची गांठ तूं पडूं देणार नाहींस मग मोठंच शतकृत्य करतेस. कुठं फेडशील हें—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



पद [ चाल—सफलेच्छा० ]

मैत्रिण असतां वैरिणसमही।कृति करिशी कां तूं लवलाही।।
प्राणेशाच्या भेटीविणही।स्वस्थचि ना राही । कथिते ।
पोळतसे मम तनु ही पाही ।। दुःसह मज होई।। धृ० ।।
सहाय करावें मज या समयीं।धर्म असे हा मनिं तूं घेई।।
स्त्रीपतिवियोग करितां बाई।पातक शिरीं येई ।। १ ।।

( जगन्नाथ व काशिनाथ येतात)

जगन्नाथ }
काशिनाथ } पद [ चाल—प्रीतिसमागम० ]

सोडुनि तूं आह्मांतें।जाशी कोठें गे प्रिय माते ।। धृ० ।।
तुजविण दुसरा वालि न उरला ।
सांभाळिल मग कोण आम्हांला ।
प्रेमें बाहिल या समयातें ।। १ ।।

सुभाषा—[ त्यांस लोटून] चला व्हा एकीकडे कारट्यांनों. नशिबाचीं पडलांत किं नाहीं.

(जाते.)

मनोरमा—आतां मात्र माझी खात्री झाली कीं ही वायूची लहर म्हणून. आतां हिला एकटीला सोडून उपयोगी नाहीं. [जाते.]

जगन्नाथ—हाय! हाय!

पद[चाल—बाळा घालूनिया०]

राजकोप होउनियां ।। कारागृहवास पित्या ।
घडुनीया या समया ।। छत्र जाइ तें ।। १ ।।

काशिनाथ–

मपतेच्या अग्रस्थानीं । माता तिज भ्रम होउनी ॥
आह्मां ती सोडि म्हणुनी । छत्र जाई तें ॥ २ ॥

( सुहृदय, सुशील येतात )

सुहृदय–बाळांनो तुह्मीं काळजी करूं नका.

सुशील–जरी तुह्मीं वयानें लहान आहांत तरी आह्मांला वडिलांच्या जागीं आहांत–

सुहृदय–आणि म्हणून—

पद ( झंपा. )

तुह्मां सर्वसाक्षी सदां सौख्य देवो ॥
सृष्टिचालक प्रभू समयिं पावो ॥ धृ० ॥
बंधनालयिं जरी तात तुमचा असे ॥
मुक्त तो व्हावया यत्न करितो ॥
ईशसत्तें तया सुयश येवोनियां ॥
सुटुनि तो झडकरी येथ येवो ॥ १ ॥

सुशील–

धीर ठेवा तुम्हीं तोंवरी मानसीं ॥
रक्षुं आम्हीं तुम्हां सतत समजा ॥
पांच तत्वांसही साक्ष ठेवोनियां ॥
भाक देतों तिला ईश पुरवो ॥ २ ॥

[ जातात ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.



पद [ चाल—सफलेच्छा० ]

मैत्रिण असतां वैरिणसमही।कृति करिशी कां तूं लवलाही॥
प्राणेशाच्या भेटीविणही।स्वस्थचि ना राही। कथिते।
पोळतसे मम तनु ही पाही ॥ दुःसह मज होई॥ धृ० ॥
सहाय करावें मज या समयीं।धर्म असे हा मनिं तूं घेई॥
स्त्रीपतिवियोग करितां बाई।पातक शिरीं येई ॥ १ ॥

( जगन्नाथ व काशिनाथ येतात)

जगन्नाथ }
काशिनाथ } पद [ चाल—प्रीतिसमागम० ]

सोडुनि तूं आह्मांतें।जाशी कोठें गे प्रिय माते ॥ धृ० ॥
तुजाविण दुसरा वालि न उरला ।
सांभाळिल मग कोण आम्हांला ।
प्रेमें बाहिल या समयातें ॥ १ ॥

सुभामा—[ त्यांस लोटून] चला व्हा एकीकडे कारट्यांनों. नशिबाचीं पडलांत किं नाहीं.

(जाते.)

मनोरमा—आतां मात्र माझी खात्री झाली कीं ही वायूची लहर म्हणून. आतां हिला एकटीला सोडून उपयोगी नाहीं. [जाते.]

जगन्नाथ—हाय! हाय!

पद [चाल—बाळा घालूनिया०]

राजकोप होऊनियां ॥ कारागृहवास पित्या ।
घडुनीया या समया ॥ छत्र जाइ तें ॥ १ ॥

काशिनाथ–

ममतेच्या अग्रस्थानीं । माता निज भ्रम होउनी ॥
आह्मां ती सोडि म्हणुनी । छत्र जाई तें ॥ २ ॥

( सुहृदय, सुशील येतात )

सुहृदय–बाळांनो तुह्मीं काळजी करूं नका.

सुशील–जरी तुह्मीं वयानें लहान आहांत तरी आह्मांला वडिलांच्या जागीं आहांत–

सुहृदय–आणि म्हणून—

पद ( झंपा. )

तुह्मां सर्वसाक्षी सदा सौख्य देवो ॥
सृष्टिचालक प्रभू समर्थ पावो ॥ धृ० ॥
बंधनालयिं जरी तात तुमचा असे ॥
मुक्त तो व्हावया यत्न करितो ॥
ईशसत्तें तया सुयश येवोनियां ॥
सुटुनि तो झडकरी येथ येवो ॥ १ ॥

सुशील–

धीर ठेवा तुम्हीं तोंवरी मानसीं ॥
रक्षुं आम्हीं तुम्हां सतत समजा ॥
पांच तत्वांसही साक्ष ठेवोनियां ॥
भाक देतों तिला ईश पुरवो ॥ २ ॥

[ जातात ]

---

## प्रवेश चवथा.

पात्रें–विघातक, अनुदार आणि अनुत्कर्ष. स्थळ–रस्ता.

विघातक–आतां ऍटमॉस्टफिअर अगदीं क्लिअर होऊन गेलें. सत्यव्रताला शिक्षा झाली. आतां तुरुंगांतून तर तो तुमच्या आड येत नाहींना ?

अनुदार–अरे येत नाहीं कसा! हे लोक अगदीं मूर्ख आहेत. सत्यव्रत अपराधी ठरून जरी तुरुंगांत गेला तरी त्याचे पोंवाडे गातात आणि आम्हीं सरळ रस्त्यानें जाऊं लागलों तरी आमच्याकडे बघून दांतओंठ खातात याला म्हणावें तरी काय? सत्यव्रतासारख्या एकट्या दुकट्याचा थोडाच समाचार घ्यायचा आहे!

अनुत्कर्ष–त्यांत दुसरें शिवे एक वाईट झालें. आम्हीं मोठेपणा मिळविण्याकरितां नामदारांचा आणि बड्या शिक्षकाचा हात धरून त्यांनीं दाखविलेल्या मार्गानेंच जात होतों पण पाय घसरून पडण्याची कां वेळ यावी ? आतां ही तड नाहीं आणि ती तड नाहीं. तेव्हां आणखी कांहीं दिवस अज्ञातवासांत रहाणें भाग आहे.

अनुदार–अरे भितोस काय असा! व्हाय डू यू फिअर! आपल्या तर बुवा हें अगदीं अंगवळणी पडलें आहे. थप्पड बसली जरा डोकें खालीं करावें जास्त जोरानें बसली पाया-वर डोकें ठेवावें. पण वेळ आली कीं पुन्हां छातीवर बसायला तयार. ही पॉलिसी ठेविली पाहिजे तुला हा प्रसंग नव्यानेंच आहे म्हणून तो तुला सीरियस वाटतो झालें.

विद्या०—यांत काय संशय. कारण—

पद ( चाल—अंजन पर्वा न करी )

वेळ अवेळा पाहुनी वर्तन ठेवी ज्ञाता तोचि खरा ॥
पॉवरफुल जन असति त्यांप्रती नम्र राहि जो नित्य जरा॥
नीति ही मनीं । नित्य ठेउनी । ड्युटि समजुनी ॥
सतत अचरूनी । सुपथ बरा । तो स्वीकरा ॥ १ ॥

आणि ह्मणून तुह्मीं घाबरूं नका. तुमच्याआड जरी हा ढग आला आहे तरी तो नाहींसा होऊन अशी वेळ येईल कीं त्या वेळीं आपलें तेज पडलेंच पाहिजे. प्रसंग घडवून आणण्याचें तर आपल्या हातांत आहे कीं नाहीं!

अनुत्कर्ष—तें खरें पण रूध्यांच्या अपकीर्तीनें माझा जीव मला नकोसा झाला आहे.

अनुदार—छे. हे तुमचे विचार अगदीं चुकीचे आहेत कारण—

पद ( चाल—अजि खेळ मेरे )

किति तरी मनिचे तरंग अहा ॥ धृ० ॥
डिसऑनर तशी ती फेम जनीं ह्यापिनेस मनीं ॥
ऑन्लि कल्प पहा । जाति विलया सत्वरी ॥
एका जें प्रिय । अन्या अप्रिय ॥
मनधर्म असे सिव्हिलाइज्ड जनीं होती राइज मनीं ॥
जाति विलया सत्वरी ॥ १ ॥

शिवाय एका पक्षाला सपशेल तोंडघशीं पाडून त्याचे छातीवर दुसरा आणणें हें पहिल्याला हरामखोरपणाचें

आणि दुसऱ्याला भूषणीय वाटणें सहाजीक आहे. तशांतून—

साकी.

सर्व जगाला प्लीज कराया यत्नचि साध्य न होई ॥
ॲक्शन प्रिय जें अर्ध जगाला अप्रिय दुसऱ्या होई ॥
यास्तव सुविचारें । करावें अचरण तेंचि बरें ॥

ते पहा तुझे पुरस्कर्ते इकडेच येत आहेत. [ दुर्मती वगैरे येतात ] ओलो कमॉन व्हॉट न्यूज ?

( एकमेकांचा शेकह्यांड करतात )

दुर्मती—( शेकह्यांड करतांना ) नथींग परटिक्युलर.

अनुत्कर्ष—फार दिवसांत भेटलां नाहींत. इतकें तुमचें ॲब्सेन्स आम्हांला फील झालें. कां कांहीं अवकृपा झाली कीं काय. प्लेनली सांगा माझा फॉल्ट असेल तर अपॉलोजी मागण्यास मी कसूर करणार नाहीं.

अनुदार—अलबत मागितलीच पाहिजे. नाहींतर फ्रँक हार्टेडनेस तो कसला. चूक झाली कीं माफी मागणें हें जन्टलमनचें काम आहे. आणि तशांतून तुम्हीं तर आमचे म्हाल्व्हिशनिस्ट.

दुर्विलास—ऑफ कोर्स. आमच्याशीं जोंपर्यंत तुह्मीं डिसऑनेस्ट झालां नाहींत तोंपर्यंत तुमच्या योग्यतेप्रमाणें तुह्मांला लाइटमध्यें आणूं.

विघातक—पण तुह्मी एकदां हातांत धरलें तर आतां सोडतां कामा नये. नाहींतर मग येबी गया और वोबी गया.

( बगलबच्चा प्रवेश करितो )

दुर्मती—आय से मि. बगलबच्चा. एव्हरीथिंग अॅरेंज्ड?

बगल०—तुह्मी सांगितल्याप्रमाणें घडाघड आरडर्स इशु केल्या, सर्व तयारी आहे. आजच्या फीस्टचें स्केलच मोठ्या प्रमाणावर आहे.

दुर्विलास—तर तर या जन्टलमेनला रिसिव्ह केलें पाहिजेना चला तर मग. आज सगळ्यांची हार्ट्स एका टायनें बांधलीं गेलीं पाहिजेत. वुइ आर ऑल वन. ( जातात. )

( पडदा पडतो )

अंक चवथा समाप्त.

---

# अंक पांचवा.

---

## प्रवेश पहिला.

स्थळ—तुरुंग. पात्रें—सत्यव्रत.

सत्यव्रत—(स्वगत)

[ पद—चाल—अघटित घटना श्री० ]

कारागृह हा निवास मजला दुर्दैवानें प्राप्त जहाला ॥
दुःखद हो परि सहवासानें तापद होई अल्प न मजला॥धृ०॥
बंदिजनांची भक्ती पाहुनी विस्मय होतो मच्चित्ताला ॥
कष्टांचि मज संवय न ह्मणुनी हातभार ते लाविती त्याला॥
परोपरीनें मज सुख व्हावें म्हणुनी करिती ते यत्नांला ॥
ईशा त्यांचा उतराई मी होइन कैसा नकळे मजला॥२॥

त्यांत सुद्धां त्या सटव्याची माझ्या ठिकाणीं असलेली भक्ती पाहून मला फारच आनंद होतो. त्याचें सरळ अंतःकरण, तें वेड्या वांकड्या भाषेंत बोलणें आणि हरएक गोष्ट समजून घेण्याकरितां सलगीनें रहाणें हें पाहून त्याचा शहाणपणा तेव्हांच लक्षांत येतो शिवाय मींही त्याच्याबरोबर मोकळ्या मनानें वागतो ह्मणून त्याला किती धन्यता वाटते पहा—

पद. [ चाल—काय परम रमणीय सखीचें ]

सुखवी मजला अनुदिनी प्रेमें गुज गोष्टी कथुनी ॥
मन वळवाया बंदिजनांचें यत्न करी झटुनी ॥
मज सुख द्याया प्रेरि तयाला ईश सदां जो सुखवी समयीं॥

ही पहा स्वारी इकडेच येत आहे एका हातांत कंदील आणि एका हातांत काठी आहे आतां ती पांडित्य सुरु करणार. एकंदर प्रेमळ मनुष्य खरा.

( सटव्या आणि ग्येना प्रवेश करितात )

ग्येन्या—कायर सटव्या त्यो मोठा गिरस्थ हतच हायनार.

सटव्या—कोनचार ?

ग्येना—त्यो नवगा बामन आलया आन त्याची मिजास बी लई ठिवलीया त्यो. तूं मलात्याची थोरवी सांगत व्हतास त्यो ऱ्येका. आलं का न्हाइर ध्यानांत.

सटव्या—व्हय व्हय हतच हाय त्यो. मला त्येच्या पाशी दोन वखत बोलाया गवासल व्हत. लई चांगला ग्वाड गिरस्थ हाय. पन कायर ग्येन्या तुजाबी हतच पारा हायनार ?

ग्यना—व्हय हतच हाय कीं.

सटव्या—आन तो कवाशीर?

ग्येन्या—तुला न्हाईका ठावा. आर माझा पहिला पारा हाय मर्दा आन माझ्या मांगून तुझा हाय. जा तूं जाऊन-शेनी पड. तुझ्या पाऱ्याच्या वखती उठवीन जा त्येका-ना ठ्येगी जा.

सटव्या—ह्यो बग ग्येना तूं माझा दोस्त नव्हकारे.

ग्येन्या—न्हाइ कोन म्हंगतया मंग काय म्हंगतोस.

सटव्या—माझ्या मनामंदी आज पहिला पारा करायचा हाय.

ग्येन्या—आन दुसरा मीं करूं व्हय.

सटव्या—तसं नव पहिला करूनश्यान दुसरा बी करा-यचा हाय.

ग्येन्या—आन मी कनचा करूं?

सटव्या—पहिला करूनश्यान दुसरा बी माझा मीच करीन अन तिसरा नि चवथा तूं कर.

ग्येन्या—आन तो कशापाइ.

सटव्या—ह्यो पघ ग्येना. त्या गिरिस्तापाशीं मला वाइच बोझायाचं हाय आन त्येच्या कारितां पघ मला तुझा पारा पाहिजे.

ग्येन्या—माझी काइ हरकत नाय. पन समदं मला सांगशील तर.

सुटव्या—आन तूं न मीं काय दोन हाय कायर. अशी

पन समदं तुला सांगन जा तूं पड जा. ( म्येना जातो )
[स्वगत] ह्यो वखत लइ ग्वाड हाय ! अशी कोन चिट-पाखरूं बी न्हाइ. त्येच्या भैन ह्यो समंदा तुरंग माझेच ताब्यांत हाय नवगा. ह्यो बडा साहेब आन त्यो धाकला साहेब न संमद संमद पारकरी आशि द्वोन घंटा विश्रांती घ्येत्याल आन त्याच्या दरम्यान ह्या बड्या रावसाहेबासनी आपुन काइ पुसलया तर आपल्याला कोन पघनार.

[ पुढें होऊन रामराम करतो. ]

सत्यव्रत—कसें काय बरें आहेना?

सट्या—व्हय धनीसाब आपल्या पायांच्या किरपेनं बरंच हाय नवगा. पन धनीसाब आपल्यापाशीं वांइच दोन शबद बोलायचे व्हत ह्यो गरीब चाकराला.

सत्यव्रत—हें बघ आपण सरकारच्या अटकेंत आहों हें लक्षांत पाहिजे.

सट्या—आन यो वखताला हत कोन येतोया. त्येची अशी नग काळजी.

सत्यव्रत—बोल तुला काय बोलायचें असेल तें.

सट्या—ह्यो हात गळ्यामंदी बांधला त्यो कशापाई. काई दुख भरलया व्हय.

सत्य०—होय बाबा. पाय घसरून पडल्यामुळें ही हाताला इजा झाली आहे. औषधउपचार चालू आहेत.

सट्या—आन इस्पितळांत तत योक बामन हाय त्येला मीं सांगन कीं रावसाबांचा हात वांइच ध्येयाकझ पाहिजे त्येला मी वळखतो.

सत्य०—तूं कांहीं सांगण्याच्या भरीस पडूं नकोस. तो आपल्याकडून माझी चांगली चाकरी करतो. ( स्वगत ) या वेळीं तुरुंगांतील एकंदर स्थिती आपणाला समजायला हें एक साधन आहे. तें फुकट जाऊं देतां उपयोगी नाहीं. ( उघड ) कायरे तूं बराच जुना कैदी दिसतोस.

सटव्या—जी व्हय धनीसाब.

सत्य०—तुला किती शिक्षा झाली आहे.

सटव्या—आन त्येरा वरसाची ठेप हाय रावसाब.

सत्य०—मग यांतली राहिली किती.

सटव्या—धा वरसं भरलीं पघा. आन मागं किती राहला.

सत्य०—तीन राहिलीं.

सटव्या—व्हय व्हय तीनच हायती पघा.

सत्य०—तर मग तुला तुरुंगांतली सगळी माहिती असेल.

सटव्या—अगदीं समदी हाय. ह्यो तुरुंगाचा कोन न कोपरा समदं मला ठावा हाय.

सत्य०—बरं पण कायरे मला जेव्हां तपासण्यासाठीं डॉक्टर आला तेव्हां इतकी गर्दी कसली जमली होती?

सट०—गरदी कशापाइ जमली व्हय! त्येंच्या मनामदीं रावसाब कस गिऱ्हास्थ हायता ह्ये पघायचं व्हतं. अन त्ये करतां कोनी प्वाट दुखण्याचं तर कुनी डोकसं दुखण्याचं हवांग क्येलं आन कुनी कसला तर कुनि कसला बी भाणा करूनश्यान आलं पघा.

सत्य०—असें आं—

पद. [ चाल—प्रिये पहा रात्रीचा ]

अहा प्रभो दुःख परी सौख्यासम मानिती कसे ॥ध्रु०॥
कारागृह वास परी । दुःख होई तें अंतरीं ॥
परिसाया समयीं तरी । कवण वदरे येतसे ॥अ०॥

[ इतक्यांत राऊंडचा शिपाई येतो. ]

सटव्या—रोंद आला सरकार. मी पाऱ्यावर जातो.

[सटव्या बाहेर येतो आणि पडदा पडतो.]

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—सुविचाराचा दिवाणखाना.

पात्रें—सुविचार.

सुविचार—[आपल्याशीं] माझा मित्र कारागृहांत पडल्यापासून मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे. ज्याची नेहमीं गांठ पडायची आणि ज्याच्याजवळ चार सुखदुःखाच्या गोष्टी सांगायच्या तोच दुरावल्यामुळें मला वेड्यासारखें होऊन गेलें आहे. [कांहीं वेळ थांबून] तथापि अशा निकृष्ट स्थितींत असतांना देखील लोकांकडून त्याचा अधिकाधिक गौरव होत आहे. हें पाहून मला किंचित समाधान वाटतें. अहाहा काय त्याची योग्यता—

पद [ भूपाळीच्या चालीवर ]

नांव सदांदित प्रेमें त्याचें सकल लोक घेती ॥
नित्य घडावें दर्शन म्हणुनी प्रतिमा गृहीं पुजिती॥नांव०॥
अभिष्टचिंतन निष्ठेनें तें विद्वज्जन करिती ॥

तऱ्हेतऱ्हेनें मनिची भक्ती व्यक्त करुनी दाविती ॥
देवासम त्या मानुनि कितिजण नवसाला करिती ॥
वदूं अशीं किती जनकृत्यें मीं नाहीं जया गणती ॥

या सर्व गोष्टी पूर्व पुण्याईशिवाय होत नसतात मनुष्याची एकदा कीर्ति होत गेली म्हणजे ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाते. मला असें वाटतें—

पद. ( चाल—धन्य तूंचि विबुध० )

धन्य तोचि सर्व मान्य वंद्य जो जनीं अती ॥
धन्य अवनि जननि तात जनन त्यास देती ॥ धृ० ॥
विद्यामृत दिधलें त्या धन्य तो गुरु किती ॥
धन्य स्नेही त्यासह जे काल आक्रमिती ॥ १ ॥
कारागृह धन्य ज्यास चरण लागताती ॥
धन्य धन्य तद्दर्शन वंद्य जे जगीं अती ॥ २ ॥

असल्या स्वदेशभक्तांवर संकटें येऊन त्यांना जी विपरित अवस्था प्राप्त होते तिचें कारण त्यापासून जनहित व्हायचें असतें हेंच खरें पहा—

पद. [ चाल—दशरथ कैकयी दुर्वचनीं० ]

दारुण दुःखें भोगोनी ।
हरिश्चंद्र नृप प्रेम दाखवी सकलां निजवचनीं ॥
दुःसह परि छळ सोसुनी ।
आतिथीगौरव तो दाखविला श्रीयाळें सुजनीं ॥
रामें वनवासी बनुनी ।
पितृभक्तिचा मार्ग दाविला वचनीं राहोनी ॥

ऐसें जगतीं कितीकांनीं ।
सकल जनाला मार्ग दाविले स्वतः आचरोनी ॥

कारागृहांत सदोदित भेट घेणें शक्य नसल्यामुळें इतक्या दिवसांत त्याची व माझी दोनदांच गांठ पडली. संकटास जरी तो धैर्यानें पाठ देत आहे तथापि शारिरिक यातनांनीं तो अगदीं क्षीण झाला आहे त्याची ती पहिली शरिराची ठेवण अगदीं नाहींशी झाली. हे प्रभो—

पद. ( चाल—हिमधवलांगी० )

कलिमलदहना । हे रिपुदमना । दयाघना ।
तुज येई न करुणा ॥ क० ॥
अजुनि किती तूं अंत पहासी । मम मित्राचा
या समयासी । सहनशील जो रिझवी स्वमना ॥ क० ॥
मुक्त करी त्या हे गजवदना ॥
विनवी तुजला करुनी नमना ॥ क० ॥

[ इतक्यांत सुहृदय आणि सुशील प्रवेश करितात. त्यास पाहून ] या बाबानों तुम्ही मात्र धन्य खरे.

सुहृदय—आपण काय म्हणतां?

सुशील—याचा आम्हांला कांहींच अर्थ कळत नाहीं. आम्ही कसले धन्य ?

सुविचार—

पद. ( चाल—या विरहा कां भीसी० )

वंद्य जनां ते होती ॥
प्रजाजनांची सेवा करितां वाढतसे हो कीर्ति ॥ वं० ॥
संकटसमयीं परोपकारा करुनि न मानिं जे घेती ॥ वं० ॥

त्याप्रमाणें माझ्या मित्राच्या पाठीमागें तो जनसेवेचें करीत असलेलें काम तुम्हीं नेटानें आणि धैर्यानें चालवून त्याच्या मुलाबाळांचा परामर्ष घेत आहां हेंच तुम्हांला भूषण.

सुहृदय—अहो त्यांत कसलें भूषण ? कारण—

पद. [ चाल—मज लावण्याची खणी. ]

निजकर्मीं सदा मन रिझवावें ॥
धर्माचरणां करी तयाला भूषण हो कां द्यावें ॥नि०॥
निज कर्तव्या ध्यानीं घेऊनी ॥
मार्ग तयाचा शोधुनी काढुनी ॥
सदाचराणें वर्तावें ॥ नि० ॥

सुशी०—अर्थातच. आम्ही आपल्या कर्तव्यास स्मरून जें योग्य तेंच करीत आहों. म्हणून आमचा इतका गौरव करण्याचें कारण नाहीं.

सुविचार—तुम्ही म्हणतां तें एक पक्षीं जरी खरें असलें तथापि स्वकर्तव्य ओळखून सुद्धां जाणूनबुजून कर्तव्य पराङ्गमुख होणारीं माणसें फार सांपडतात. तेंच कशाला सत्यव्रताचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें त्यास खालीं आणण्याकरितां जे प्रयत्न झाले ते तुमच्या ध्यानांतून गेले नाहींतना!

सुह०—नाहीं पण त्याचें प्रायश्चित त्यांस लागलीच मिळालें म्हणून बरें झालें. असल्या माणसांची लोकांस वेळींच किंमत कळणें जरूर असतें. वाचाळ आणि विघातक यांच्या बोलण्याकडे लोकांचें फारसें लक्ष नव्हतें. त्यांची किंमत

ऐसें जगतीं कितीकांनीं ।
सकल जनाला मार्ग दाविले स्वतः आचरोनी ॥

कारागृहांत स्वोदित भेट घेणें शक्य नसल्यामुळें इतक्या दिवसांत त्याची व माझी दोनदांच गांठ पडली. संकटास जरी तो धैर्यानें पाठ देत आहे तथापि शारिरिक यातनांनीं तो अगदीं क्षीण झाला आहे त्याची ती पहिली शरिराची ठेवण अगदी नाहींशी झाली. हे प्रभो—

पद. ( चाल—हिमधवलांगी० )

कलिमलदहना । हे रिपुदमना । दयाघना ।
तुज येई न करुणा ॥ क० ॥
अजुनि किती तूं अंत पहासी । मम मित्राचा
या समयासी । सहनशील जो रिझवी स्वमना ॥ क० ॥
मुक्त करी त्या हे गजवदना ॥
विनवी तुजला करुनी नमना ॥ क० ॥

[ इतक्यांत सुहृदय आणि सुशील प्रवेश करितात. त्यास पाहून ] या बाबानीं तुह्मीं मात्र धन्य खरे.

सुहृदय—आपण काय ह्मणतां?

सुशील—याचा आह्मांला कांहींच अर्थ कळत नाहीं. आम्ही कसले धन्य ?

सुविचार—

पद. ( चाल—या विरहा कां भीसी० )

वंद्य जनां ते होती ॥
प्रजाजनांची सेवा करितां वाढतसे हो कीर्ति ॥ वं० ॥
संकटसमयीं परोपकारा करुनि न मानिं जे घेती ॥ वं० ॥

त्याप्रमाणें माझ्या मित्राच्या पाठीमागें तो जनसेवेचें करीत असलेलें काम तुम्हीं नेटानें आणि धैर्यानें चालवून त्याच्या मुलाबाळांचा परामर्ष घेत आहां हेंच तुम्हांला भूषण.

सुहृदय–अहो त्यांत कसलें भूषण ? कारण–

पद. [ चाल–मज लावण्याची खणी. ]

निजकर्मीं सदां मन रिझवावें ॥
धर्माचरणां करी तयाला भूषण हो कां द्यावें ॥नि०॥
निज कर्तव्या ध्यानीं घेऊनी ॥
मार्ग तयाचा शोधुनी काढुनी ॥
सदाचराणें वर्तावें ॥ नि० ॥

सुशी०–अर्थातच. आम्ही आपल्या कर्तव्यास स्मरून जें योग्य तेंच करीत आहों. म्हणून आमचा इतका गौरव करण्याचें कारण नाहीं.

सुविचार–तुम्ही म्हणतां तें एक पक्षीं जरी खरें असलें तथापि स्वकर्तव्य ओळखून सुद्धां जाणूनबुजून कर्तव्य पराङ्गमुख होणारीं माणसें फार सांपडतात. तेंच कशाला सत्यव्रताचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें त्यास खालीं आणण्याकरितां जे प्रयत्न झाले ते तुमच्या ध्यानांतून गेले नाहींतना!

सुहृ०–नाहीं पण त्याचें प्रायश्चित त्यांस लागलीच मिळालें म्हणून बरें झालें. असल्या माणसांची लोकांस वेळींच किंमत कळणें जरूर असतें. वाचाल आणि विघातक यांच्या बोलण्याकडे लोकांचें फारसें लक्ष नव्हतें. त्यांची किंमत

लोक पुष्कळ दिवसांपासून ओळखताहेत. आणि अनुदारही किती किंमतीचा आहे हें ते पुरतेपणीं जाणताहेत. अनुत्कर्षा-च्या ऐटबाज बोलण्याकडे मात्र लोकांचें कांहीं दिवस लक्ष वेधलें. होतें. पण—

पद. [ चाल—दयाघना गजानना० ].

कदां नये तयासि तेज धुंद जो सदां खरा ॥
कार्यसाधु नीच भोंदु म्हणति त्या जनीं नरा॥
अल्पमती मंद अती नम्रता नसे जरा ॥
स्वयंप्रकाश ज्या नसे तया न अन्य आसरा ॥
धूम्रकेतु प्रथम तेजयुक्त होतसे खरा ॥
परंतु अल्प काळिं तेंच सत्य जाय नश्वरा॥कं०॥

सुविचार—हो असें व्हायचेंच. कारण उत्तम उत्तम चिजा स्वस्त्या नसतात. पहा—

पद. [ चाल—जनहो वंदा० ]

वंद्य पुरुष नरवर अवनीं यां ।
यत्नें पहातां न मिळे ठायां॥ध्रु०॥
शैले शैले नच माणिक्यं ।
प्रयत्न करितां जाइल वाया ॥
प्रति गज गंडस्थळिं तें मौक्तिक ।
पहातां पहातां शिणेल काया ॥
घोर निबिड कांतारीं फिरतां ।
सुगंध चंदन न मिळे पहाया ॥

तसें क्षणभर खोटा चमकणारा हिरा जरि नजरभूल करणारा

असला तथापि परिक्षेची वेळ आली ह्मणजे हिरा तो हिरा आणि कांच ती कांच. [ इतक्यांत तारेचा लखोटा घेऊन शिपाई येतो.] तुम्ही आलां आणि ही मागोमाग तार काय म्हणून ! माझ्या पत्यावर तुह्मांला ही तार केलेली दिसते.

सुशील—[तार उघडून] आज्ञाधारकानें ही केली आहे. आणि त्यांत तुह्मांला घेऊन येण्याबद्दल कळविलें आहे.

सुविचार—आणखीं काय संकट आहे कोणाला ठाऊक. परंतु—

सुशील—संकट तर नाहींच कारण त्यांत "भिऊं नये आणि जमल्यास सुयोग आहे" असें लिहितो. तर चला आतांच्या आतांच आपण जाऊं.

सुविचार—चला तर—

साकी. [ ताल—धुमाळी ]

सर्व संकटें निरसुनी जाउनी मित्र झडकरी भेटो ॥
क्षेम तयाचें पाहुनि ईशा दुःखार्णव हा आटो ॥
करितों विनतीला । प्रेमें आदर दे तिजला ॥

—*— (जातात .)

## प्रवेश तिसरा.

स्थळ—रस्ता. पात्रें—तीन बायका.

१ ली—कायहो सरस्वतीबाई चलतांना तिकडे. मी बरेच दिवसांत तिकडे गेल्यें नाहीं.

२ री—होय गडे मला देखील जायला बनलं नाहीं. जळली मेली फुरसुदच कशी ती सांपडत नाहीं.

३ री—सांपडत नाहीं खरी पण काढली पाहिजे. अशा वेळीं तिची वारंवार गांठ घेऊन चार समाधानाच्या गोष्टी तिला सांगितल्या पाहिजेत. आनंदाच्या दिवसांत एक वेळ नाहीं गेलं तरी चालेल.

१ ली—खरं तुम्ही म्हणतां तें. समारंभाला चार चौघी सहज जमतात पण दुःखाच्या वेळीं कोणी जाईल तर शपथ. हें कांहीं बाई चागलं नाहीं हो.

३ री—विपत्तींत भेटायला येणारींच माणसं चांगलीं असं ह्मणतात तें उगीच कां. पण काय हो आनंदीबाई परवांच्या समारंभाच्या वेळीं सत्यव्रताची सुटका होणार होती ना?

२ री—काय सांगूं गंगाबाई ज्याच्या त्याच्या तोंडीं ही बातमी झाली होती आणि ते दिवशीं सुटका होणार ह्मणून लोकांनीं आपापल्या परीनं उत्सव कसा करायचा हें देखील ठरवलं होतं.

३ री—हो गडे. पण मधेंच काय असं फिसकटलं हें!

१ ली—कुणाला ठाऊक. पण तिकडनं ह्मणणं व्हायचं कीं थोरल्या सरकारनं सोडावा ह्मणून आग्रह धरिला आणि धाकट्या सरकारनं, असा मध्येंच सोडला तर आमच्या अधिकाराचा बोज तो काय रहाणार, अशी सबब पुढं आणली.

२ री—पुरें झाल्या मेल्या या सबबी. ह्मण आहेना "रेड्यापाड्यांची झुंज आणि बिचाऱ्या झाडांचा काळ." या भांडणांत त्या बिचाऱ्याला मात्र जास्त दिवस तुरुंगांत काढावे लागत आहेत.

१ ली–पण गडे अशा बोलत तुह्मी किती वेळ बसणार चला म्हणजे तिथें बसायला तरी घटकाभर सांपडेल.

[ पडदा उघडतो ]

सुभामा–आज किनई माझा डावा डोळा लवतो आहे.

मनोरमा–खरंच कां! अग तो तर चांगला कारण–

पद [ चाल–तिळक कपाळीं. ]

शुभदायक तो गमतो सकलां।
शिव शकुनें अती उत्तम गणिला ॥ धृ० ॥
सव्य नेत्र तैं बाहू स्फुरता।
नरासि सुचवि ये शुभ वेळा ॥ १ ॥
प्रति बाहु वा नेत्र स्फुरतां।
स्त्रियांसि मंगल सौभाग्याला ॥ २ ॥

सुभामा–तुझ्या तोंडांत साखर पडो. पण इतकी थोर नशिबाची मी आहे कांग. इतकं मात्र खरं कीं गेल्या उभ्या वर्षांत मला एक दिवस देखील असा शुभ शकुन झाला नाहीं.

मनोरमा–होयना. तर मग मी खरंच सांगतें कीं तुझे हेतू पूर्ण होतील.

सुभामा–पण गडे हा असला शकुन मला आशेला लावून मे फसवो ह्मणजे झालें.

[ तीन बायका प्रवेश करितात ]

१ ली–कसं काय. बरी आहेना प्रकृती?

सुभामा–मला काय झालंय. चांगली जेवतें खातें. सगळं करते.

३ री—सांपडत नाहीं खरी पण काढली पाहिजे. अशा वेळीं तिची वारंवार गांठ घेऊन चार समाधानाच्या गोष्टी तिला सांगितल्या पाहिजेत. आनंदाच्या दिवसांत एक वेळ नाहीं गेलं तरी चालेल.

१ ली—खरं तुम्ही म्हणतां तें. समारंभाला चार चौघी सहज जमतात पण दुःखाच्या वेळीं कोणी जाईल तर शपथ. हें कांहीं बाई चागलं नाहीं हो.

३ री—विपत्तींत भेटायला येणारींच माणसं चांगलीं असं ह्मणतात तें उगीच कां. पण काय हो आनंदीबाई परवांच्या समारंभाच्या वेळीं सत्यव्रताची सुटका होणार होती ना?

२ री—काय सांगूं गंगाबाई ज्याच्या त्याच्या तोंडीं ही बातमी झाली होती आणि ते दिवशीं सुटका होणार ह्मणून लोकांनीं आपापल्या परीनं उत्सव कसा करायचा हें देखील ठरवलं होतं.

३ री—हो गडे. पण मध्येंच काय असं फिसकटलं हें!

१ ली—कुणाला ठाऊक. पण तिकडनं ह्मणणं व्हायचं कीं थोरल्या सरकारनं सोडावा ह्मणून आग्रह धरिला आणि धाकट्या सरकारनं, असा मध्येंच सोडला तर आमच्या अधिकाराचा बोज तो काय रहाणार, अशी सबब पुढं आणली.

२ री—पुरें झाल्या मेल्या या सबबी. ह्मण आहेना "रेड्यापाड्यांची झुंज आणि बिचाऱ्या झाडांचा काळ." या भांडणांत त्या बिचाऱ्याला मात्र जास्त दिवस तुरुंगांत काढावे लागत आहेत.

१ ली–पण गडे अशा बोलत तुह्मी किती वेळ बसणार चला म्हणजे तिथें बसायला तरी घटकाभर सांपडेल.

[ पडदा उघडतो ]

सुभामा–आज किनई माझा डावा डोळा लवतो आहे.

मनोरमा–खरंच कां! अग तो तर चांगला कारण–

पद [ चाल–तिळक कपाळीं. ]

शुभदायक तो गमतो सकलां ।
शिव शकुनिं अती उत्तम गणिला ॥ धृ० ॥
सव्य नेत्र तैं बाहू स्फुरता ।
नरासि सुचवि ये शुभ वेळा ॥ १ ॥
मति बाहु वा नेत्र स्फुरतां ।
स्त्रियांसि मंगल सौभाग्याला ॥ २ ॥

सुभामा–तुझ्या तोंडांत साखर पडो. पण इतकी थोर नशीबाची मी आहे कांग. इतकं मात्र खरं कीं गेल्या उग्या वर्षांत मला एक दिवस देखील असा शुभ शकुन झाला नाहीं.

मनोरमा–होयना. तर मग मी खरंच सांगतें कीं तुझे हेतू पूर्ण होतील.

सुभामा–पण गडे हा असला शकुन मला आशेला लावून मे फसवो ह्मणजे झालें.

[ तीन बायका प्रवेश करितात ]

१ ली–कसं काय. बरी आहेना प्रकृती ?

सुभामा–मला काय झालंय. चांगली जेवतें खातें. सगळं करते.

२ री–जेवतां खातां हें खरं पण आंगीं काय लागतं तें दिसतंच आहे.

मनो०–मला किनई हिची मुळीं सुद्धां आशा नव्हती. तापाचं मेलं असो पण बाई जेव्हां वायु झाला तेव्हां माझे हातपाय अगदीं मोडून गेले.

३ री–होय बाई मुलांचं नशीब थोर ह्मणायचं.

सुभामा–करायची काय असली कपाळकरंटी आई. असून नसून सारखीच. मीं मेलें असतें तर त्यांचं कांहीं अडलं कां असतं ?

१ ली–असं काय बाई अभद्र बोलावं तें. कोणाचं कुणावांचून अडत नाहीं. पण मुलांना आईशिवाय अगदीं ओकं ओकं होतं.

( आज्ञाधारक प्रवेश करितो )

आज्ञाधारक–माईसाहेब उठा. दादासाहेबानां सरकाराच्या हुकुमावरून आजच सोडण्याचें ठरल्यावरून सुविचार, सुहृदय आणि सुशील हे त्यांना आणायला गेले आहेत. इतक्यांत येतील. [ सगळ्या उभ्या रहातात ]

मनो०–खरंच कां–

पद ( ठुंबरी–राग भैरवी. )

सफल मनीशा झाली । तव गे ॥
ईशें धांउनि करुणा केली ॥धृ०॥
गुप्तरत्न तें यत्नें मिळतां ॥
तोषित होते काया वेळीं ॥

सौभाग्योदधि भरती पावे ॥
मंगल वेळा त्वरित पावली॥ १ ॥

अगबाई हे पहा भावोजी इकडेच आले.

[ सत्यव्रत प्रवेश करितो आणि सुभामेखेरीज सगळया जातात ]

सुभामा–( सानंद आणि आश्चर्यित ) अगबाई!

पद [ चाल–फरमाओ शरमाओ॰ ]

जगदंबे तव कृपा फलद्रुप सुदिन गमे मजला ॥ ध्रु०॥

जगन्नाथ आणि काशिनाथ } [प्रवेश करून]–

मत्प्रिय ताता प्रेमालिंगन झडकरि दे तव बालां ॥

सुभामा–

यासमया । कां वाया ॥ ही काया शिणली
नकळे ह्मणुनी वृत्त कथा मजला ॥ ज० ॥

सत्यव्रत–

काळजिनें ही काया झुरतें सुख नच दे कवणाला ॥
या समया । सुखवाया ॥
तनयानों मम प्रेमाश्रूनीं स्नात करा वपुला ॥

सुभामा–जगदंबे तव कृपाफलें हा सुदिन दिसे मजला ॥

( सत्यव्रत मुलांना जवळ घेतो आणि पडदा पडतो. )

## प्रवेश चवथा.

स्थळ—रस्ता.

पात्रें—सुविचार, सुहृदय, सुशील.

सुविचार-मध्येंच हें एकदम असें कसें झालें याचा कांहीं-एक तर्क चालत नाहीं. तथापि या आनंदाच्या वेळीं मला असें वाटतें—

पद. [ चाल—सायंकाळीं नृप० ]

मोदित हें मन आतां । झालें ॥
ऐकुनिया ही मंगलवार्ता ॥ ध्रु० ॥
मुक्त होउनी हा नरनायक ॥
या भुमंडळीं शोभे सविता ॥ १ ॥
राष्ट्रभक्त हा मुक्त पाहुनी ॥
तोषित होई ही भूमाता ॥ २ ॥

सुशी०—रावसाहेब पाहिलीतना लोकप्रीयता! कारागृहां-तून सत्यव्रत सुटल्याची बातमी हां हां ह्मणतां पसरली आणि सर्व लोक आपापल्या परीनें उत्सवांत निमग्न झाले आहेत. आजचा दिवस आपल्या देशाच्या इतिहासांत मोठ्याच महत्वाचा आहे. हजारों लोक सत्यव्रताचें दर्शन घेण्याच्या हेतूनें बसले आहेत तेव्हां हें वर्तमान सत्यव्रताला सांगून लोकांची इच्छा तृप्त होईल असें केलें पाहिजे.

( पडदा उघडतो व तिघे सत्यव्रताजवळ जातात ).

पद [ पार्शी चालीवर ]

सुवि०—मन हें भरलें प्रिय प्रेमानें ॥
सुशी०—पाहुनियां तुज बहु दिवसानें ॥ ध्रु० ॥

मुद्द०—नृपतिकृपें तूं मुक्त होऊनि दर्शन झालें सकलांला ॥
सुवि०—दुःखतिमिर तें दूर होउनी तव प्रकाशें जन
सुखि झाला ॥
सुशी०—दिन सौख्याचा ये कालानें ॥ म० ॥
सत्य—

पद ( राग भैरवी—ताल धुमाळी )

मित्रानों मम देशबंधुनों सहाय संकटीं मज दिधलें ॥
आणि जन्माचा तुमचा आहे प्रेमानें हें मन भरलें ॥मि०॥
मम आभावीं धुरिणत्व जें शिरीं घेवोनी वाहविलें ॥
बहु धैर्यें तें पार पाडुनी जगतीं कीर्तीतें वरिलें ॥१॥
सहाय करुनी आपत्कालीं सह्रद धर्म ते गाजविले ॥
न मिले कोठें सुमित्र ऐसें कर्मधर्म सकलां कळलें ॥२॥

तेव्हां माझ्या मित्रानों मला एकावार भेटा.

( ते एकमेक भेटतात आणि मनोरमा प्रवेश करिते. )

मनोरमा—( सुभामेस ) गडे सुभामे आतां आजच्या शुभ शकुनाचं फळ तुझ्या नजरेस आलंना.

सुभामा—खरंच गडे-पण इतक्या लौकर फलप्राप्ती होईल असं मला वाटलं नव्हतं. आणि खरं वाटावं कसं! कारण एकादां दुधानं तोंड भाजल्यावर ताक देखील मनुष्य फुंकून फुंकूनच पितो.

सुवि०—तुझी आणि तुझ्या पत्नीची पुन्हां भेट झाली आणि सर्व यथास्थित झालें आतां माझी दुसरी कसलीही इच्छा राहिली नाहीं.

सत्य०-तथापि मनुष्य आशेनें व्याप्त असल्यामुळें जर अजून कांहीं परमेश्वराच्या मनांत द्यायचें असेल तर तो आह्मांस हें देवो-

पद [ चाल-सानिसा. हा सुरावट ]

नृपसमता न्यायीं ठेवुनियां ॥
दे धैर्या तायें अभया आह्मां दीन जना ॥
अधिकारी मती हो सुमती । मम विनती ईशपदीं ॥
जनकार्या या आर्या द्यावी बा सुगती ॥ १ ॥

सर्वजण—तथास्तु.

( जातात )

अंक पांचवा समाप्त.

समाप्त.